


स. ग्रं. मं. ठाणे
विषय निबंध
ग्रं. नं.

REFBK-0006142

90492

ले० प्रो. श्री. म. माटे

# पहिली उडी !

REFBK-0006142

किंमत २। रुपये

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक
द. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई नं. ४

प्रकाशक
ज. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई नं. ४

# प्रथमचे दोन शब्द

नवीन लग्न झालेल्या वधूबरोबर पाठराखीण पाठविण्याची पद्धत जशी प्रौढ विवाहानें बंद पाडली त्याचप्रमाणें पुस्तकाच्या पाठची प्रस्तावनाही हल्लीं नामशेष झाली आहे. मीही तोच मार्ग अनुसरणार होतों. पण 'पहिल्या'च्या मायेला बळी पडून या माझ्या ललितवाङ्मयक्षेत्रांतील पहिल्या धाडसाचा प्रस्ताव करीत आहें.

लघुनिबंधाच्या तंत्रावर मराठींत अजून फारसें लिहिलें गेलेलें नाहीं. निदान १९३२ च्या सुमारास तर तें अगदींच नव्हतें. त्या वेळीं बडोद्यांतील 'कप्तान' साप्ताहिकाचे संपादक माझे मित्र रा. वसंतराव कप्तान यांच्या आग्रहानें या विषयावर 'लघुनिबंध म्हणजे काय ?' हा एक लघुनिबंधच मी लिहिला होता. तो या संग्रहांत पुनर्मुद्रित केला आहे. या लेखांतील माझी भूमिका शिक्षकाची नाहीं. लघुनिबंधाकडे पहाण्याचा माझा दृष्टिकोन काय एवढेंच त्यांत दिसेल. पुढें ठेवलेला आदर्श अनुसरण्याचा पुरेसा प्रयत्न तरी माझ्या हातून झाला आहे कीं नाहीं याविषयीं मी साशंक आहें.

सुमारें १० वर्षांपूर्वी लिहिलेले कांहीं लघुनिबंधही या संग्रहांत आहेत, आणि कांहीं अगदीं अलीकडे लिहिलेले आहेत. बैलगाडीच्या चालीप्रमाणें अगदीं सावकाश लिहिणाराची हीच गत व्हावयाची नाहीं तर काय ? तरी या दोहोंत लेखनाच्या दृष्टीनें बराचसा फरक आढळल्यास वाचक मित्रांनीं तिकडे सहानुभूतीनें पहावें एवढी प्रार्थना.

• ज्या ज्या संपादकांनीं माझे हे लघुनिबंध मुळांत छापले व मला उत्तेजन दिलें त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. त्यांतही 'किर्लोस्कर'च्या संपादकांचा या बाबतींत मी अतिशय ऋणी आहे.

माझे मित्र '**मौज**'चे रा. ज. पु. भागवत यांनीं या पुस्तकाच्या मुद्रण व प्रकाशनाच्या कामीं जें अमोल सहाय्य केलें त्याबद्दल मीं त्यांचा फार ऋणी आहें.

माधवभुवन,
बडोदें.
फेब्रुवारी, १९४१

**श्री. स. भावे.**

ति॰ दादांना

# अर्पण.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | लघुनिबंध म्हणजे काय ? ... | १ |
| २ | एक अनुभव. ... ... | ७ |
| ३ | एका शिवमंदिरांत. ... ... | १५ |
| ४ | स्मरण. ... ... ... | २२ |
| ५ | दिवाळी. ... ... ... | ३० |
| ६ | ट्रॅमगाडींत— ... ... | ३७ |
| ७ | एक शोध. ... ... ... | ४५ |
| ८ | चांदोबा आणि चांदणें. ... ... | ५२ |
| ९ | बैलगाडीचा प्रवास. ... ... | ६० |
| १० | रविवार. ... ... ... | ७१ |
| ११ | नर्मदेंतला गणपति. ... ... | ८१ |
| १२ | कोकणचे कातळ. ... ... | ९० |
| १३ | पहिली उडी .... .... .... | ९८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ६१८२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# लघु-निबंध म्हणजे काय ?

लघुकथा सर्वांच्या परिचयाची आहे. परंतु तिचा धाकटा भाऊ शोभणारा लघु-निबंध पुष्कळांना अजून परकासा वाटतो. महाराष्ट्र शारदेच्या साम्राज्यांतील या नवीन बालकाबद्दल पुरती माहिती नसल्यामुळें कित्येकांना त्याला नांवें ठेवण्याचा मोह आवरत नाहीं. आणि एवढें खरें कीं, या बालकाचा महाराष्ट्र वाङ्मयांतील अवतार अगदीं अलीकडचा असल्यामुळें त्याचें बाळलेणेंसुद्धां कसें असावें तें पुरतें ठरलेलें नाहीं. आपापल्या हौसेप्रमाणें जो तो वाङ्मयोपासक या बाळाला नटवीत आहे. पण असले आहेर त्याला अजून फारसे मिळालेले नाहींत. तथापि हळु हळू या बालकाची योग्य संभावना होत जाऊन तो सरस्वतीच्या क्रीडांगणावर खेळणारा एक पटाईत गडी होईल अशीं चिन्हें दिसत आहे. याचा पहिला अवतार फ्रेंच वाङ्मयक्षेत्रांत झाला. त्याच्या तेजानें व सौष्ठवानें मोहीत होऊन आंग्ल-

---

१. सुमारें आठ वर्षांपूर्वी केलेलें हें विधान आहे.

शारदेनें त्याला दत्तक घेतलें. सतत पावसाळ्याची व समुद्राच्या वाऱ्यानें खारी झालेली इंग्लंडची हवा त्याला फारच मानवली. महाराष्ट्र शारदेनें त्याला आतां मांडीवर घेतलें आहे व हें दत्तविधान यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. मग याचें स्वरूप तरी कोणतें ?

लघुनिबंधाचें पहिलें लक्षण म्हणजे तो आपुलकीच्या भावनेनें लिहिलेला असला पाहिजे. लघुनिबंधलेखकाची भूमिका एखाद्या वक्त्याची किंवा तत्त्ववेत्त्याची नसून चार गोड गोष्टी बोलणाऱ्या जिवाभावाच्या मित्राची असते. 'वाचक आणि लेखक यांचीं मनें अगदीं खुल्या दिलानें एकत्र भेटवून आणणारा एक मध्यस्थ' असेंही लघुनिबंधाचें वर्णन करण्यास हरकत नाहीं. आपलें ह्मद्गत अगदीं मोकळेपणानें सांगण्याचा हेतु धरूनच लघुनिबंधकार आपल्या लेखनाला प्रवृत्त होत असतो. तत्त्वज्ञानांतील घटपटाची खटपट लघुनिबंधांत केव्हांही पहावयास मिळणार नाहीं. ज्या ज्या रीतीनें लेखकाचें व्यक्तित्व वाचकाच्या मनावर ठसविलें जाईल त्या त्या सर्व रीतींचा उपयोग लघुनिबंधांत केलेला असतो. परकेपणाला त्यांत वावच नाहीं. एकाद्या कवीनें आपलें ह्मद्गत काव्यद्वारा खुलें करण्याचा प्रयत्न केला तरी कवि आणि वाचक यांच्यामध्यें पद्यरचनेचा, झिरझिरीत कां होईना, पण पडदा असतोच. आणि आपण चार गप्पा मारणार त्या पद्यांत थोड्याच असणार? अर्थात् लघुनिबंधकाराला पद्याची सुद्धां आडकाठी ठेवावयाची नसते. आणि म्हणूनच त्याला अगदीं आपुलकीच्या भावानें बोलतां येतें. आपला एकादा अनुभव, आपण पाहिलेला एकादा प्रसंग, किंवा आपल्या माहितींतील एकादी गोष्ट निमित्त म्हणून पुढें करून लघुनिबंध–लेखक स्वत:चें म्हणणें वाचकांपुढें मांडीत असतो. एकाद्या विषयावर पुष्कळ वाचून व विचार करून जेव्हां एकादा प्रबंध–लेखक आपले गंभीर विचार आपल्या पुढें मांडतो त्या वेळेस त्या विषयाकडे पहाण्याची त्याची

दृष्टि अर्थात्‌च एकाद्या तिऱ्हाइतासारखी असते. कारण त्या विषयाचा सांगोपांग परामर्ष त्याला घ्यावयाचा असतो. पण लघुनिबंधकाराला याहून जास्त जवळचें नातें ठेवावयाचें असतें. एकाद्या विषयाकडे पहाण्याचा त्याचा स्वत:चा दृष्टिकोण काय आहे हें त्याला दाखवावयाचें असतें. वस्तूला नानाप्रकारच्या बाजू असतात आणि स्वत: पाहिलेली बाजू लघुनिबंधकार लोकांपुढें मांडीत असतो. मात्र हें त्याला फार कौशल्यानें करावयाचें असतें.

आणि याच ठिकाणीं लघुनिबंधाच्या दुसऱ्या लक्षणाकडे आपण वळतों. लघुनिबंधामध्यें कलाविकास पाहिजे. आपले अनुभव व विचार लोकांपुढें मांडतांना फारच कुशलतेनें मांडले पाहिजेत. आपल्या नाना प्रकारच्या अनुभवांपैकीं सर्वच सर्वांनीं जाणण्याच्या लायकीचे नसतात. त्यांतील विशिष्ट विचार विशिष्ट रीतीनें मांडले तरच त्यांना लघुनिबंधांत स्थान मिळेल. एकाद्या मालाकाराला नाना प्रकारच्या फुलांतून कांहीं फुलांची निवड करून मग सुंदर माळ रचावयाची असते. निवड व सजावट हेच त्याचे दोन मुख्य गुण. लघुनिबंधकारालाही आपल्या विचार–पुष्पांची निवड व सजावट योग्य रीतीनें करावी लागते. व याच ठिकाणीं त्याचा कलाविकास दिसून येतो. लघुनिबंध म्हणजे भाकडकथा नव्हे. सुश्लिष्टता व सुलभता हे तर त्याचे मुख्य विशेष. आपलें सर्व ज्ञानवैभव व अनुभवसुवर्ण खर्च करून लघुनिबंधकार आपले विचार सजवितो. मात्र कोणता विषय त्यानें घ्यावा याबद्दल निर्बंध नाहीं. कवीप्रमाणें तोही निरंकुश आहे. रस्त्यावर पडलेल्या एकाद्या टांचणीवर लिहिलेला लघुनिबंधही मानवी जीविताच्या एकाद्या अंशावर प्रकाश पाडील. कोणाही लघुनिबंधलेखकाकडे वळावयाचें तें त्याच्या विषयाकरितां नव्हे, तर त्याच्या ज्ञानाचा विकास पहाण्यास मिळावा म्हणून. तो ज्ञानविलास भावनांनीं निर्माण केलेला असो, कीं बुद्धीनें

प्रेरित झालेला असो. निबंधकाराचें मुख्य काम एवढेंच कीं, त्यानें आपल्या लेखनशैलीनें व विचारपरंपरेनें आम्हाला संतोषवून शक्य तर आमच्या समोरील जीवनावर आपल्या प्रतिभेचा प्रकाश पाडावा. तो प्रकाश आगकाडीच्या प्रकाशाएवढा अल्प असला तरीही चालेल. आपल्या अनुभवसमुद्रांत पुनः पुन्हां बुड्या मारून एकाद्या पाणबुड्याप्रमाणें प्रत्यहीं नवीं नवीं रत्नें हुडकून आपल्या वाचकांना प्रेमानें अर्पण करणें याचेंच नांव खरें लघुनिबंधन. हीं सुंदर रत्नें त्याच्या कलाविकासाचीं फळें होत.

मात्र हें अगदीं रामदासांच्या रामनामाप्रमाणें 'अती साजिरें, स्वल्प, सोपें' असें असलें पाहिजे. त्यांत कृत्रिमता उपयोगाची नाहीं. कृत्रिमतेचा अभाव हें लघुनिबंधाचें आणखी एक लक्षण होय. कृत्रिमता असली तर लघुनिबंधाचें जीवितच संपलें म्हणून समजावें. मात्र कृत्रिमता नसावी याचा अर्थ कला असूं नये असा नाहीं. किंबहुना त्यांतील कला गुणांनीं युक्त असली तरच तो निबंध शोभून दिसेल. पण तो सुटसुटीत असावा. त्यांतील विनोद मुद्दाम आणलेला असूं नये. तो आलेला असावा. हंसत खेळत बोलणारें ज्ञान हें तर लघुनिबंधाचें जनक असतें. पण त्याचें हंसणें कृत्रिम व बोलणें वरवरचें नसावें. त्यांत साधेपणा असावा, पण गबाळपणा असूं नये; कला असावी, पण नखरा असूं नये; हास्य असावें, पण उपहास असूं नये. कारण लघुनिबंध लेखक जगन्मित्र असतो. सर्वांजवळ त्याला आपल्या लेखनामार्फत बोलावयाचें असतें. त्याला शक्य तर कोणाला दुखवावयाचें नसतें. अर्थात् जगाकडे पहाण्याची एक सहानुभूतिपर दृष्टि त्याच्याजवळ असावी लागते. त्याच्या निबंधरूप संगतींत सर्वांना अवकाश मिळावयास पाहिजे असतो. अर्थात् जीविताचा हा अफाट पसारा, व्यक्ति व उक्ति यांची त्याला माहिती असावी लागते आणि–

' संसृतिकोलाहलें तापल्या जीवाला रंजवी '
हें कवीचें कामही त्याला बजावावयाचें असतें. अर्थात् साधेपणा व सुटसुटीतपणा या गुणांनीं त्याच्या लेखनाला विशेष मदत होईल यांत शंका नाहीं.

अशा प्रकारचा हा वाङ्मयप्रकार अलीकडच्या काळाला अगदीं साजेसा आहे. सुटसुटीत पण मनोरंजक, शक्य तर मनोबोधक असें कांहीं तरी विसाव्या शतकांतील उद्योगव्यापृत जनतेला पाहिजे असतें. लांब प्रबंध वाचावयास कोणाला वेळच नसतो. शिवाय प्रत्येकजण आपापल्यापरी विद्वान् असतोच. म्हणून विद्वत्ताप्रचुर नाहीं, पण ज्ञात्या वाचकाला जरा डोलविण्यास लावणारा असा हा वाङ्मयप्रकार पाश्चात्य भाषांतून फारच लोकप्रिय झाला आहे. व उत्कर्षेच्छु अशा मराठी भाषेंत त्याला स्थान मिळालें पाहिजे व मिळतही आहे. उपरोक्त वाङ्मय प्रकाराला ' लघुनिबंध ' असें नांव बऱ्याच जणांकडून देण्यांत आलें आहे व तें योग्यही आहे. प्रो. फडके यांच्या ' गुजगोष्टी ' याच सदरांत मोडतील. पण ' गुजगोष्टी ' या नामाभिधानांतून कलाविकासाचा ध्वनि निघत नाहीं.

एका प्रसिद्ध इंग्रजी लेखकाच्या शब्दांत या विषयाचा उपसंहार करावयाचा म्हणजे " An attempt brief and fragmentry but always sincere, to express a problem in one's personality " हेंच काय तें लघुनिबंधाचें सार. लघुनिबंधानें वाचकाला चार सुसंस्कृत विचार मिळाले पाहिजेत ही प्रथम गोष्ट. हे विचार जितके आपुलकीनें सांगितले असतील तितके अधिक चांगले. त्यांत विनोद असला तर सोन्याहून पिवळें. आणि त्यांतही जातां जातां एकादा नाजुक बोध मिळाला तर फारच श्रेयस्कर. आतां विषय कोणता असावा ? त्याला मर्यादा नाहीं. भिकारी, तारेचा खांब, एकादी जाहि-

रात, चाकू, स्वयंस्मश्रू करून निकामी झालेलीं पातीं इत्यादि सीतेच्या नखापासून रामाच्या केसापर्यंत वाटेल तो विषय त्याच्या कक्षेंत येऊं शकतो. तो किती मोठा असावा, तेंही ठरलेलें नाहीं. मात्र तो आटोपशीर असावा. आणि त्यांत इतर कांहीं असो वा नसो. लेखकाची एकादी विचार–ऊर्मी त्यांत सांठविलेली असावी; फक्त तिला औचित्याचें निबंधन व कलाविकासाचें कोंदण असावें एवढेंच.

‘ **कप्तान**, ’ ३ मार्च १९३२

# एक अनुभव.


माझे एक गरीब मित्र बारा महिने बत्तीस काळ छत्री उघडून रस्त्यांतून फिरतात. पावसाळ्यांत छत्री घेऊन फिरण्याबद्दल त्यांना कोणी नांवें ठेवीत नाहीं. वास्तविक पावसाळ्यांत म्हणजे छत्रीची मोठीशी जरुरी आहे असें नाहीं. कारण छत्री ज्या उद्दिष्ट हेतूनें वापरण्यांत येते तो सिद्धीस जाणें ‘वॉटर-प्रूफ्’ छत्र्या निघाल्यापासून हल्लीं बहुतेक अशक्य झालें आहे. कारण त्या छत्र्या ‘वॉटर-प्रूफ्’ म्हणजे पावसाच्या पाण्याचें अस्तित्व सिद्ध करून देणाऱ्या असतात. तथापि पावसाळ्यांत छत्री शरीररक्षणाकरितां वापरावयाची नसली तरी अब्रूरक्षणाकरितां वापरावी लागते. कारण, छत्री न वापरल्यास चिक्कूपणाचा दोष खास माथीं मारला जावयाचा ! पण आमचे उपरिनिर्दिष्ट मित्र छत्रीला कधींही विसंबत नाहींत; पाऊस असो वा नसो, छत्री त्यांच्याजवळ असावयाचीच. याबद्दल आम्हांला पुष्कळ दिवस गूढ होतें. कित्येक म्हणत कीं, ते भिक्षापति आहेत तरी

त्यांना अक्षरशः छत्रपति बनावयाचें आहे. कित्येकांचा तर्क असा होता कीं, कांहींतरी विचित्र वृत्ति ठेविली म्हणजे लोकांचें लक्ष वेधलें जातें या तत्त्वाचा उपयोग ते करून पहात आहेत. कांहींच्या मतें

**'चंद्रा जैसा परिवेष तशी शोभविशी मम मुखा**
**दागिना कोण तुझ्यासारिखा ?'**

ह्या साहित्य-सम्राट कोल्हटकर यांनीं केलेल्या छत्रीच्या मोहक वर्णनानें भुलून जाऊन त्यांनीं छत्रीला आपली कायमची सहधर्मचारिणी बनविली असावी. अशा रीतीनें भास नांवाचा कवि होता कीं नाहीं इत्यादि महत्वाच्या गोष्टींबद्दल पुराणशास्त्रज्ञ सुद्धां तर्कवितर्क करीत नसतील इतके तर्कवितर्क आमच्या मित्राच्या अखंड छत्रीधारणाबद्दल आम्हीं केले. पण तो कसला खमंग ! आमचे तर्क ऐकून घेऊन गौप्यभेदनांत पराजित झाल्याबद्दल तो आम्हांला किंचित् उपहासात्मक हास्यानें उत्तर देत असे. पण एके दिवशीं त्याचें तें गौप्य आपोआप बाहेर आलें.

मी व माझा मित्र 'प्रातःसंचारा' करितां एका रविवारीं बाहेर पडलों होतों. अर्थातच आमच्या मित्रवर्यांची छत्री उघडी होती. व नेहमींच्या सरावानें प्राप्त झालेल्या ऐटींत त्यांनीं ती धारणा केली होती. मींही आदल्या दिवशीं धोब्याकडून आणलेला माझा 'शार्ट् कोट' घालून, कोटाखालीं धांवत जाणाऱ्या शर्टच्या टोकांना सावरीत सावरीत चाललों होतों. हिंवाळ्यांत ऐन सकाळीं छत्री उघडून आपण चाललों आहों व कांहीं वात्रट मुलें, "ओहो ! काय पाऊस पडतो आहे हो ?" असें पुनः पुन्हां ओरडून आपली थट्टा करीत आहेत याकडे आमच्या मित्राचें लक्षही असल्याचें दिसत नव्हतें. इतक्यांत आम्हीं ज्या पादमार्गावरून चाललों होतों त्यालगतच्या एका



चाळीच्या तिसऱ्या मजल्यावरून कांहीं तरी एकदम खालीं आलें ! पहातों तों माझ्या परीटघडी कोटावर स्वयंपाक घरांतील कांहीं निवडक पदार्थ मोठ्या दिमाखानें आपलें अस्तित्व ठसवीत होते. माझ्या टोपीवर दोन केळ्याच्या साली पडल्या होत्या व रागानें वर तोंड करून पहातों तों बरीचशी राख द्रुतगतीनें माझ्या डोळ्यांत शिरली व मला तिनें खालीं पहावयास लाविलें. चुलीमागील केराचें भांडें कोणीतरी आमच्या डोक्यावर मोकळें केलें होतें ही गोष्ट आतां स्पष्ट झाली होती. न्याय्य कोपाचे कांहीं शब्द मी आपल्याशीं पुटपुटत होतों; पण माझा मित्र मोठमोठ्यानें हंसत होता; त्याच्या छत्रीनें या वेळीं त्याचें रक्षण केलें होतें. छत्रीलाही बराच 'प्रसाद' मिळाला होता. मोठ्या अभिमानानें छत्रीकडे



पहात तो मला म्हणतो, " कळलं का अखंडछत्रधारणाचं खरं मर्म ? मजल्यावरून खालीं वाटेल तें फेकतांना लोक इतरांबद्दलच्या आपल्या जबाबदारीच्या कल्पना बंद करीत असतात म्हणून मी छत्री नेहमीं उघडीत असतों. " इतकें बोलत बोलत तो केव्हां दूर झटकला तें माझ्या लक्षांतही आलें नाहीं.

माझ्या परीटघडी कोटाच्या " ट्रॅजिक् " अवस्थेकडे मी पहात होतों. मला अपकार करणारी व्यक्ति अदृश्य असल्यामुळें, फक्त दांत ओंठ खाण्याशिवाय माझ्या हातीं या वेळीं कांहींच नव्हतें. मोंगलांच्या वेळीं कांहीं मराठे हेरांना, कोणा एका मदांध मुसलमान कोतवालानें राखेचे तोबरे दिल्याची हकीकत वाचतांना मी अतिशय चिडलों होतों तें या वेळीं मला स्मरलें. पण मुंबईंत दिवसाढवळ्या मजसारख्या एका निरपराध माणसाला एका व्यक्तीनें राख चारावी व मला त्याबद्दल कांहीं करतां येऊं नये याची मला अतिशय चीड आली. जिना चढून वरतीं जावें तर एवढ्या धांदलींत ती खिडकीसुद्धां मी विसरलों होतों. बरें, कोणत्या खोलींतून केर आला म्हणून चौकशी करावी तर मुंबईचे उद्योगप्रिय लोक उत्तरा-ऐवजीं दुरुत्तरें मात्र द्यावयाचे व वेडेपणा पदरीं यावयाचा. मी सरळ घरचा रस्ता धरला.

मनांतही नानाप्रकारचे विचार येऊं लागले. माझी एक गोष्ट सोडा; माझें काय तें सकाळचें फिरणें थांबलें व कोटाचें एक ' वॉशिंग ' फुकट गेलें. पण हाच प्रकार दहा साडे दहाच्या सुमारास ऑफिसमध्यें निघा-लेल्या एखाद्या कारकुनाच्या बाबतींत झाला असता, तर त्या बिचाऱ्याचें किती नुकसान झालें असतें ! ऑफिसांत वेळीं हजर रहाण्यास चुक-ल्याबद्दल या काटकसरीच्या दिवसांत तो बिचारा नोकरीला मुकला असता. संध्याकाळच्या वेळीं " मलबार गार्डन " वरील संकेतस्थळीं

त्वरेनें जाणाऱ्या तरुणावर असली आपत्ति कोसळली असती तर कोपानें रक्तनयन झालेल्या तरुणीपुढें नाक घासतां घासतां बिचाऱ्याच्या नाकीं नऊ आले असते. मजल्यावरून बेफिकीरपणें खालीं केर टाकणें ही गोष्ट दिसण्यांत साधी खरी; पण परिणामीं फार दुःखद आहे.

अशा आणखी कित्येक गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर यावयास लागल्या. माडीवर उभें राहून रस्त्यावर ष्ठीवनप्रयोग करणें, फुटलेल्या पदार्थांचे अवशेष सहज लीलेनें रस्त्यावर फेंकणें, फळांच्या सालींना पादमार्गाचा रस्ता दाखविणें इत्यादि अपराध—नव्हे गुन्हे म्हटलें असतांही चालेल—शिक्षेस पात्र केले पाहिजेत असें सुद्धां मला एकवार वाटलें. परंतु राष्ट्रीय नियमावलींतील या गोष्टींचें अस्तित्व म्हणजे राष्ट्राचें तें एक सर्वसंमत "मदर इंडिया"च नाहीं का होणार ?

थोड्याशा व्यवस्थित वागणुकीनें असल्या गोष्टी सहज बंद होतील. 'दानाला सुरुवात घरीं होते' अशा अर्थाची एक प्रसिद्ध इंग्रजी म्हण आहे. मला वाटतें परपीडा न करण्याचे धडे सुद्धां प्रथम घरांतच गिरवावे. घरांतील केरकचऱ्याची येणाराजाणारावर बिनदिक्कत वृष्टि करण्यापेक्षां रस्त्यावरील केराच्या कुंडीचा त्या कामीं उपयोग करण्यास मोठासा स्वार्थत्याग लागत नाहीं. पण मजल्यावर रहाण्यास मिळणें म्हणजे शिक्षेला पात्र झाल्याशिवाय वाटेल तें खालीं फेकून देण्याची सनद मिळणें असा गैरसमज पुष्कळ व्यक्तींनीं दुर्दैवानें करून घेतलेला असतो. रस्त्यावर फेकलेल्या कांचेच्या तुकड्यांनीं कोणा अनवाणी माणसाच्या पायाला अगर शिरोवेषविरहित चालणाऱ्या एखाद्या माणसाच्या डोक्याला जखम झाली तर आपल्या हातून नकळत, पण केवढा मोठा अत्याचार होत आहे याचा नुसता विचार सुद्धां कोणी करीत नाहीं; व स्वतः विचारी बनण्याऐवजीं उलट इतरांना—कांहींसें अजाणतेपणें—आपल्या

सारखे अविचारी बनविण्याचें काम मात्र पुष्कळजण करीत असतात. धाकट्या रामूनें पेला फोडल्यास किंवा खेळतांना विमलची बांगडी वाढविल्यास 'दे खालीं फेकून' असा हुकूम फर्माविणारीं आईबापें पुष्कळ; पण असें करण्यानें स्वतःची जबाबदारी आपण विसरत आहों ही गोष्ट त्यांच्या बालमनावर कोणी बिंबवीत नाहीं व ही अनर्थपरंपरा अव्याहत सुरू रहाते.

अव्यवस्थितपणाबरोबर आळसाकडे या बेजबाबदारीच्या जनकत्वाचा मान येईल. केळें खाऊन रस्त्यावर साल न टाकण्याला फार कष्ट पडत नाहींत. पण एवढी उठाठेव करतो कोण? केळ्याच्या सालीवरून पाय घसरल्यामुळें एकाद्या लठ्ठ मनुष्याला धांवत्या मोटारींना लोटांगण घालावें लागलें तर आपण बरेचसे हसूं मात्र. यांत आमचा खेळ होतो कीं नाहीं कोण जाणें; पण दुसऱ्याचा जीव मात्र जातो खास. याला प्रत्यक्ष पुरावा आहे. एका म्हातारीच्या मरणाबद्दल कांहीं दिवसांपूर्वी मुंबईच्या कॉरोनर साहेबांनीं चौकशी केली; केळ्याच्या सालीवरून पाय घसरून ती आजारी पडली व त्यामुळें तिचा अंत झाला असा त्यांनीं निकाल दिला. केळें खाण्याचा आनंद आपणाला, व पाय घसरून मरणाचा मान दुसऱ्याला, या अन्यायाचें परिमार्जन व्हावयास नको काय? असे हजारों अन्याय सांगतां येतील. त्यांची यादी करूं गेल्यास रामदासांच्या मूर्खलक्षणांची 'सुधारलेली' आवृत्ति काढावी लागेल!

पादमार्गावरील या कटु अनुभवानें माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. कॉलेजमधील चितारलेल्या भिंती पाहून आमच्या प्रिन्सिपॉल साहेबांनीं रागानें व कळकळीनें एक व्याख्यान दिलें होतें त्याची मला आठवण झाली. "या लहान जबाबदाऱ्या ओळखण्यांत मोठेपणाचें

बीज आहे," हें त्यांचें वाक्य मी आतांच ऐकत आहें असें मला भासलें. प्रिन्सिपॉल साहेबांचें व्याख्यान ऐकतांना आम्हीं नुसत्या माना डोलविल्या होत्या. 'अनुभवावीण मान हालवूं नकोरे' या कवीच्या उपदेशांतील मर्म या वेळीं मनांत बाणलें होतें. मी स्वत:सुद्धां कित्येक वेळां आंब्याच्या साली, फुटलेल्या थर्मामिटरचे तुकडे रस्त्यावर टाकले तें या वेळीं नाकबूल कसें करूं? मघांच राखेनें मला खालीं पहावयास लाविलें होतें; पण आतां लज्जेनें मी अधोवदन झालों. काय हें आमचें 'परोपदेशे पांडित्यम्?'

माझ्या मनांत पुन: एकदां विचारांची उसळी आली.

मनुष्य स्खलनशील असेल; पण सर्वच ठिकाणीं ही सबब काय उपयोगाची? परोपकाराचें पुण्य संपादावयाचें तर परपीडेचें पाप प्रथम टाळलें पाहिजे. सार्वजनिक स्वातंत्र्याकरितां व्यक्तिस्वातंत्र्याचा यज्ञ करणें अवश्य असतें. 'स्वातंत्र्य–रक्षणाकरितां आपण नियमांची गुलामगिरी पत्करली पाहिजे' असें एक पाश्चात्य तत्त्ववेत्ता म्हणतो. हे नियम पाळण्यांत पुण्यच आहे. लहान लहान सत्कृत्यांच्या असल्या थेंबांनींच भावी लोकसेवेचें तळें सांचत असतें. 'आपल्या शेजाऱ्यावर प्रेम ठेवा' या ख्रिस्ताज्ञेंतून 'आपल्या शेजाऱ्याला निदान त्रास देऊं नको' एवढा अर्थ तरी कमींतकमी खास निघतो. इंग्रजी बॅन्ड्ची नवी प्लेट लावतांना लगतच्या खोलींत अभ्यास करणाऱ्या गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्याला त्रास होईल ही गोष्ट लक्षांत ठेवून नादसुखाचा अनुभव सोईस्कर वेळीं घेणें न्याय्य ठरेल. सामुदायिक जीवनाच्या या पवित्र आचार-मर्यादा होत. पण या मर्यादांच्या अभावीं, जोंपर्यंत पानपट्ट्यांच्या मुखरसानें चितारलेले जिने नयनांना खिन्नता आणीत आहेत, नगरमार्ग स्वच्छ करणाऱ्या कर्तव्यदक्ष सेवकांना फुटक्या काचांनीं जोंपर्यंत दुखापत होत आहे आणि उच्च-

स्थानीं वास्तव्य करणाऱ्या लोकांकडून जोंपर्यंत पादचारी जनांवर केराची वृष्टि होत आहे, तोंपर्यंत माझे मित्र बारा महिने बत्तीसकाळ छत्री उघडून रस्त्यांतून फिरले तरी त्यांना कोणी हंसण्याचें मुळींच कारण नाहीं.

**'मनोरंजन'**, डिसेंबर १९३२

# एका शिवमंदिरांत

‘ आमचं तें सुंदर कोंकण पहाण्यास चल तरी ! ’ असा विनायकाचा मला नेहमीं आग्रह असावयाचा. शिवाय मे महिन्याची सुटी कोठें घालवावी हा दरसालचा प्रश्न यंदांही माझ्यापुढें दत्त म्हणून उभा होताच. अर्थातच सहाध्यायी मित्राच्या बोलावण्याला मान देण्याचें मीं ठरविलें; व त्याप्रमाणें परीक्षा आटोपल्याबरोबर आम्हीं दोघे बोटींत बसून रत्नागिरीस उतरलों व दोनतीन तासांचा पायीं प्रवास करून, विनायकाच्या बोलण्यांत नेहमीं झळकणाऱ्या ‘ सोनवें ’ गांवीं येऊन पोहोंचलों. सकाळीं गांवांतील घांटी उतरतांना धारेवरून एका मंदिराचा घुमट खोऱ्यांतील वनश्रींतून डोकावतांना मी पाहिला होता. संध्याकाळीं तिकडे जाण्याचें आम्हीं ठरविलें. आम्हीं मुंबईकर आणि डोंगरावर चैनीनें सहल करण्यास जाण्याच्या ऐवजीं कुसुमेश्वराच्या देवळांत दर्शनास जात आहोंत, याचें विनायकाच्या वृद्ध आजोबांना जरा आश्चर्य वाटलें. वनश्री–दर्शनाचा

आमचा ऐहिक हेतु बाहेर न दाखवितां देवदर्शनाच्या निमित्तानें मिळालेल्या चांगुलपणाबद्दल थोडें विनयप्रदर्शन करून आम्हीं मंदिराकडे जाण्यास निघालों.

' कुसुमेश्वर ' हें नांव मला फार गोड वाटलें. चालतां चालतां माझ्या मित्राला माझें संस्कृत ज्ञान दाखवीत मीं म्हटलें, " अरे, कुसुमेश्वर हा षष्ठीतत्पुरुष समास आहे, नाहीं का ? तुझ्या गांवांतील हा सांब कुसुमांचा ईश्वर आहे. " " पण, मला वाटतं, " शांतपणें उत्तरपक्ष करीत विनायक म्हणाला, " हा समास मध्यमपदलोपी म्हणून सोडविलेला जास्त सयुक्तिक; कारण कुसुमांचा ईश्वर असें म्हणण्यापेक्षां, कुसुमप्रिय–ज्याला फुलांची अतिशय आवड आहे असा–ईश्वर हें म्हणणें अधिक काव्यमय आहे. शिवाय, तो शंकर सर्व चराचराचा ईश्वर असतांना, केवळ व्याकरणाच्या खटाटोपानें तूं त्याला फक्त फुलांचा ईश्वर बनवूं पहातोस हें किती अन्याय्य आहे ! " अशा रीतीनें कोंकणांत प्रचलित असलेल्या सिद्धेश्वर, चण्डेश्वर, तृणबिन्दुकेश्वर इत्यादि शिवनामांची आम्हीं चालतां चालतां थोडीशी चर्चा केली. आमचें बोलणें होत आहे, तों आम्हीं गांवांतील नदीजवळ आलों. पलीकडील पिंपळाचीं, वडाचीं व बेलाचीं बरीचशीं झाडें व त्यांतून डोकावणारा देवळाचा भाग आम्हांस दिसावयास लागला. क्वचित् ऐकूं येणारा घंटांचा आवाज कोणी दर्शनास आल्याची सूचना देत होता. घंटांचा प्रतिध्वनि, पारावरील पिंपळाच्या पानांची सळसळ व नदीच्या पाण्याची थोडीशी खळखळ यांचा संमिश्र आवाज कानाला फार मधुर लागत होता. हृदयांतील कोणत्या तरी अज्ञात संवेदनेशीं त्याचा सूर मिळत होता.

नदीच्या स्फटिकमय पाण्यांत पाय धुवून आम्ही मंदिरापाशीं गेलों. शांततेबरोबर जिकडे तिकडे औदासीन्याचें राज्य पसरलेलें दिसत होतें.



देवळासभोंवार असलेली चिरेबंदी पोंवळी ठिक-ठिकाणीं मोडकळीस आलेली होती, व त्यांतून वाळलेल्या वनस्पतींचे अवशेष वाऱ्याबरोबर हालत होते. देवासमो-रील भव्य नंदी एक-सारखा समोर बसून कांहीं तरी गूढ व खिन्न विचारांत गर्क झाल्यासारखाच दिसत होता. देवळाच्या मुख्य गाभाऱ्याच्या भिंतींत उजव्या बाजूस एक कोनाडा होता. त्यांत गणरायांची स्वारी विरा-जमान झाली होती. त्यांच्या डोक्यावर छत्रा-प्रमाणें शोभणारी नागाची फणा कित्येक दिवसांत स्वच्छ न केल्यामुळें अगदीं विट-लेली दिसत होती. आपलें हें धन कुसुमे-श्वरांनीं चिरंजीवांकडे

कां दिलें होतें याचें गूढ मला उकलण्यासारखें दिसेना. विद्यानाथ गणरायांची पूजाही अगदीं काटकसरीनें केलेली दिसत होती. तांबड्या जास्वंदीचें एक फूल व थोड्याशा दुर्वा यांतच ते राजी दिसत होते. देवासमोर एका धुपाटण्यांत धूप अगर धूर यांचा पूर्ण अभाव असून, फक्त अंगारा म्हणून लावण्यास थोडीशी विभूति होती. शंकराच्या पिंडीच्या मागील बाजूस हिमराजकन्या पार्वतीची ओबडधोबड मूर्ति होती. कुमारसंभवाच्या पहिल्या सर्गांतील पार्वतीचें रमणीय वर्णन करणाऱ्या कालिदासानें ही मूर्ति पाहिली असती तर त्याला काय वाटलें असतें, असेंही एकवार माझ्या मनांत आलें. गाभाऱ्यांतील अंधाराची भीषणता आंत मिणमिण जळणाऱ्या एका लहानशा दिव्यानें द्विगुणित झाली होती. कुसुमेश्वराच्या पिंडीला लावलेल्या पांढऱ्या गंधाच्या दुबोटी पट्ट्यानें तिच्या गंभीरत्वाला विशेष स्वरूप आलें होतें. दुर्वा, बेल, फुलें, चन्दन व निर्माल्य यांचा मंद वास जिकडे तिकडे पसरला होता. त्या वासाच्या योगानें तेथील वातावरणाची गूढ सूचकता अधिकच परिणामकारक वाटत होती. दर्शनार्थ आलेल्या पाहुण्यांची चाहूल ऐकून देवापुढील पैसा उचलण्यास आलेला गुरवही देवाच्या गरीबीची साक्ष देत होता. आम्हीं ठेवलेली पैसासुपारी त्यानें उचलली व विनायकाशीं तो कांहीं गांवांतील गोष्टी बोलूं लागला.

मी एकटाच सभामंडपांत देऊळ व त्याच्या आसपासची शोभा पहात बसलों. देवळाशेजारींच एक जुनें तळें होतें. तांबडीं व पांढरीं कमळें वाऱ्यानें त्यांत डोलत होतीं. जवळच कुंकुमकेसरीच्या झाडांना फुलांचा अगदीं भर आला होता. केसरी व शेंदरी रंगाचा तो ' वसंता ' चा पोषाख फार सुंदर दिसत होता. तेथेंच बाजूला कुड्याचीं कित्येक झुडपें आपल्या पांढऱ्या स्वच्छ झुपकेदार फुलांचा मंद सुवास हवेंत उधळीत होतीं. मधून मधून इतस्ततः

विखुरलेले एकब्रोकीच्या तांबडया जर्द फुलांचे भरींव घोंस तेथील रंगाच्या शोभेंत भर घालीत होते. कोंकण–वनश्रीनें या एकान्त स्थलीं नटण्याची अगदीं कमाल केली होती. अग्नि–मित्राच्या उद्यानांतील वसंतश्रीप्रमाणें कोंकणश्री देखील मुखप्रसाधनाच्या कलेंत नागर स्त्रियां-हून आपण किती श्रेष्ठ आहों असा डौल मिरवीत असावीशी दिसत होती. या सर्व शोभेवर खूष होऊन कुकुडकुंभा ( भारद्वाज पक्षी ) आपल्या खडया, पण आनंदी स्वरानें तेथील एकतानतेचा भंग करीत होता. आणि मधून मधून शेजारच्या नदीच्या पाण्यांत विहार करण्या-करितां जाणाऱ्या टिटव्या आपल्या 'टिटिव् टिटिव्' ची भर त्यांत टाकीत होत्या. अशा सुरम्य स्थळीं एक प्रकारचा अवर्णनीय आनंद अनुभविण्यास मिळत होता.

पण येथील आनंदाची कोणाला खिसगणती नव्हती. कांहीं थोडेसे भाविक लोक खेरीजकरून देवळापाशीं कोणी फारसें आल्याचेंही दिसत नव्हतें. इतकीं सुंदर फुलें तेथें होतीं, पण

**'कांहीं जाउनि बैसती प्रभुपदीं पापापदां वारितें'**

हें गोविंदाग्रजांनीं वर्णन केलेलें पुष्पांचें भाग्य त्यांच्या वांट्यास कोणी आणून दिलें नव्हतें. प्रत्यक्ष मंदिराची अनास्था तर बाहेरील सृष्टि-शोभेशीं पूर्णपणें विसंगत होती. नाना तऱ्हेच्या ऐहिक गरजा भाग-विण्याकडे मंदिराचा उपयोग करण्यांत आल्याचें दिसत होतें. उन्हा-ळचे शेतांतील कापलेले भाताचे भारे सभामंडपाच्या एका बाजूला रचून कोणा स्वार्थी मनुष्यानें मंदिराचें 'शेतघर' बनविलें होतें. देवळाच्या एका पडवींत गाईचें एक पाडस रवंथ करीत पडलें होतें. त्या देवळाची करुण कहाणी त्याच्या मुद्रेंत पूर्णपणें लिहिलेली दिसत होती.

देवळाची ही अवस्था म्हणजे आमच्या धर्माच्या करुण स्थितीची एक जाहिरातच होती. अशीं असंख्यात मंदिरें या भारतभूमींत इतस्ततः विखुरलेलीं आहेत; इतकीं कीं, ‘ देवळांचा देश ’ असें हिंदुस्थानचें वर्णन अगदीं यथार्थ वाटतें. भारतभूमीचें प्रतीक (symbol) म्हणून एखादें चित्र काढावयाचें झाल्यास एखाद्या वडाच्या अगर पिंपळाच्या झाडाखालीं एक टुमदारसें देऊळ रेखाटलें म्हणजे झालें. या मंदिरांचा अनक्षर संदेश जरा अंतर्मुख झाल्यास कोणासही वाचतां येण्यासारखा आहे. “ आमचें महत्त्व विसरूं नका ” असें आपल्या मूक भाषेनें तीं सांगत आहेत.

“ पारमार्थिक गोष्टी राहूंद्यात; पण ऐहिकदृष्ट्यासुद्धां या विसाव्या शतकांत आपल्या या मंदिरांना एक कार्य साधावयाचें आहे. आत्मप्रगतीचीं क्षेत्रें म्हणून तीं फार कार्यक्षम ठरतील. ‘ The world is too much with us ’ अशी वर्डस्वर्थनें स्वतःच्या राष्ट्राबद्दल केलेली तक्रार आम्हांलाही लागू पडण्यासारखी आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं; अशा वेळीं या मंदिरासारखीं रम्य स्थानें आपल्या जादूनें कोणालाही मोहून टाकतील. असल्या ठिकाणीं मनाला एकान्त मिळतो व एका अवर्णनीय शांततेची गोडी चाखावयास मिळते. विचार धांवण्यास लागतात; कल्पनांना गति मिळते; आत्मपरीक्षणाची संधि मिळते. देवदर्शनाच्या निमित्तानें मनोदर्शन होतें. कल्पनासृष्टीला अपूर्व चेतना मिळते; एका सुंदर अरण्यांतील शिवालयांत बसून कर्णमनोहर गान करणाऱ्या महाश्वेतेची आठवण होते.

**‘ अये गौरीनाथ त्रिपुरहर शंभो त्रिनयन ’**

असा आक्रोश करणारा भर्तृहरि आपल्या डोळ्यांसमोर उभा रहातो; हिमालयाच्या उत्तुंग बर्फाच्छादित शिखरावर स्वतः विषकण्ठ बनून जगाच्या कल्याणाकरितां तपश्चर्या करणाऱ्या शंकराचें स्मरण होतें...”

माझें विचारचक्र असें आणखी किती भ्रमण करीत राहिलें असतें कोण जाणें ! पण इतक्यांत " अरे, आपला वॉक् ध्यायचा राहिला आहे ! येतोस ना ? " असें मोठ्यानें म्हणत विनायक मजजवळ आला. मीही त्याच्याबरोबर डोंगराच्या बाजूस फिरण्यास जाण्याकरितां निघालों. संध्याकाळ होत आली होती. दूर कांहीं गुराख्यांच्या पाव्यांचे मधुर आलाप वाऱ्याबरोबर ऐकावयास येत होते. इतक्यांत संध्यासमयाचें सूचक म्हणून मंदिरांतील गुरवानें आपलें नित्य परिचयाचें शिंग वाजविलें. केशवसुताच्या तुतारीप्रमाणें त्याचा तो ओजस्वी आवाज ऐकल्याबरोबर एका श्रद्धाळु मनुष्यानें ' जय शंकर ! ' असा उच्चार करून हात जोडले. शिंगाचा प्रतिध्वनि डोंगराच्या बाजूनें परत आला. विनायकाबरोबर मी इकडे तिकडे हिंडलों खरा, पण त्या शिंगाचा तो भीषण रमणीय ध्वनि माझ्या कानांत मधून मधून गुणगुणत होता, आणि अजूनही पुष्कळदां मला त्याचा भास होतो.

**' विहार, '** १८ नोव्हेंबर १९३३

# स्मरण

सहामाही परीक्षेचा शेवटचा दिवस होता. एकदोन दिवसांत सुरू होणाऱ्या शरदनध्याया (October-Vacation) चा आनंद नुकताच उदयोन्मुख झाल्याचीं चिन्हें जिकडे तिकडे दिसत होतीं. त्याच आनंदाची मीही पण प्रतीक्षा करीत होतों. प्रश्नपत्रिका लिहीत बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें अतिशय सुखाची, पण प्रत्यक्ष अनुभवान्तीं अत्यंत कष्टदायक अशी निरीक्षका ( supervisor ) ची कामगिरी केव्हां एकदां आटपते असें मला झालें होतें. शेवटची घंटा झाली. स्वातंत्र्याच्या साम्राज्यांत मनमुरादपणें वावरण्यास विद्यार्थीवर्ग द्रुतगतीनें बाहेर निघून गेला. पण मी मात्र स्वतंत्र नव्हतों. गोळा केलेल्या पेपरांचे भारे बांधण्याचें व त्यांना क्रमवारीनें लावण्याचें अखेरीचें, पण अति कष्टमय असें काम करण्यांत मी दंग झालों होतों. आजूबाजूला नानातऱ्हेची गडबड सुरू होती. पायगाड्यांच्या घंटांचे घणघणाट, नुकत्याच लिहिलेल्या प्रश्नपत्रिकांसंबंधीं वादविवाद, कांहीं रिकामटेकड्यांचे

स्तुतिनिन्दापर प्रलाप—इत्यादिकांच्या संमिश्र आवाजांत काम करण्यास मला सुचतही नव्हतें. कसेंबसें पेपरांचें गांठोडें बांधून 'सुटलों एकदांचा या त्रासांतून' या तऱ्हेच्या समाधानकारक विचारांनीं मनाला उत्साह येतो न येतो तोंच, तो उत्साह पार मावळून जावयास लागला.

कॉलेजच्या आवारांत जिकडे तिकडे आनंदानें हिंडणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मला हेवा वाटावयास लागला. कित्येक जण वाचनालयांतून सुंदर पुस्तकें घेत होते; कित्येक आपल्या चिरपरिचित मित्रांशीं किंवा मैत्रिणींशीं गप्पा मारीत होते; कांहीं नुकताच मिळालेला कॉलेजमासि-काचा अंक हातांत घेऊन त्यांतील लेखक—लेखिकांवर टीका करीत होते. पुस्तकें आणि प्रोफेसर पाठीचे सुटल्याबद्दलचा आनंद सर्वांच्याच चेहे-ऱ्यावर दिसत होता. त्या सर्वांचा मला हेवा वाटत होता. त्यांचा आनंद पाहून माझें औदासीन्य वाढावयास लागलें. त्या सर्वांना सुटी म्हणजे कामापासून सुटका होती. पण माझ्या सुटीचा अर्थ वेगळाच होता. सुटी हें एक मला बंधन होतें. तपासण्याकरितां आलेल्या पेपरांचे ओबडधोबड भारे माझ्या मनश्चक्षूंपुढें या वेळीं थैमान घालूं लागले. दुसऱ्या सहामाहींत द्याव्या लागणाऱ्या व्याख्यानांची तयारी करण्याचें काम दत्त म्हणून पुढें उभें होतेंच. छे! असल्या दिवसांना सुटी कोण म्हणेल? शिवाय आश्विन—कार्तिकाचा हरणाच्या पाठीसुद्धां काळ्या करणारा उन्हाळा आपला प्रभाव दाखवूं लागलाच होता. विद्यार्थी असतांना मी केव्हां एकदां 'प्रोफेसर' होईन असें मला वाटत असे. पण माझ्या सुटीच्या दुःखाची कल्पना केल्यावर, 'मी पुन्हां एकदां विद्यार्थी होईन तर फार बरें' असें मला वाटावयास लागलें. माझ्या विद्यार्थीदशेंतील जीवन-क्रमाचे देखावे या वेळीं एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणें माझ्या डोळ्यां-समोरून भराभर जावयास लागले.

जिना खालीं उतरून, पायगाडीला गती देऊन, नेहमींच्या सरावानें

मी कॉलेजच्या आवाराबाहेर पडलों; एका हंसत खिदळत जाणाऱ्या विद्यार्थी-कम्पूनें माझ्या जाण्याची 'नोट' घेतली. तिकडे माझें लक्ष जरासें गेलें; पण त्यांची ती आनंदी वृत्ति पाहून, माझ्या कॉलेजांतील दिवसांच्या सुखस्मरणांत मी अधिकच गुंग झालों. ' बेजबाबदार आयुष्य; मनमुरादपणें केव्हांही, कोठेंही, कसेंही फिरण्याची मुभा; जिव्हाळ्याच्या स्नेह्यांची संगति, परीक्षेमागून परीक्षेच्या सतत चक्रामुळें ध्येयाची कधींही न पडणारी वाण; ज्ञानार्जनाचा सुकाळ—या आणि अशा अनेक तऱ्हेच्या सुख-मालिकांचें मला राहून राहून स्मरण होत होतें.

प्रखर उन्हाच्या त्रासानें कासावीस होऊन, पुढें सायकल मारतां मारतां मी मनांत म्हणालों, " हे स्मरणदेवते! तूं किती निष्ठुर आहेस? गत सुखाची आठवण देऊन, आम्हांला दुःखांत पाडणारी काय ही तुझी निर्घृण शक्ति ! " मला वाटलें, " हें स्मरणच नसतें तर किती बरें झालें असतें ? फुलपाखरांप्रमाणें इकडे तिकडे हिंडणाऱ्या, या विद्यार्थ्यांच्या समुदायाकडे पाहून, मला दुःख झालें नसतें. स्मरण नसतें तर गत मनुष्यांच्या आठवणी काढून अश्रू ढाळण्याची जरुरी नव्हती. तारुण्याच्या मूर्खपणांत वाया दवडलेल्या सुवर्णसंधीच्या आठवणीनें पश्चात्ताप करीत बसण्याचा प्रसंग आला नसता......बस्स्. स्मरणच जगांतून नाहींसें होईल तर फार चांगलें ! आपल्या या सुंदर सृष्टींतून विधात्यानें स्मरणाचा कांटाच काढून टाकावा ! गत सुखाची आठवण बुजल्यावर, मग चालू दुःखाला वावच कोठें राहिला ? ".......समोरून कर्कशपणें ओरडत येणाऱ्या आणि बेपर्वाईनें रस्त्यांतून आपलें मानवी व लोखंडी ओझें घेऊन धांवत जाणाऱ्या एका राक्षसी 'लॉरी'नें मला जागें केलें आणि माझ्या विचारांना कलाटणी मिळाली.

" स्मरणाचें मरण मला आठवलें खरें, पण विस्मरणाचा तडाका

त्याहून भयंकर आहे हें मी विसरलों. जिकडे तिकडे विस्मरणाचें राज्य पसरलें तर काय घोटाळा उडेल याची कल्पनाही करणें दुःखद आहे. आपलें बालक कोणतें हें माता विसरली तर काय होईल? प्रियेला पति विसरला तर संसारांत सार राहिलें कोठें? आणि संपादन केलेल्या विद्येचें अध्यापन समयीं स्मरण जर न राहिलें तर प्रोफेसरांचें मरणच ओढवेल म्हणावयाचें!"—माझें मन विषयाची दुसरी बाजू पाहूं लागलें. "छे! विस्मरणाच्या सुखापेक्षां स्मरणाचें दुःखच पत्करलें. किंबहुना स्मरण या शक्तीवरच जग बरेंचसें अवलंबून आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

How larger is remembrance than desire! असें कवी मायकेल फील्ड् म्हणतो तेंच खरें! इच्छा भावी गोष्टीवर अवलंबून असते, तर स्मरण गतगोष्टींशीं आपला संबंध जोडीत असतें. म्हणून इच्छा अपुरी रहाण्याचा संभव फार, पण स्मरणाची गति नेहमीं अकुंठितच. स्मरण हा एक ठेवा आहे.

**'न चोराला लाधे, प्रकट न दिसे, दे सुख सदा'**

हें विद्याधनाचें वर्णन स्मरणाच्या ठेव्यालासुद्धां अगदीं साजेसें आहे. मनाच्या फोनोग्राफांत स्मरणाची 'प्लेट' एकदा लावून दिली, म्हणजे आनंदाच्या गाण्याला तोटाच नाहीं..."

उन्हांतून सायकल मारण्यास पायांना कष्ट पडत असतां इकडे माझ्या बुद्धीला स्मरणाचा महिमा अधिक तीव्रपणें पटत होता...."कोणत्याही स्थळीं आणि कोणत्याही काळीं स्मरण हें आपल्या सेवेला तयार असतेंच. सर्व सृष्टीवर अप्रतिहत राज्य चालविणाऱ्या कामदेवाला 'स्मर' असेंच

नांव गीर्वाण भाषेनें दिलें आहे. स्मरणाच्या भात्यांतून काढलेले कामदेवाचे बाण खरे तीक्ष्ण असतात. सत्तत्त्वांचें आणि सज्जनांचें स्मरण रहावें, म्हणूनच स्मरणदीन साजरे करण्याची मनुष्यप्राण्यानें युक्ति काढली आहे. स्मरणाकरितांच लोक पुतळे उभारतात आणि स्मरणाकरितांच लोक फोटो काढतात."

कालिदासानें तर स्मरण आणि सौंदर्य यांचें साहचर्य ठिकठिकाणीं दाखवून दिलें आहे. चंद्रास्ताच्या वेळीं निस्तेज झालेल्या कुमुद्वतीचें वर्णन करतांना कण्वशिष्य 'संस्मरणीय शोभा' असें अर्थपूर्ण विशेषण तिला लावतो. प्रत्येक वर्णनाचें अधिष्ठान त्यानें स्मरणावरच ठेविलें आहे. पार्वतीचा सुंदर नेत्रकटाक्ष पाहिला म्हणजे अतिशय वाऱ्यानें सळसळ हालणाऱ्या वनांतील एकाकी सरोवरांत नाजूक रीतीनें इकडे तिकडे लुटलुट हेलकावे खाणाऱ्या एका कोमल नीलकमलाची कोणा सहृदयाला आठवण होणार नाहीं ? पावसाळ्याच्या आरंभीं सुंदर मेघावलि आपल्या धनगर्जितानें आकाशांत मिरवत असतां कोणत्या विरहिणीला आपल्या प्रियकराचें स्मरण होणार नाहीं ? बिचारी यक्षपत्नी तर स्मरणावरच जगली होती. ती स्वतः यक्षाचें स्मरण तर करीच, पण इतरांनाही त्याचें स्मरण होतें कीं नाहीं हें मोठ्या काकुळतीनें विचारीत असे. सुवर्णाच्या पिंजऱ्यांत ठेवलेल्या आपल्या रसिका नांवाच्या सारिकेला ती विचारतेः 'रसिके, तुला तिकडची आठवण होते का ? होईलच. कारण, तूं त्यांची अतिशय आवडती होतीस !'

या स्मरणतंद्रीच्या नादांत मीं घरीं आलों व तपासण्याकरितां धरणें धरून बसलेलें पेपरांचें जुडगें एकदाचें टेबलावर आपटलें. येतांना वाटेंत डोळ्यांनीं पाहिलेलीं, पण विचारांमुळें पुरतेपणीं न निरीक्षिलेलीं दृश्यें पुन्हां डोळ्यांसमोर यावयास लागलीं. ते आनंदानें घरीं जाणारे विद्यार्थ्यांचे

कम्पू पुन्हां एकदा दिसावयास लागले. व त्यांचें स्मरण होऊन माझ्या संसारग्रस्त आयुष्याबद्दल मला पुन्हा एकदां खिन्नता वाटूं लागली. पण इतका वेळ मनांत वावरणाऱ्या स्मरणाच्या तत्त्वज्ञानानें मला या वेळीं हात दिला.

" विद्यार्थीदशेचें सुख मला पुन्हां मिळणें अशक्य खरें; पण माझ्या स्वतःच्या विद्यार्थीदशेचें सुखदायक स्मरण मला सहज करतां येण्यासारखें आहे. स्मरणानें भारलेल्या कांडीनें भूतकाळाला मी पुन्हां सजीव करूं शकेन. त्या आनंदी विद्यार्थ्यांचा हेवा मी कां करावा ? स्मरणाचा परीस हातांत असल्यावर लोखंडासारख्या कठीण परिस्थितीचें सोनें बनविणें अगदीं सोपें आहे. त्या विद्यार्थ्यांप्रमाणें आम्हीं सुद्धां एके काळीं खेळलों; भावी सुटीच्या आशेनें आम्हीं पण सहामाहीचे पेपर लिहिले; गांवीं जाण्याच्या आधीं मार्क काढण्याकरितां प्रोफेसरांच्या घरीं आम्हीपण खेटे घातले; सुटींतील वाचनाचा व व्यायामाचा तपशीलवार, पण परिणामीं निष्फळ असा कार्यक्रम आम्हीही आंखून काढिला; हंसलों, खेळलों, गप्पा मारल्या........इत्यादि स्मरण काय थोडें आनंददायक आहे ? "

आमच्या एका वृद्ध पण आनंदी आजोबांची मला या वेळीं आठवण झाली. डोळ्यांनीं दिसेना व कानांनीं ऐकूं येईना व पुढें ध्येयाचा अभाव, अशा वेळीं आजोबा आम्हांला जवळ घेऊन आपल्या आयुष्य-रामायणाचे आम्हांला श्रोते बनवीत आणि ' आमच्या वेळीं असें होतें, आमच्या वेळीं तसें होतें ' इत्यादि गोष्टी मोठ्या रसभरीत रीतीनें सांगत, त्याची मला या वेळीं आठवण झाली. त्यांच्या त्या गोष्टी आम्हांला कितपत समजतात याची फारशी क्षिती न बाळगतां, त्या गोष्टी सांगण्यांतच त्यांना अवर्णनीय आनंद होत असे. स्मरण या अद्भुत संजीवनीच्या जोरावरच ते आनंदाचा उपभोग घेत असत. या त्यांच्या आठवणीनें मला स्मरणाची जादू



अधिकच पटली. "परिस्थिती कशीही येवो, ऊन असो कीं पाऊस असो, पैसा असो कीं नसो, स्मरणासारखें दुसरें साधन नाहीं. प्रपंचांत स्मरण आणि परमार्थांत नामस्मरण, या दोन अद्‌भुत चिजा आहेत. मला जरी प्रत्यक्ष आनंदी बनतां आलें नाहीं तरी गत आनंदाचें स्मरण मला आनंदी बनवील. माझी दिवाळी आनंदाची नसली, तरी आनंदी, दिवाळ्यांच्या स्मृतिदीपांनीं मी ती साजरी करूं शकेन आणि माझ्या निराशेच्या मिठानें इतरांच्या आनंदाचें दूध बिघडविण्याचा प्रसंग तरी टाळीन. 'बा स्मरणा, तुझें विस्मरण मला न पडो' असें म्हणून

भावनोद्रेकानें मी हात वर उचलतों तोंच, “ दादा, इतका कसला विचारांत गढला आहेस ? हा चहा घेतोस ना ? ” असें म्हणत म्हणत धाकट्या कुमुदनें आणून दिलेला पेला मी हातांत घेतला.

‘ **कप्तान** ’, दिवाळी अंक, १९३३

# दिवाळी

दिवाळीच्या सणाची उत्सुकतेनें वाट न पहाणारा विरळाच! भावाच्या भेटीची उत्कंठा लागलेली बहीण, दिवाळ-सणाच्या निमित्तानें नवपरिणीत वधूचें रम्य दर्शन होईल म्हणून उत्सुक झालेला तरुण, वर्षभराच्या खर्डेघाशीनें थकलेला व दिवाळीच्या बक्षिसाची वाट पहाणारा पेढीवरील कारकून, 'खास अंका'करितां लेखांची निवड करण्यांत गुंतलेला संपादक, दिवाळींतील विक्रीनें होणाऱ्या भावी फायद्याच्या मोठमोठ्या आकड्यांचें मनोराज्य करणारा व्यापारी, आणि दिवाळीकरितां मनोरम रीतीनें थाटलेल्या दुकानांतील सुंदर मालाकडे साभिलाष दृष्टीनें पहाणारा बालवर्ग या सर्वांनाच दिवाळी एकदां केव्हां येईल असें झालेलें असतें. जवळ जवळ प्रत्येकालाच दिवाळीच्या चार दिवसांत कांहीं ना कांहीं आनंदाची प्राप्ति व्हावयाची असते. गोडगोड पदार्थ आपल्या नातवंडांना खाऊ घालून संध्याकाळीं तीं दिव्याजवळ खेळत असतां त्यांच्या उच्छृंखलपणाला आळा घालण्यांत वृद्ध आजी-

बाईंना किती आनंद होत असतो ! चित्रविचित्र कंदील करून त्यांतील फिरत्या चित्रांची मजा पहाण्यास मुलांची तर धांदल उडतेच, पण आपल्या लहानग्यांचें कौतुक करण्यास उत्सुक झालेल्या प्रौढ वर्गालाही एका अनिर्वचनीय सुखाचा लाभ होत असतो. रांगोळीच्या कलेंतील आपलें कौशल्य पाहून कितीतरी लोक आनंदानें वाहवा म्हणत जातील, ही कल्पनाच युवतींना आनंदविते. पोस्ताच्या पैशानें साजऱ्या केलेल्या गरीबीच्या दिवाळीच्या आनंदांत आपल्या मुलाबाळांना पाहून गरीब शिपाई धन्यता मानतो. अतिशय आनंदाचा म्हणून एखाद्या प्रसंगाचें वर्णन करावयाचें असेल तर 'तोचि दिवाळी दसरा' असें त्याचें वर्णन करण्याची अगदीं जुन्या संतांची देखील पद्धत आहे. दिवाळी सर्वांनाच अतिशय आवडते, असेंच नाहीं का यावरून दिसत ?

दिवाळीच्या लोकप्रियत्वाला कारणेंही तशींच आहेत. आपल्यामध्यें असा जवळ जवळ सणच नाहीं कीं, ज्याच्यामागें धार्मिक आचाराचा लकडा लावून दिलेला नाहीं. एकवार प्रेमाशिवाय लघुकथा सांपडेल, पण धार्मिक आचाराशिवाय सण सांपडणें दुर्मिळ ! पाडव्याला गुढी-पूजन, दसऱ्याला शमीपूजन, गणेशोत्सवांतील गणपतीची आराधना इत्यादि धार्मिक गोष्टींची यादी खरोखरीच सीतेच्या नखांपासून रामाच्या केसापर्यंत वाढवितां येईल. पण दिवाळी मात्र धार्मिक गोष्टींपासून अगदीं अलिप्त आहे. दिवाळींत लक्ष्मीपूजनाचा आचार असतो खरा, पण एक तर तो मोठा मजेचा प्रसंग असतो; आणि धार्मिक विधीपेक्षां लौकिक समारंभाचेंच स्वरूप त्याला जास्त असतें. मिळून दिवाळी हा सण केवळ निर्भेळ आनंदाचा ! आणि तोही भरपूर सतत चार दिवस !

'वेदांती हिंदु मनाला असा सण सुचला तरी कसा ?' कोणीही सहज विचारील, पण मला वाटतें हिंदुमन—आर्यमन—आपण समजतों तितकें केवळ वेदान्ती नाहीं. परलोकांसाठीं त्यागाचें वर्णन करतांना इहलोकां-


तील भोगाचाही त्यानें विचार केलेला आहे; आमच्या चार पुरुषार्थांपैकीं दोन तर केवळ ऐहिक आहेत. दिवाळीचा सण ही आमच्या आनंदी वृत्तीची एक साक्ष आहे आणि तो सण पाळण्याची आमची पद्धतही ह्या आनंदी मजेदार वृत्तीला पोषक अशीच आहे. व्याख्यानें, पोवाडे, मेळे यांना दिवाळींत स्थान नाहीं; मंत्रजागर, एकादष्ण्या, ब्राह्मण भोजन, इत्यादिकांचें नांवच सोडा; खावें, प्यावें, खेळावें, आनंद करावा, मजा मारावी, एवढाच काय तो दिवाळीच्या सणाचा कार्यक्रम ! कोणीतरी हिंदु 'उम्मर खयाम' दिवाळीच्या सणाचा उत्पादक असावा असेंही कोणाला वाटेल !

दिवाळी येते तीही अशा योग्य वेळीं कीं, हा आनंदी कार्यक्रम बिन-अडचण चालावा ! शरद् सारखा सुंदर ऋतु, त्या वेळची सृष्टिशोभा सुद्धां किती रम्य ! नुकताच संपलेला पावसाळा; संस्कृत कवि म्हणतात तसें सज्जनाच्या हृदयाप्रमाणें निर्मल अशा पाण्यानें भरलेलें जलाशय; जिकडे तिकडे पसरलेलीं हिरवीं गार रानें व गवताळ प्रदेश; नुकतींच पिकून पिवळीं झालेलीं सुंदर सोनेरीं शेतें, आणि बरेच दिवसांनीं दिसल्यामुळें अतिशय मजेचा वाटणारा शरद् ऋतूंतील चंद्र इत्यादि नाना प्रकारच्या उपभोगक्षम गोष्टी निसर्ग या वेळीं आपणाला बहाल करीत असतो. चार महिने जोराचा पावसाचा वर्षाव करून, सोसाट्याचा वारा सोडून व विजांचा चकचकाट करून कोणातरी आकाशस्थ रसिक देवतेनें सर्व जग जणूं दिवाळीच्या सणाकरितां अगदीं स्वच्छ करून ठेवलेलें असतें ! स्वच्छता, निर्मळपणा हे तर या ऋतूचे विशेष गुण. समुद्रकांठीं तर या दिवसांत अवर्णनीय मजा असते ! समुद्राचें निळें पाणी या दिवसांत अधिकच निळें दिसतें आणि संध्याकाळीं निरभ्र आकाशांत सूर्यास्तानंतर सृष्टिदेवीचा रंग फेकण्याचा खेळ फारच आकर्षक असतो. निर्मलतेच्या वैभवानें युक्त अशा प्रकारचे विविध रंग

व त्याच्या छटा क्षणाक्षणाला आकाशांत दिसतात व हळू हळू नाहींशा होतात. याच दिवाळीच्या दिवसांत मोठ्या दिमाखानें आकाशांत मिरविणारा कृत्तिकापुंज कोणाचेंही मन आकर्षीलें असा असतो. त्यांतील बारीक बारीक तारे इतके स्पष्टपणें दिसत असतात कीं, ते मोजण्याचा मोह अनिवार होऊन ' मूठभर तांदुळ तुला मोजवत नाहीं, मला मोजवत नाहीं ', या कोड्याची आठवण होते. हा काळ सुवत्तेचा असतो. नुकतेंच कापून आणलेलें पीक गरीबांच्या घरांत असतें. वर्षांतून कित्येक दिवस अर्धपोटीं रहाणाऱ्या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याला जर कोणता एक सण पाळावयास सोपा पडत असेल, तर तो म्हणजे दिवाळीच होय. दिवाळी श्रीमंतांइतकीच गरीबांनाही साध्य आहे. हरिनामाप्रमाणें दिवाळीसुद्धां ' अती साजिरी स्वल्प, सोपी, फुकाची '—फार तर थोड्याशा खर्चाची—आहे. आणि दिवाळींत फुकाचा कितीही आनंद केला तरी आनंदाचें दिवाळें निघावयाचा मुळींच संभव नसतो !

गरीबांची दिवाळी पहावी, तर खेडेगांवांतच ! दिवाळीच्या पहांटे गरीबांची झोपडी म्हणजे एक रमणीय दृश्य असतें. कोठेंतरी डोंगराच्या उतरणीवर झाडांमधून लिकलिकणारी एक लहानशी पणती त्या रमणीय झोपडीचें अस्तित्व दर्शविते. टाकळ्याच्या कोंवळ्या बिया वांटून त्यांत हळद मिसळली व थोडें तिळाचें तेल टाकलें म्हणजे झालें गरीबांचें ' सुगंधी उटणें !' टाकळ्याच्या बियांचें हें उटणें शरीर स्वच्छ आणि मऊ करण्याच्या कामीं मोठें नामी असतें. हें उटणें लावून स्नान केलेलीं, प्रसन्न चेहऱ्याचीं शेतकऱ्यांचीं मुलें नरकासुराच्या ऐवजीं कारंट्याच्या फळाचा चुराडा करून, सकाळीं सुटलेल्या सुंदर वाऱ्याच्या झुळकेबरोबर बाहेर पडतात, व गांवांतील सधन लोकांच्या घरीं ' पोहे मागण्यास ' जातात. जणूं काय वनदेवीनें आपलें हे बालप्रतिनिधी आनंदाचा संदेश घरोघर पोंचविण्याकरितां बाहेर पाठविले आहेत !

मिळालेली ‘ दिवाळी ’ घरीं आणून त्यावर मग त्या शेतकरी कुटुंबाचा दिवाळीचा फराळ होतो. अर्थातच बँकांप्रमाणें शेतकऱ्यांचीं कामेंही त्या दिवशीं बंद असतात. संध्याकाळीं रोषणाई करावयाची असते.



दहाबारा पणत्या लावल्या म्हणजे हें काम होतें. एक गाईच्या गोठ्यांत व बाकीच्या घरापुढील अंगणांत. मिणमिण जळणारे हे शांत दिवे अंधारांत फारच खुलून दिसतात. निळ्या आकाशांत लिकलिक करणाऱ्या तारकांशीं आपल्या चिमुकल्या तेजानें जणूं काय ते स्पर्धा करीत आहेत असें वाटतें. वाऱ्याच्या झोताबरोबर लपकन खालीं वांक-णाऱ्या त्यांच्या ज्योती पुन्हां वरतीं येतात. त्या वेळची त्यांची शोभा पहाण्यासारखी असते. वरखालीं झळंबणाऱ्या या ज्योती आपल्या देशाच्या भविष्यकाळांत डोकावून पहाण्याचा का यत्न करीत आहेत असें भासतें. ते आमचे आशादीप असावेत. गर्द अंधारांत दोलायमान होणारा तो प्रकाश गरीबींतही आम्हाला आनंदी बनतां येतें हे



दाखवितो. आमच्या आकांक्षांचें तें एक प्रतीक आहे. आमच्या आनंदाचा तो नंदादीप आहे असेंही कोणी म्हटल्यास नवल नाहीं.

दिवाळी या शब्दामागें असलेली ' दीपावलि ' आमच्या मनाच्या इतिहासांतील एक महत्वाचें पत्र आहे. आमच्या आनंदविषयक कल्पनांचें खरें स्वरूप ह्यांत आपणास दिसेल. 'दीपावलि' रचून दिव्यांची रांगच्या रांग लावून त्या ठिकाणीं उत्सव करणें हें तर दिवाळींतील मुख्य कार्य. या सुंदर दिव्यांनीं आपलें मन आज कित्येक युगें आनंदविलें व अजूनही आनंदविलें जात आहे. गर्द अंधारांत, त्यांतल्या त्यांत नरक चतुर्दशीच्या गर्द अंधारांत, हे दिवे आमच्या घराबरोबर आमच्या मनालाही प्रकाशवितात. या दिव्यांत एक अपूर्व सौंदर्य आहे. दिवाळीचा सण शोधून काढणारा कोणी तरी फराळप्रेमी विदूषक नसून व्यवहार-चतुर, पण कलाप्रेमी असा एक समाजशास्त्रज्ञ होता. आमचें सौंदर्य-प्रेम त्याला जागृत ठेवावयाचें होतें; आणि आमच्या कलाप्रेमाला साधी पण शोभन अशी दिशा त्याला लावावयाची होती. प्रकाश आणि अंधार यांतील चिरकालीन, पण चित्ताकर्षक विरोधानें मोहून जाऊन कीं काय कोण जाणें, त्यानें हा दीपोत्सव सुरू केला असावा. साहजिकच या उत्सवांत दिव्यांची मनोहारी रचना करणाराला आपलें कला-प्रेम व्यक्त करण्याची संधि मिळते. आणि रांगोळी–चित्रणासारख्या अभिनव उपक्रमांनीं आपण या संधीचा उत्कृष्ट फायदा घेत असतों हें आपल्या वाढत्या कलाप्रेमाचें सूचकच नाहीं का ?

पण या मोठ्या गोष्टी कितीही बोलल्या तरी दिवाळीच्या सहज-सुलभ सुखाचा विसर कोणाला पडेल ! स्वच्छ हवा, निर्मळ पाणी, भरपूर पीक, अशा सुखत्रयीमध्यें मुळीं दिवाळीला सुरुवात होते. धंद्या-पासून मोकळीक, रोजच्या कार्यक्रमापासून सुटका, कसलीच घाई

नाहीं; स्नान, फराळ, व खेळ एवढेंच काय तें काम; संध्याकाळीं दिवे लावण्याची व पहाण्याची घाई हें दिवाळीचें स्वरूप. मात्र हे दिवे ज्याला नीट लावतां येणार नाहींत, तो एकंदरींत 'दिव्य' अशी आपली समजूत असल्यामुळें कीं काय कोण जाणें, 'काय मोठे दिवे लावणार आहेस ?' असें आपण एखाद्या आरंभशूर माणसाबद्दल म्हणत असतों. पण दिवाळींत आरंभशूरत्वाचा ठपका कधींच मिळावयाचा नसतो. कारण दिवाळींत एकसारखे चार दिवस आपण आनंद आणि मजाच करीत असतों आणि या सर्व सुखाची पूर्ति ओवाळणीच्या मंगलप्रसंगांत, बहिणभावंडाच्या सुखसंवादांत व्हावयाची असते.


**किर्लोस्कर**, आक्टोबर १९३४

# ट्रॅमगाडींत—

साडेदहा-अकरांचा सुमार. कॉलेजमध्यें जाण्याकरितां पोर्तुगीज चर्चच्या नाक्यावर मी ट्रॅमची मार्गप्रतीक्षा करीत उभा होतों.

'ठण् ठण्' असा आवाज करीत ट्रॅमगाड्या धांवत होत्या. मुंबापुरीच्या कण्ठहारांतील मणि जणूं ओघळून सुटले आहेत, असें त्यांची मालिका पाहून कोणालाही वाटलें असतें. टापटिपीच्या पोशाखानें सजलेले मुंबईतील नीटनेटके चेहरे धांवत्या गाड्यांतून रेखीव पुतळ्यांप्रमाणें स्तब्ध दिसत होते. एका हातांत गाडी हांकण्याचा दांडा गरगर फिरवीत फिरवीत, एक पाय मोठ्या झोंकानें घंटेवर मारणारे ट्रॅम-ड्रायव्हर आसपासच्या जनतेकडे तुच्छतेनें पहात होते. एखाद्या जादूगारानें मन्त्रानें भारलेली नागीण ज्याप्रमाणें आपल्या मागून धांवत न्यावी, त्याप्रमाणें विद्युन्मोहिनीनें ट्रॅमगाड्या वश करून ड्रायव्हर आपल्याबरोबर

चापल्यानें नेत आहेत असें दिसत होतें. हा सर्व देखावा मी पहात होतों खरा, पण फोर्टकडे जाणाऱ्या कोणत्या ट्रॅममध्यें जागा मिळेल तें हुडकण्यांत माझें खरें मन गुंतलें होतें. त्या दिशेनें जाणारी प्रत्येक ट्रॅम गच्च भरून येत होती. आधींच निघण्यास उशीर झालेला, आणि त्यांतूनही ट्रॅममध्यें जागा मिळण्याचीं चिन्हें दिसेनात! शेवटीं एका कंडक्टरच्या आरडण्याओरडण्याकडे लक्ष न देतां व आपआपल्या जागीं आगाऊच सुरक्षित बसलेल्या कित्येक साहेबांच्या निंदाव्यंजक दृष्टिक्षेपाची क्षिति न बाळगतां एका गाडींत एका घोळक्याबरोबर मी शिरलों. "पिछले गाडीमें चलो!" हें कंडक्टरचें कर्कश फर्मान सुटतांच कित्येक भित्रे जीव खालीं उतरले देखील! पण काबीज केलेला किल्ला लढविण्याचा मीं निश्चय केला होता. तानाजीच्या 'यशवन्ती'ची



चिकाटी अंगीं आणण्याचा या वेळीं मी प्रयत्न केला, आणि अगदीं पिछाडीच्या अर्धवर्तुळाकार बांकावर बसलेल्या पांच जणांच्या मुखांकडे परमेश्वराइतक्या नम्र भावानें हीनदीन होऊन मीं पाहिलें, तेव्हां त्यांतील एकानें प्रसन्न होऊन मला जागा दिली. माझ्या हातांतील छात्रचिन्हें पाहून कीं काय कोण जाणें, कंडक्टरनेंही मजवर दया दाखविली. ट्रॅमच्या मागील प्रवेशद्वारावरील लोखंडी चौकट एखाद्या तुरुंगाच्या दरवाजाच्या कटुक्कणनाचें अनुकरण करीत खाडकन् खालीं आली. मुंबईच्या गर्दीतून आमची ट्रॅम आपल्या रुळलेल्या मार्गानें धावूं लागली.

शीघ्र गतीनें जाणाऱ्या ८ नंबरच्या ट्रॅममध्यें बसण्याचा माझा मूळचा हेतु; आणि खरें सांगावयाचें तर माझी आवडती ट्रॅम म्हणजे ८ नंबरचीच. पण आज ६ नंबरमध्यें मला बसावें लागलें होतें. आमची ६ नंबरची गाडी म्हणजे मुंबईची एक छोटीशी आवृत्तीच होती. राणीच्या बागे-पासून तों राजाच्या पुतळ्यापर्यंतचें सर्व जग तींत प्रतिबिंबित झालें होतें. मुंबापुरी स्वतः मर्यादातीत असून इतरांनाही ‘आपुल्यासारिखे’ करिते याचें प्रत्यंतर आमच्या या ट्रॅमगाडींत चांगलेंच येत होतें. एका गलेलठ्ठ पारशाशेजारीं एक किडकिडीत दक्षिणी कारकून आपल्या बारीकपणाला धन्यवाद देत बसल्यासारखा दिसत होता. एका पाटीवाल्याजवळ एक प्रोफेसर आपली चर्मपेटिका ( Bag ) घेऊन मोठ्या नाखुषीनें बसले होते. एक नाजूक कॉलेज विद्यार्थिनी शेजारीं ठाण मांडून बसलेल्या काळ्याकुट्ट घाटी बाईकडे मोठ्या नाराजीनें मधून मधून पहात होती. जरा अपूर्व असें हें सामानाधिकरण्य अथवा सहबैठक अवलोकन कर-ण्याच्या मजेंत मागील बांकावर बसण्यांत झालेली माझी धांदल मी विसरलों होतों. इतक्यांत एक विश्राम-स्तंभ आला. लठ्ठ पारशी तेथें केव्हां उतरला हें मला उमगलें देखील नाहीं ! पण वेळीं संधि साधणारा माझ्या शेजारचा एक तरुण तीरासारखा उठून जेव्हां रिकाम्या जागेवर

मोठ्या विजयानंदानें जाऊन बसला, तेंव्हां स्वतःच्या बावळ्या स्वभावाला दोष देत, पुढील 'व्हेकन्सी' कडे लक्ष ठेवण्याचा मीं निश्चय केला. पण पुनः माझ्या विचारांत मी दंग झालों....

ट्रॅम पकडण्यासारख्या अगदीं साध्या गोष्टीला देखील पुष्कळदां आपण किती महत्व देत असतों ! निदान मला स्वतःला तरी असल्या लहानसहान गोष्टींवर आपलें सुख अवलंबून ठेवण्याची मोठी खोड आहे. ट्रॅममध्यें फार तर पंधरावीस मिनिटेंच बसावयाचें ना ? पण तीसुद्धां दुमजली, नुकतीच रंगविलेली व नरम बैठकीची नसली म्हणजे मी फार नाखूष होतों. विशेषेंकरून ट्रॅमच्या वरच्या मजल्यावरील कोंपऱ्याच्या बांकावरून सुंदर मुंबापुरीचें निरीक्षण करण्यांत मला फार आनंद वाटतो. पण पुष्कळदां या बाबतींत माझी निराशा होते. आणि इतरांचेही तसेच अनुभव असतील ! आपण रस्त्यावर यावें तों एक दुमजली ट्रॅम भरधांव सुटलेली आपण पहावी, आणि मागाहून एक दुगाडी धूड येऊन त्यांतून ढकलत ढकलत जाण्याची पाळी यावी, असें अनेकदां घडतें. एखाद्या वेळीं आपण अगदीं लवकर पोहोंचण्याच्या धांदलींत असावें व मध्येंच विजेचा प्रवाह बंद पडावा ! अशा वेळीं "May I come in, Sir ?" असें वर्गांत दबत दबत शिरतांना आपण कसें म्हणूं व नंतर नाजूक बांकांकडून आलेला अर्धस्फुट हास्याचा किलकिलाट आपल्या मनाला कसा जाचेल याचें चित्र मनश्चक्षूंसमोर उभें राहून आपण निराश होतों; आणि 'चपला' असें अन्वर्थक नांव धारण करणारी विद्युद्देवी या वेळीं गतिहीन बनावी याबद्दल आपण आपल्या प्रारब्धाला नांवें सुद्धां ठेवितों. या गोष्टी दिसण्यांत लहान खऱ्या, पण त्यांचेंच महत्व मनाला पुष्कळदा मोठें वाटतें व त्यांवर विचार करीत करीत दैव, प्रारब्ध इत्यादिकांपर्यंत पोंचण्याची मनाची मजल जाते.

पण यांत दैवाचा किंवा प्रारब्धाचा काय दोष? आपल्या पूर्व वर्तनाचाच तो परिणाम असतो. हातांत पुस्तकें घेऊन अगदीं कॉलेजमध्यें निघण्याच्या तयारींत असतांना देखील "नायडूला आउट् दिला तो बरोबर नाहीं" इत्यादीसारख्या महत्त्वाच्या विषयावर वादविवाद करण्यांत आपण गढून जातों; आणि मग घाईघाईनें रस्त्यावर यावें तों एक रिकामी दुमजली ट्रॅम टप्पा सोडून अप्राप्य अशा वेगानें पुढील मार्ग आक्रमण करीत असलेली दिसते. अशा वेळीं पुढील कार्यक्रमाची ढांसळलेली इमारत पहाण्याची मन तयारी करीत असतें, तर दुसरीकडे उशीराचा दोष कोणाच्या तरी माथीं लादण्याची युक्ति तें शोधीत असतें. पण सकाळीं उठण्यास उशीर केला व गप्पा मारण्याचें गोड काम अगदीं कॉलेजला निघण्याच्या वेळेवर ठेविलें, या गोष्टींची कटु आठवण तें या वेळीं विसरून जातें! आपण गप्पा मारल्याच नसत्या तर वेळ वांचला असता, हा साधा कार्यकारणभाव त्याच्या समोर येतच नाहीं. वस्तुत: गप्पा आरंभणारे जर आपण, तर परिणाम सोसणारेही आपणच. मघां मीं प्रारब्धाला दोष दिला होता, म्हणजे पर्यायानें मी माझा मलाच बोल लावीत होतों; फक्त माझ्या प्रारब्धाचा कर्ता मीच, हें स्मरण मला नव्हतें इतकेंच कायतें. 'प्रारब्ध' हा शब्द शोधून काढणाऱ्या हिंदु तत्त्वज्ञानाला दैववादी म्हणणें खरोखरीच चुकीचें होईल. जगांतील व्यवहारांत प्रारब्धाला महत्त्व आहे, तसेंच ट्रॅमगाडींतल्या या जगांतही आहे म्हणावयाचें एकूण!

•

'ठण् ठण् ठण्' आवाज करीत आमच्या ट्रॅमनें आणखी एक टप्पा गांठला. दक्षिणी कारकून खालीं उतरला व त्यायोगें रिकाम्या जागीं सुखासनीं विराजमान झाल्यावर मी पुन्हा विचारांत दंग झालों. मला वाटलें आपलें हें जग म्हणजे एक मोठी ट्रॅमगाडीच आहे व शेक्स्पियरनें ट्रॅम पाहिली असती तर कदाचित् त्यानेंही जगाला रंगभूमि

म्हणण्याऐवजीं ट्रॅमगाडीच म्हटलें असतें ! आपला सकाळचा कार्यक्रम जसा बाहेर निघण्याची आपली वेळ निश्चित करितो व निघण्याच्या वेळेवर मिळेल त्या ट्रॅममध्यें आपणाला बसावें लागतें, त्याचप्रमाणें या जगाच्या गाडींतही आपण विशिष्ट काळीं प्रवेश करितों. जशी एखादी रेंगाळत जाणारी ट्रॅम आपणाला पसंत नसते, त्याप्रमाणें आपण ज्या काळांत जन्माला आलों त्याबद्दल आपण नाखूष असतों. संतांची बोधवाणी आणि शूरांची मर्दुमकी ज्या वेळीं महाराष्ट्रांत–नव्हे, आसेतुहिमाचल–दुमदुमून राहिली होती, अशा श्रीशिवरायांच्या अथवा थोरल्या बाजीरावसाहेबांच्या ओजस्वी काळांत जन्माला आलों असतों तर किती बरें झालें असतें, असें वाटणारे काय आपणांमध्यें नसतील ? ट्रॅममधील ऊन येणाऱ्या बाजूचें बांक आपल्याला नकोसें होतें, तसें समाजांतील आपलें स्थानही आपणाला नापसंत असतें. ब्राह्मण असल्यामुळें नोकरी मिळाली नाहीं तर ब्राह्मण्याचा संताप येतो व हरिजन म्हणून देवाच्या द्वारीं देखील प्रवेश मिळाला नाहीं म्हणजे अंगाची लाही होते. ट्रॅममधील शेजारी व घरचा शेजारी पुष्कळदां सारखेच अलोभनीय असतात. शेजारच्या रुळावरून द्रुतगतीनें जाणाऱ्या ट्रॅममधील एखाद्या सुखी चेहऱ्याच्या अस्फुट दर्शनानें आपण अकारण अस्वस्थ होतों, तसेंच जगांतील कित्येक गोष्टींच्या दर्शनानें आपणाला होतें. ट्रॅममध्यें अकल्पितपणें मंडळी येतात व तितक्याच अचानकपणें उतरून पुनः गर्दींत नाहींशी होतात. सुभाषितकारांचाही जगाबद्दल असाच अनुभव आहे:–

**यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।**
**समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः ॥**

ट्रॅममध्यें बसण्यास रोख आणा द्यावा लागतो; या जगाच्या ट्रॅममध्येंही कर्तबगारीचें खणखणीत नाणें पदरीं असावें लागतें. फरक इतकाच कीं,

ट्रॅम कोठें जात आहे हें आपणाला माहीत असतें; पण जगाचें ध्येय मात्र अज्ञातच आहे. ट्रॅमला गति देणारा आपण प्रत्यक्ष पहातों; पण जगाच्या चालकाची आपणाला माहितीही नसते. आणि ट्रॅममध्यें वाईट जागा मिळाल्याबद्दल आपण आपल्या दिरंगाईला दोष देऊं शकतों; पण जगांतील आपल्या हालांचें खापर कोणाच्या माथीं फोडावें हें मात्र आपल्याला कळत नाहीं.

मला वाटतें जगांतील आपल्या बऱ्याचशा हालांना जबाबदार 'प्रारब्ध'; आणि 'प्रारब्ध' म्हणजे आपण जें आरंभिलें तें. मघांच मीं ट्रॅममध्यें झालेल्या गैरसोईबद्दल प्रारब्धाला बोल लावून प्रारब्ध म्हणजे माझा दीर्घसूत्रीपणा हा सिद्धांत काढला होता. या जगांतील आपल्या स्थानाबद्दल देखील अशाच तऱ्हेची समजुतीची भाषा हिंदु तत्त्वज्ञान वापरतें—टप्पा सोडण्याची खूण म्हणून कंडक्टरनें वाजविलेली घंटा या समजुतीलाच होकार देत होतीशी मला वाटली—'सुखदुःख देणारा दुसरा कोणी नाहीं, दुसरा देतो असें समजणें म्हणजे अन्याय आहे.' असें रामानें लक्ष्मणाला उपदेश करतांना सांगितलें तेंच खरें.

जगांतील आपल्या परिस्थितीला जबाबदार आपणच, हें तत्त्व काय निराशावादी समजावयाचें? आपणच आपले शत्रु किंवा मित्र हाच त्याचा अर्थ. कारण, प्रारब्ध हें स्वयंनिर्मित असल्यामुळें तें आपणाला निश्चित बदलतां येतें. फार तर थोडाबहुत वेळ लागेल; प्रयत्नानें तें बदलेलच. आयुष्य ही एक रत्नपेटी आहे असें रामदासांनीं एक सुंदर रूपक केलें आहे. या पेटींत प्रयत्नरत्नांचा सांठा केला म्हणजे आमची श्रीमंती पुसूंच नका! कारण, तो सांठा म्हणजेच आपलें बदललेलें प्रारब्ध आहे. प्रयत्न हाच परमेश्वर. त्याच्या शक्तीपुढें बापडें प्रारब्ध काय करणार? प्रारब्धवाद हा परिणामीं प्रयत्नवाद आहे......

ट्रॅमगाडीनें सुचविलेल्या या विचारांच्या तंद्रींत मी असतां, ‘काळा घोडा’ केंव्हां आला हें मला समजलें देखील नाहीं ! कंडक्टरनें मला जागें केलें. लागलीच ट्रॅमगाडीला आपल्यां दैनंदिन भ्रमणाच्या नित्यक्रमार्थ सोडून मी कॉलेजचा रस्ता धरला.


‘ लोकशिक्षण ’, जानेवारी १९३५

# एक शोध

'शोध' हा शब्द पाहिल्याबरोबर कोणत्या तरी शास्त्राच्या ज्ञानांत भर पडल्याची हकीकत वाचण्यास मिळेल या उत्सुकतेनें वाचक-मित्र कदाचित् आतुर होतील. पण त्यांची बरीचशी निराशाच होईल. 'क्ष' किरणांसारखे सर्व जगाला थक्क करून सोडणारे शोध लावण्याचें भाग्य 'मनुष्याणां सहस्रेषु' एखाद्यालाच लाभावयाचें! माझ्याविषयीं म्हणाल तर कालिदास हा काश्मीरचा रहिवासी होता कीं, तो बंगाली होता असल्या गोष्टीचा शुष्क खल करीत बसण्यापेक्षां 'शाकुंतलां' तील चौथा अंक किंवा यक्षाचा मंदाक्रान्ता वृत्तांतील 'संदेश' वाचणें मला अतिशय आवडतें. रामदासांनीं राजकारण केलेंच नाहीं असें म्हणण्यासाठीं मी पुरावाही गोळा केलेला नाहीं. अंताजी माणकेश्वर नांवाचे पेशव्यांचे कारभारी पुण्यांत प्रथम आले ती तीथ कार्तिक वद्य नवमी नसून शुद्ध दशमी होती, इत्यादि-कांसारखे शोध लावण्यास लागणारा ऐतिहासिक कांटेकोरपणाही मज-

जवळ नाहीं. '**गणानां त्वा गणपतिम्**' ही ऋचा वाचल्याबरोबर ऋग्वेदकालीं पण 'गण' म्हणजे प्रजासत्ताक राज्यें होतीं असें अनुमान बांधण्याचें आशावादित्व व धाडसही मजजवळ नाहीं. शिवाय संशोधन-कार्यास लागणारे कष्ट सोसण्याची तरी माझी तयारी कोठें आहे ? माझा शोध अगदीं साधा आहे. आणि मी तो लावला असें म्हणण्यापेक्षां मला तो अगदीं अकल्पितपणें लागला असेंच म्हणाना ?

मला एक अर्ज करावयाचा होता. नुसताच पाठविण्याऐवजीं 'रजिस्टर्ड' करून पाठविण्याची सल्ला अनुभवी मित्रांनीं दिली होती. 'No vacancy' च्या अक्षता कपाळीं लागल्या तरी त्याची क्षिति न




बाळगतां परत पावतीच्या रजिस्टरचे चार आणे खर्चण्यास मी तयार झालों होतों. लिफाफा घेऊन मी पोस्टांत गेलों. रजिस्टरची खिडकी गांठली. तेथें सर्व तऱ्हेची आणि बरीचशी गर्दी होती. कांहीं माझ्यासारखेच अर्जदार असावेसे दिसत होते. बाहेर उकाडा होत असूनसुद्धां, जाड कापडाचे लांबलचक तांबडे डगले घातलेले पट्टेवाले साहेबांनीं दिलेले लखोटे अदबीनें हातांत धरून, पट्ट्यावरील छापाच्या

जोरावर आपली वर्णी लावण्याचा प्रयत्न करीत होते. एक लठ्ठ गृहस्थ स्वतःला साजेल अशी एक जाडी बंगी रजिस्टर करण्यांत गुंतले होते. जरा उंच पाय करून पाहिल्यावर, आपल्या उंच खुर्चीवर बसून खिडकीशीं गर्दी करून राहिलेल्या रंकांवर राज्य चालविणाऱ्या कारकूनसाहेबांचें मला दर्शन झालें. त्यांच्यासमोर एकावर एक 'रजिस्टरें' येत होतीं ही गोष्ट खरी; पण कामाखालीं आपण अगदीं चुरडलों आहों असें समोरच्या गिऱ्हाईकमंडळीला विशेष रीतीनें जाणविण्याचा त्यांचा मधून मधून प्रयत्न होत होता. नोकरीच्या उमेदवारीची पूर्वतयारी म्हणूनच कीं काय कोण जाणें, माझ्या लिफाफ्याचा अनुक्रम लावण्याच्या कामीं बरीचशी उमेदवारी केल्यावर माझी पाळी आली. R 129 या निळ्या शाईनें छापलेल्या अक्षरांनीं व आंकड्यांनीं अंकित अशी चिठ्ठी माझ्या लिफाफ्यावर डकविण्यास कारकूनसाहेबांनीं मजजवळ दिली. गोंदीच्या शोधार्थ मी इकडेतिकडे पाहूं लागलों. गिऱ्हाइकांना लिहिण्यास वगैरे उपयोगी पडावी म्हणून कारकुनाच्या खिडकीलाच लागून जी लांब चौकोनी आकाराची फळी असते तिजवर चिकीसारखी दिसणारी बरीचशी गोंद एका जाड कागदावर ठेवलेली मला दिसली. गिऱ्हाइकांच्या गर्दीनें त्रासून म्हणा, किंवा हजारों लोकांच्या हस्तस्पर्शाला कंटाळून म्हणा, ती अगदीं हिरवी पिवळी झाल्यासारखी दिसत होती. गोंदीकरितां धडपडणाऱ्या बोटांच्या गर्दीत माझाही हस्तप्रवेश मी करून घेतला. चिठी चिकटवून झाल्यावर बोटें कोठें पुसावीं या विवंचनेंत मी आतां पडलों.

माझ्या वरच्या खिशांत फक्त डोकावून बाहेर पहाण्याचें काम करणाऱ्या रंगीत हातरुमालाला हात लावण्याचें अर्थात्‌च मला धाडस नव्हतें. खास वापरण्याकरितां म्हणून ठेवलेला हातरुमालही आजच घडी करून ठेवलेला असल्यामुळें तो या कामीं फुकट दवडणें माझ्या

काटकसरी मनाला जड वाटत होतें. इतक्यांत जणूं काय अंतःस्फूर्तीनें प्रेरित होऊन समोरील फळीच्या खालील बाजूला मी हळूच बोट पुसावयाला लागलों. तोंच–हीच ती माझ्या नशिबाची शोध लावण्याची वेळ–अपेक्षेप्रमाणें फळी सपाट लागण्याऐवजीं ती मला बरीचशी खड-बडीत लागली. क्षणार्धांत मला समजून आलें कीं, तिच्या खालील बाजूंना सुख्या गोंदीचे लहानमोठे डोंगर चिकटून राहिले आहेत !

तपासून पहातां हे गोंदीचे सुखलेले ढीग बऱ्याच महिन्यांचा, कदाचित् वर्षांचा इतिहास आपल्या मूकभाषेनें सांगत असल्याचें मला आढळून आलें.

**'ये येथें इतिहासपत्र पडलें वाचूनि पाही जरा'**

या केशवसुतांच्या उपदेशाप्रमाणें यदृच्छया प्राप्त झालेल्या या इतिहास-पत्राचें वाचन करण्यांत माझें मन गुंग झालें. महिनेच्या महिने अशाच रीतीनें अनेक लोक या फळीला हात पुशीत आले आहेत. पट्टेवाले शिपाई, लठ्ठ, तसेंच किडकिडीत गृहस्थ, अर्जदार, काम करणारे गडी इत्यादिकांचीं विविध आकाराचीं, विविध वर्णाचीं, गोंदीनें भरलेलीं बोटें त्या फळीच्या अधोभागावरून यथासमय फिरत असल्याचा चित्रपट माझ्या कल्पनाचक्षूंसमोरून फिरूं लागला. कोणी राजरोसपणें बोटें पुशीत होते; पण कित्येक आपल्याला कोणी पहात नाहीं अशी खात्री करून तें काम करण्यांत दंग झाले होते. मनुष्य कसा लपंडावी आहे पहा ! जोंपर्यंत कोणी पहात नाहीं तोंपर्यंत स्वच्छंदी बनण्यास काय हरकत आहे ? असेंच पुष्कळांना वाटत असावें. पुष्कळांना कशाला ? मी तरी कोणत्या कोटींतला ? फुकट मिळालेल्या गोंदीचे हात तेथेंच असलेल्या फळीला पुसण्यास मी तर आतांच उद्युक्त झालों होतों ना ?

सगळे एकाच माळेचे मणी ! या लहानशा काडीवरून मनुष्याच्या मनाचा वारा कोठें वहात आहे हें ठरविणें चुकीचें होईल काय ? कोण जाणें, मोठे सभ्य म्हणून ठरविलेल्या लोकांच्या आयुष्यांत काय काय गोष्टी घडल्या असतील त्या ? संतांनाही भूतकाळ असतो म्हणतात तें खरें का तर ?

इतर कांहीं लोकांच्या अशाच तऱ्हेच्या गोष्टी मला आठवल्या. एक आंग्ल धर्मोपदेशक लंडनमधील एका आगगाडीच्या पहिल्या वर्गांतून प्रवास करीत असतां मृत झालेले सांपडले; त्या वेळीं त्यांच्या कोटाच्या खिशांत तिसऱ्या वर्गाचें तिकीट सांपडलें ! एका मोठ्या लाटसाहेबांच्या पुस्तकसंग्रहाचें लिलांव झालें त्यांतील बऱ्याचशा पुस्तकांवर इतरांचीं नांवें खोडलेलीं दिसत होतीं व कांहींच्यावर वेगवेगळ्या वाचनालयांचे शिक्के होते ! पण हीं सातांसमुद्रापलीकडचीं उदाहरणें कशाला ? गंगा-यमुनांनीं पावन केलेल्या आपल्या या भरतखण्डांत काय तीं सांपडणार नाहींत ? माझ्या एका मित्रानें आपला 'रत्नाकर' कोणालाही वाचावयास द्यावयाचा नाहीं असें ठरविलें होतें. आणि त्याचें तो असें कारण सांगत असे कीं, अंक कधीं वाचकानें परत केलाच तर त्यामधील सुंदर रंगीत चित्र त्याला केंव्हांही सांपडत नसे ! हातांत हॅट घेऊन स्टेशनमधून झोकांत बाहेर पडतांना "तिकीट किदर है ?" असें दरडविणारा खंबीर तिकिट-कलेक्टर भेटल्यास त्याची हळूच समजूत करणारे सद्‌गृहस्थही पुष्कळदां आपण पहातों. निबंध लिहिण्यांत विद्यार्थी गर्क आहेत ही संधि साधून फळ्याजवळील डस्टरचा उपयोग आपल्या बुटावरील धूळ काढण्यास करणाऱ्या कोठल्याशा कॉलेजांतील एका प्रोफेसरांना दारुण 'पादाघात' करून छात्रवर्गानें शरमविल्याचें मी ऐकिलें आहे. इतरांशीं काय, पण स्वतःच्या मनाशीं सुद्धां मनुष्य लपंडावीचा खेळ खेळत असतो. हें जाणूनच कीं काय कोण जाणें देवांचे डोळे कधीं मिटत नाहींत, नव्हे

ते मिचकावतही नाहींत, अशी एक कल्पना आपल्या पुराणांत आहे. मनुष्यावर लक्ष ठेवण्यास सतत द्रष्टा असा एक पहारेकरी असावा असाच याचा अर्थ नाहीं का ?

लिफाफ्यावर चिठी चांगली चिकटली आहे कीं नाहीं हें पहात असतां माझ्या मनांत दुसरी एक विचारांची लाट आली. पण अशा बारीकसारीक लपंडावीबद्दल बिचाऱ्या मनुष्यावर रागावण्यांत काय अर्थ आहे ? असल्या साध्यासुध्या गोष्टींत प्रामाणिकपणाचा एवढा बडेजाव कशाला ? गोंदीनें भरलेलीं बोटें कारकूनसाहेबांच्या फळीला मी पुसूं नये ही गोष्ट खरी; पण मग मी तीं पुसावीं तरी कोठें ? माझ्या हातरुमालाच्या स्वच्छतेचा त्या ठिकाणीं यज्ञ करणें ही एक प्रकारची अरसिकताच नव्हे काय ? यापेक्षां पोस्टखात्यानें त्या ठिकाणीं गोंदीबरोबर हात पुसण्यास रुमालही कां ठेऊं नयेत ? एखाद्या मोठ्या मजलशींत विडा खातांना तो लागलाच तर सुंदर गाणें टाकून विडा बाहेर फेकण्यास खिडकीशीं कोण जाणार ? कोणी पहात नाहींशी खात्री करून त्याला सतरंजीखालीं समाधि देणें हा एकच योग्य मार्ग नव्हे का ? मालकाची बैठक बिघडवूं नये हें तत्त्व या ठिकाणीं मानणार कोण ? नीतितत्त्वें लवकर समजलीं तरी तीं उमजण्यास फार वेळ लागतो. तुकाराम महाराजांचाही असाच अनुभव असावा. नाहीं तर

**'काय सांगों तयां संतांचे उपकार । वेळोवेळीं मज जागविती'**

असें मोठ्या कळवळ्यानें त्यांनीं सांगितलें नसतें; उपदेश करणाऱ्या संतांची जगाला जरूरीच भासली नसती.

गरीब बिचारा मनुष्यप्राणी ! त्याच्या मनाचा हा कमकुवतपणा स्वकष्टार्जित नसून वडिलोपार्जित आहे. ऋग्वेदकालीन एक ऋषि एका

भावपूर्ण सूक्तांत म्हणतात, " मी अपराध केले खरे, पण माझा कांहीं इलाज चालेना ! मोहानें मी गांजला गेलों होतों. सुरापानानें मला एका बाजूस ओढावें, तर फांशांच्या गोड आवाजानें भुलून माझ्या पायांनीं दुसरीकडेच धांव घ्यावी ! रागानें माझ्या मनाला पछाडावें, तर अविचारानें त्याचा दुसरीकडून ताबा घ्यावा ! वरुण देवा, तूं क्षमा करशील तरच कांहीं माझा पाड लागेल ! " अगदीं प्राचीन अशा मानवाचे हे उद्गार ! आपल्या मनाची स्थिति तरी तशीच आहे. मग तें पोष्टांतील एका यःकश्चित् फळीला गोंद पुसण्यास कशाला मागेंपुढें पाहील ? माझे विचार असेच भटकत चालले असते कीं नाहीं कोण जाणें ? पण इतक्यांत "अहो मिस्टर, आणा तुमचं रजिस्टर ! आम्हांला काय तुमचं एकट्याचंच काम करायचं आहे ? " अशा कारकून-साहेबांच्या धनगर्जितानें मी जागा झालों. रजिस्टरच्या पावतीचीं गुंडाळीं खिशांत चांचपीत घरीं येत असतांनाही त्या गोंदीच्या डोंगरांवरून मी हात फिरवीत आहें असा मला भास होत होता !

**सह्याद्रि, सप्टेंबर १९३५**

# चांदोबा आणि चांदणें.

नुकतीच एका इंग्रजी मासिकांत मीं एक कविता वाचली. 'रात्रीचें भयाण दृश्य' या नांवाखालीं कवीनें त्यांत चंद्राचें व चंद्रप्रकाशाचें वर्णन केलें आहे. त्याच्या आरंभीं तो म्हणतो,

So few things I hate, the more I hate,

Heavy, hard, iconoclastic moon-light.

कवीला फारच थोड्या गोष्टींबद्दल तिट्कारा आहे (हें तोच कबूल करतो). असें असून चांदण्याबद्दलच त्याला जास्त द्वेष वाटतो याबद्दल मला आश्चर्य वाटतें. ही कविता वाचीपर्यंत चांदण्याचा व चांदोबाचा द्वेष करणारे कोणी या पृथ्वीतलावर असतील असें मला कधीं स्वप्नांतसुद्धां वाटलें नव्हतें. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' याचेंच उदाहरण असेल तें कदाचित्.

पण मला स्वतःला चांदण्याइतकें वेड दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचें नाहीं. कोणताही ऋतु असो आणि कोणतीही वेळ असो, चांदणें दिसलें कीं मी घराबाहेर येतोंच. पुष्कळदां पावसाळ्याच्या दिवसांत बरेच दिवस आकाश अगदीं काळेंकुट्ट असतें, आणि एकाद्या रात्रीं मध्येंच वायुराज येऊन ढगांचा पडदा दूर सारून एकाद्या कपाटांत ठेवलेल्या शोभेच्या जिनसांप्रमाणें जेव्हां चांदोबाचें दर्शन करून देतो तेव्हां तर मला अतिशय हर्ष होतो. पावसाळ्यानें ज्या चांदोबाचा आपणाला विसर पाडला होता त्याला पाहून 'अरे, चंद्र तर आकाशांत आहे!' अशा तऱ्हेचा शोध लावल्याचें समाधान त्या वेळेस मला होतें. द्वितीयेच्या चंद्राचें कांहीं मोठें चांदणें असतें असें नाहीं; पण त्यालाही पहावयास मी अगदीं आतुर झालेला असतों. त्या वेळेस त्याची कोर किती नाजूक व रेखींव अशी दिसते! अगदीं भूमितीच्या पुस्तकांतील एकाद्या लहानशा वर्तुल-शकलासारखीच म्हणाना! तसेंच हिंवाळ्यांत अगदीं कडक थंडीच्या वेळीं पहांटेसच कांहीं कारणानें उठून बाहेर यावें, तों वद्य द्वादशीसारखी जर एकादी तीथ असली तर त्या तरळशा चांदण्याची जी कांहीं शोभा दिसते ती पुसूंच नका! तिथि पाहून संध्या, होम-हवन करणारा मी कांहीं कर्मठ ब्राह्मण नाहीं. पण मी तिथींचें मोजमाप कधींच विसरत नाहीं. कारण चांदणें पहाण्याची माझी हौस पुरी करण्याला तिथींचा हिशेब मला ठेवावाच लागतो. त्या योगानें चंद्र केव्हां उगवणार आणि केव्हां मावळणार या वेळा मला बिनचूक कळतात. आणि त्यासाठीं ज्या डायरींत चंद्राचें रोजचें भ्रमण दिलेलें असतें अशी डायरी, किंवा वेळेस पंचांगसुद्धां म्हणा, मी जवळ बाळगतों. प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत आणि दुसऱ्या प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत चंद्राचा सूर्याशीं जो लपंडावीचा खेळ चाललेला असतो त्याचा प्रेक्षक होण्यासाठीं हीं साधनें मी जवळ बाळगतों. क्रिकेटच्या सामन्याचे देखील वेगवेगळे वेळ संभाळून नाहीं का

आपल्याला जावें यावें लागत ? तसेंच या चंद्रसूर्यांच्या खेळाचें आहे. आणि त्यांत धांवून धांवून चांदोबा जेव्हां थकतो तेव्हां कसा अगदीं सुदाम्यासारखा बारीक होतो. आणि पौर्णिमेला चांगला लठ्ठ बनून तो जेव्हां बरोबर सूर्याच्या समोर–तो पूर्वेस तर हा पश्चिमेस–येतो तेव्हांच्या त्याच्या तेजाचें काय वर्णन करावें ? नुसता डुलत असतो ! आणि या वेगवेगळ्या वेळीं चांदण्याच्या बदलत्या शोभेचा आस्वाद घ्यावा तेवढा थोडाच ! कुठल्याशा एका शास्त्रीय लेखांत मी वाचलें कीं, कित्येक लाखों युगांनीं चंद्राच्या भ्रमणांत त्याला अशा एका गुरुत्वशक्तीचा जोर लागेल कीं, त्या योगानें तो फुटून एका चंद्राचे सात चंद्र होतील ! आणि ते वेगवेगळ्या गतींनीं फिरावयास लागले कीं, त्यांची जी शोभा दिसेल ती पहावयास परमेश्वरानें या पृथ्वीवर मला त्या वेळेस जन्माला घालावें अशी माझी इच्छा आहे. पण मला वाटतें, एका चंद्राचा 'द्वेष' करणारा आमचा प्रथमनिर्दिष्ट आंग्ल कवि–मित्र या सात चंद्रांना पाहून सातांसमुद्रापलीकडे पळून जाईल, कीं सातव्या पाताळांत शिरेल, कीं कायमचा वेडा होईल कोण जाणें !

मला अशी एक शंका येते कीं, पाश्चात्य लोकांना चंद्राचें जरा वावडें असावें ! नाहीं तर ते असले उद्गार काढतेच ना ! शेक्सपीअर-सारख्या कविसम्राटांनीं चंद्राचीं आणि चांदण्याचीं सुंदर वर्णनें केलीं आहेत, तीं मी विसरलेला नाहीं. पण या कवींवर केवळ पश्चिमेचाच काय म्हणून हक्क ? ते सर्व जगाचे कवि. त्यांची मान्यता सर्व काळीं टिकावयाची. पण सर्वसामान्यत: पश्चिमेकडे पूर्वेच्या इतकें चांदोबाचें कोडकौतुक नसावें. इंग्रजी भाषेचेंच उदाहरण घ्या ना. चंद्राचें वर्णन करण्याच्या कामीं ती अगदींच कमकुवत ! 'मून–लाइट' याव्यतिरिक्त चांदण्याचा दर्शक असा दुसरा एकादा शब्द तरी तिच्या कोशांत आहे कां ? पण या कामीं आमच्या भारतीय भाषा पहा ! कसे गोडगोड आणि

१०५९२

सुरेख शब्द आहेत त्यांच्यापाशीं ! प्रत्येक शब्दांत कांहींतरी विलक्षण जादू भरली आहे असें वाटतें ! चंद्रिका, कौमुदी, ज्योत्स्ना....किंवा साधा आपला मायभाषेचा 'चांदणें' हा शब्द घ्या ना ! तसेंच चंद्र या अर्थाचे सर्व शब्द द्यावयास लागलों तर अमरकोशाचा पाठच सुरू केला म्हणून कोणास भीति वाटेल ! पण पहाच हे शब्दः– रजनीनाथ, कलानिधि, निशानाथ, सुधाकर....प्रत्येक शब्दाचें रहस्य उकलण्याचा प्रयत्न केला तरी तो आनंददायीच ठरेल.

आमच्या लोकांच्या मनावर चंद्राची जी एवढी पकड आहे, त्याचें कारण तरी काय ? मला वाटतें कीं, त्याची 'कला'च त्याला कारणीभूत आहे. कसा एकदम अनपेक्षित रीतीनें शोभा दाखवितो तो. आणि प्रत्येक वेळीं अगदीं वेगवेगळ्या रीतीनें ! चतुर्थीच्या चंद्राची मंद शोभा आणि पौर्णिमेच्या चांदण्याचा मनमुराद विलास यांत किती फरक आहे ? बोटींत पडलें असतां हालणाऱ्या दर्याबरोबर जेव्हां चांदोबाही नाचतो तेव्हां तो कांहीं वेगळाच दिसतो. फिरून घरीं परत येत असतां एकाद्या झाडाच्या शेंड्यावर बिनदिक्कत विराजमान झालेला निशानाथ मनांत कांहीं अकल्पित भावना निर्माण करीत असतो. चांदोबाचें चांदणें खरोखर कलावंताच्या प्रतिभेप्रमाणें आहे. कुठें तें सौंदर्याला हुडकील, कोणावर कसा प्रकाश पाडील, कोणतें सत्य पटवून देईल, कोणते भाव चेतवील, याचा पत्ताच लागावयाचा नाहीं ! कवींचें अत्युत्कृष्ट वर्णन करणारे एक महाराष्ट्र–कवि प्रत्यक्ष शारदादेवीसंबंधानें जें म्हणतात तेंच अगदीं थोड्या फरकानें आमच्या चंद्रिकेला यथार्थ लागू पडतें.

**जें अनंतपणें मायावी । न कळे नाटक लाघवी ।**
**जे थोर थोरांस गोंवीं । जाणपणें ॥**

चंद्रिका कितींना फसविते, कितींना झुलविते, किती ठिकाणीं तिचा

विलास होतो ! तिची भुलभुलाई कांहीं अवर्णनीय आहे. कलाच ती चंद्राची !

या कलेचा मोह आमच्या लोकांना कधीं आवरतां आलाच नाहीं. अगदीं वेडे आहेत ते चांदण्यावर. आणि त्याकरितां त्यांनीं प्रत्येक पूर्णचंद्राचा कोणत्या ना कोणत्या उत्सवप्रसंगानें मनसोक्त उपभोग घेण्याचा विडाच उचललेला दिसतो. कोजागरीचें दुग्धपान, त्रिपुरीचा दीपोत्सव, होळीचा खेळ...एकेका उत्सवाची नुसती आठवण किती रम्यतेनें भरलेली आहे !

आमच्या कवीनीं तर चांदण्याच्या जादुगिरीचें वर्णन करण्यांत आपलें सारसर्वस्व खर्च केलें आहे. एक अतिशय चटकदार कविता आहे संस्कृतमध्यें. विद्वान् म्हणतात 'भासाची' आहे ती. कोणाचीही असो, पण त्यांतील कल्पना तुम्हांला निश्चित आवडतील—'हा चंद्र पहा कसा आपल्या प्रभेनें मत्त झाला आहे, आणि सर्व जगाचा घोंटाळा उडवून देत आहे ! बिचारें मांजर दूध म्हणून धूसर कवटींत पडलेल्या चंद्र-किरणांना चाटीत आहे ! हत्तीचा गोंधळ पुसूंच नका ! झाडवळींतून दिसणाऱ्या चंद्रप्रकाशाच्या शलाकांनाच तो सोंडेंत अडकविण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण त्याला वाटतें कीं, ते आपले आवडते बिसतन्तूच आहेत ! आणि बिचारी तरुणी—संस्कृत वाङ्मयावरील उत्तानपणाचा आरोप सिद्ध करण्यास आधार म्हणून उपयोगांत आणणार नसाल तर सांगतों—रतिक्रीडेनंतर आपलें वस्त्र शोधण्याच्या धांदलींत शय्येवरील चंद्रकिरणांनाच वस्त्र म्हणून ओढीत आहे ! '—प्रेमी जनांतील अग्रेसर आपला मित्र माधवसुद्धां चांदण्यावर अगदीं फिदा असे. एकदा मालती रुसली होती. तेव्हां वैशाखांतील शुभ्र चांदण्याचा तिला वळविण्याच्या कामीं त्यानें उपयोग केला. 'सर्व दिशांभर पसरून राहिलेला आणि

मंदगतीनें जणूं एकाद्या घट्टशा रसाप्रमाणें खालीं हळु हळू स्रवणारा चंद्रप्रकाश म्हणजे केतकीच्या परागांचा जणूं पाऊस ' अशा तऱ्हेच्या त्याच्या कल्पनेनें मालतीला मोहून टाकिलें. चित्रा-चंद्राचें प्रणयी जोडपें कालिदासानें किती वेळां पाहिलें असेल कोण जाणें ! रसिकवर जगन्नाथ हे तर घटकान् घटका चांदण्याची वाट पहात बसत असावे असें मला वाटतें. एकादे वेळीं चंद्र उगवण्याची त्यांनीं वाट पहावी, चांदण्याचा पुरोगामी मंद उजळा त्यांना थोडासा दिसावा, चंद्रिकापानाकरितां चकोर अगदीं आतुर झाले आहेत अशी कविरायांनीं मनांत कल्पना करावी, पण इतक्यांत काळतोंडें ढगाळें येऊन उगवत्या चंद्राचें दर्शन होऊं नये व मग रसभंग झालेल्या बिचाऱ्या कवीनें स्वतःची निराशा विसरून चकोरांच्या आनंदांत विरजण घालणाऱ्या विधिघटनेला दोष द्यावा, असें कितीदां तरी घडलें असेल. अशा एक ना दोन—चांदण्यानें वेडावलेल्यांच्या हकीकती सांगाव्या तेवढ्या थोड्याच !

चंद्र म्हणून मोठेपणीं ज्याची आपण एवढी किंमत करतों तो चांदोबा लहानपणीं सुद्धां आपणाला किती प्रिय असतो ! लहानग्या रामानें चांदोबाचा हव्यास धरल्याची गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहेच. लहानपणीं चांदोबाकडे वर पाहून धांवत धांवत त्याच्याशीं केलेल्या चढाओढीचें कोणाला तरी विस्मरण होणें शक्य आहे का ? कित्येकांना चांदोबाचीं गोडगोड गाणीं आठवत असतील—

**चांदोबा चांदोबा, भागलास कां ?**
**लिंबिणीच्या झाडावर बसलास कां ?**
**लिंबिणिचें झाड करवंदी !**
**मामाचा वाडा चिरेबंदी !**

ह्या गाण्याच्या लकेरी अजूनही माझ्या कानांभोंवतीं घोंटाळत

असल्याचा मला अनेकदां भास होतो. पण चांदोबाची काय लहर आहे कोण जाणें ! तो विजेच्या प्रकाशाला जरा भितो असें दिसतें. कारण मुंबईच्या चकचकीत रस्त्यावरून पाहिलें तर आकाशांतील चंद्रमा अगदीं निस्तेज, फिका झालेलासा दिसतो. त्याच्या नुसत्या फिक्या चांदण्यापलीकडे प्रकाशाचें म्हणून कांहीं दिसतच नाहीं. मला जेव्हां मुंबईस चंद्राची मजा बघावीशी वाटते तेव्हां मी लांब महालक्ष्मीच्या बाजूला फिरावयास जातों, बिजलीनें चमकणाऱ्या मुंबईकडे पाठ करतों आणि मग समुद्राच्या लाटांवर रुपेरी चमकेचा वर्षाव करणाऱ्या चंद्राला मनमुराद पाहून घेतों.

या आठवणीवरूनच विचारावेंसें वाटतें कीं, तुम्हीं कधीं वल्हें घेऊन चांदण्यांतून होडी फिरवायला गेलां आहांत काय ? एकदा अवश्य जाच आणि मग चांदण्यांतील आंदोलनांत काय मजा येते ती पहा ! कोंकणांतील आमच्या एकाद्या खाडींत याल तर फार चांगलें ! तुम्ही गरीब असा, श्रीमंत असा, आमची चंद्रिका तुमच्या सेवेला उभी आहे. आपल्या रुपेरी कांडीनें ती काय करूं शकणार नाहीं ? एकादे वेळीं ती तुम्हाला असे कांहीं देखावे दाखवील कीं, वल्ह्यांवर हात ठेवून तुम्ही नुसते पहातच रहाल. अशा वेळीं मन कसें प्रसन्न होतें. आळसाचा, निराशेचा तिट्कारा येतो. नवीन नवीन विचार मनांत डोकावूं लागतात. सर्व जगभर पडलेला तो चंदेरी प्रकाश आपल्याला उत्साही बनवितो. किती प्रकारें विचार करावयास लावतो. चांदणें आपल्या सौम्य पण मनोरम प्रकाशानें सर्व जीविताच्या पसाऱ्याला एक नवीनच स्वरूप आणतें. अंधेऱ्या जागीं किरण पाडतें; जास्त चमकणाऱ्या वस्तूला थोडें मंदावतें; दिवसा जरा तीव्रपणें दिसणाऱ्या रेघांना झांकून एकीकरणाला मदत करतें; न दिसलेलें दाखवितें.

मला वाटतें आपल्या मनालाही आपण चांदण्याप्रमाणेंच रुपेरी

बनवावें; कल्पनेच्या प्रकाशानें सौंदर्य हुडकण्यास त्याला लावावें; निराशेच्या अंधेरांत आशावादी विचारांच्या शलाका पाडाव्या; म्हणजे कांहीं नवीनच दिसावयास लागेल. द्वेषाच्या आणि असूयेच्या तीव्र रेघांना स्नेहाच्या पटलानें झांकून टाकावें; म्हणजे चंद्रिका जसें पृथ्वीचें नंदनवन बनविते तसें आपल्याही जीविताचें नंदनवन बनविण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. चंद्राकडे पाहून आमच्या प्रथमपरिचित इंग्रजी कवीला तिरस्कार वाटत असेल तर वाटो बापडा! पण तुम्हांला–रसिकांना–चांदोबा आणि चांदणें यांचा विसर पडेल अशी भ्रामक कल्पना करून माझें चऱ्हाट जर मी हें असेंच वळावयास लागलों तर वाऱ्याला वारा घालण्याइतकें किंवा सोन्याला मुलामा देण्याइतकेंच तें निष्फळ ठरेल हें निश्चित!

**किर्लोस्कर,** जुलै १९३६.

# बैलगाडीचा प्रवास

'तुम्ही केलेला एकादा प्रवास' या विषयावरील बरेचसे निबंध तपासण्याचा—अर्थात् वाचण्याचा—मला एकदां प्रसंग आला. त्यांतील बरेचसे प्रवास मोटारीचे होते; कांहीं आगगाडीचे होते, कांहीं थोडे बोटीचे होते. पण बैलगाडीनें प्रवास करणारा मला एकच तरुण आढळला. सुमारें पांचसहाशें व्यक्तींपैकीं बैलगाडीला उदार आश्रय एकाकडूनच मिळालेला पाहून, माझी थोडी निराशा झाली. आणि तो निबंध वाचून मला थोडें कसेंसेंच वाटलें.


तसें म्हणाल तर त्याचा निबंध वाईट होता असें मुळींच नाहीं. उलट फार मजेशीर आणि थोडासा नवलपूर्ण असा एक स्वतःचा अनुभव त्या निबंधांत त्यानें चित्रित केला होता. एका लांबच्या रस्त्यानें बैलगाडींतून जात असतांना त्याच्या बहिणीचा व त्याचा 'स्त्री व पुरुष यांपैकीं श्रेष्ठ कोण ?' हा वादविवाद चालला होता...." गाडी संथपणें चालली होती. तोंच समोर वाघाची झुंज दिसली. ताबडतोब ताई

म्हणाली, 'पुरुष श्रेष्ठ ना रे? मग आतां घोडमैदान जवळच आहे'...." इत्यादि वर्णन करतां करतां लेखक म्हणतो "ताई स्त्री होती तरी गाडीवानास धीर देत होती! आणि मी पुरुष होतों पण...." त्याच्या पुढील वर्णनाचा मी आणखी सारांश दिला नाहीं तरी एवढ्यावरूनच त्याचा प्रवास किती नवलपूर्ण होता याची सहज कल्पना येईल.

पण माझी निराशा झाली ती वेगळ्याच कारणानें. इतक्या प्रवासांत गाडीचा असा प्रवास एकच आढळला, याचा अर्थ दिवसेंदिवस बैल-गाडीच्या रम्य आणि अपूर्व सुखाला आपण आंचवत आहोंत असाच नाहीं तर काय? मोटारीच्या शिंगापुढें गरीब बिचाऱ्या बैलगाडीच्या घंटावळी कोणाला ऐकायला येणार? वायुगतीनें वाटेल तिकडे नेणारी मोटार भेटल्यावर आपल्या रेंगाळत्या गतीनें काळाच्या निरवधित्वाची प्रत्यक्ष कल्पना देणाऱ्या बैलगाडीकडे बघतो कोण?....इत्यादी विचा-रांनींच बैलगाडीच्या प्रवासावरील तो निबंध वाचून मी थोडासा खिन्न झालों होतों.

खरें सांगावयाचें म्हणजे मला बैलगाडीचा प्रवास फार आवडतो. बैलगाडीच्या प्रवासालाच मुळीं **प्रवास** हें नांव शोभतें. कारण आधीं तो प्रवास असें वाटतें तरी. धांवत्या मोटारींतून किंवा पळत्या आगगाडीं-तून आपण जातों त्याला प्रवास असें नांव देणें मला तरी पसंत नाहीं. अंतर तोडणें एवढें आपण त्याला म्हणा पाहिजे तर. पण त्या पळत्या स्थितींत सृष्टिसौंदर्याचें पळतें सुद्धां पीक काढण्याची सोय नाहीं. मी एकदां दिल्लीहून मुंबईपर्यंत प्रवास केला. सुमारें छत्तीस तास आमची 'फ्रन्टीयर' सारखी धांवत होती. वाटेंत पुष्कळसे देखावे—अगदीं स्मृतिफलकावर खोदून ठेवण्यालायक—माझ्या दृष्टीस पडत होते. कित्येक दृश्यें पाहून तर मी अगदीं वेडा झालों होतों व तीं अगदीं मनांत

सांठवून ठेवावीं अशी मला इच्छा होती. त्या वेळीं मी तसा प्रयत्नही केला. पण मुंबईस उतरून सहज मनाशीं आठवतों तों एकही दृश्य पूर्णपणें माझ्या डोळ्यासमोर उभें राहीना. एकाद्या 'सिनेमा' सारखेंच होतें तें. आपण सिनेमा पहातों त्या वेळीं त्यांतील कित्येक दृश्यें खरोखरच मोठीं चांगलीं वाटतात; त्यांतील कांहीं वाक्यें अगदीं लक्षांत ठेवावीं असें वाटतें. पण मागाहून एकदोन दिवसांनीं प्रयत्न करावा तों त्यांतील एकादी सुंदर कोटी सुद्धां आठवण्याची मारामार पडते. कारण धांदलच फार. पण आमच्या बैलगाडीला धांदल मुळीं ठाऊकच नाहीं; संथपणा हा तिचा मुख्य गुण; बैलाच्या घुंगुरांच्या आवाजाची तिच्या गतीला सांथ; मधून मधून



"**येरे ऽऽ माझ्या बैला**" सारख्या गाण्यांचा गाडीवानाचा हृदयस्पर्शी सूर; त्यांत मिसळणारी मागूनपुढून येत्याजात्या गाड्यांच्या चाकांची खडखड, अशा 'आस्ते' थाटांत गाडीच्या प्रवाशाला मजा करावयाला चांगलाच अवसर मिळतो.

आणि देखावे किती सुंदर दिसतात! पुष्कळदां तर अगदीं अद्भुत असतात असें सुद्धां म्हणावयास हरकत नाहीं. त्यांतूनही गाडीचा प्रवास म्हणजे नेहमीं रात्रीचा. चांदणी रात्र असली म्हणजे तर पहावयासच नको! डुलणें असें मजेशीर वाटतें कीं, शांततेच्या जणूं रुपेरी पाळण्यांत आपल्याला घातलें असून प्रेमानें कोणी तरी हलवीत आहे; व मधून मधून बाहेरचीं सुंदर चित्रें दिसत आहेत. गडद अंधारांतून जातांना काय वाटतें तें अनुभवलेलेंच बरें. मध्येंच समोरून गाडी यावी म्हणजे आपल्या गाडीच्या दिव्यानें समोरच्या बैलांचे मांजरी रंगाचे डोळे मजेनें चमकतात. त्यांच्या हालत्या माना आपल्या गाडीला जणूं सलामीच देत आहेत असें वाटतें. पावसाळ्यांत जर आपण गाडीचा प्रवास करीत असूं तर त्या वेळीं सृष्टीचीं कित्येक अदृष्टपूर्व अशीं स्वरूपें पहावयास मिळतात. ज्येष्ठ महिन्यांतला गर्द अंधेर. '**नभ मेघांनीं आक्रमिलें**' अशी स्थिति. अशा वेळीं एकाद्या गर्द आंबराईत काजव्यांचा घडच्या घड लकन् चमकतो आणि डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच नाहींसा होतो. जणूं काय वनदेवीचे कोणी खेळकर दूत आपल्याला राळफेंकीचा खेळच करून दाखवीत आहेत! आणि त्यायोगें वनप्रदेशाचें जें अर्धस्फुट असें चित्र दिसतें त्यानें तर एक प्रकारची भीति सुद्धां वाटावयास लागते. त्या वेळीं गाडीवान तर खुशाल झोपेनें घोरत असतो. बैलांची मात्र चांगलीच सोबत वाटते अशा वेळीं.

ज्यानें बैलगाडीनें प्रवास केलेला असेल त्यालाच या बैलांच्या मैत्रीची खरी कल्पना येईल. खरोखर बैलांसारखे इमानी आणि बिनतक्रार नोकर मिळणें कठीण. म्हणूनच त्यांना साध्याभोळ्या सदाशिवानें आपल्या-समोरं बसण्याचा मान दिला आहे कीं काय कोण जाणें! अपशब्द म्हणून "बैल" या शब्दाचा उपयोग जेव्हां एकादा तोंडाळ मनुष्य करतो तेव्हां त्याच्या असभ्यतेपेक्षां त्याच्या कृतघ्नपणाचा मला अतिशय

संताप येतो. कारण खरोखर पाहिलें तर बैलांचा स्वभाव किती समजुतदार असतो! निरलसपणें काम करण्याच्या बाबतींत ते माणसाला खास मागें टाकतील. आणि शिवाय ते किती विश्वसनीय? आमच्या रत्नागिरीकडील एका गाडीवाल्याची एक गोष्ट मला माहीत आहे. तो नेहमीं **रत्नागिरी** ते **साखरपें** या रस्त्यावरून माणसांची व मालाची नेआण करावयाचा. एका खेपेला त्याला **राजापुरास** जावयाचें होतें. सकाळीं उजाडतां राजापूर आलें म्हणून जो पहातो तों गाडीवाला सरळ **साखरप्यांतच** आला होता! बैलांना काय? ते आपला रोजचा मार्ग चालत होते व **राजापुरास** जाण्याकरितां ज्या ठिकाणीं दोन रस्ते फुटतात त्या ठिकाणीं त्यांनीं आपला नेहमींचा रस्ता बिनबोभाट धरला आणि सरळ **साखरप्यास** आले! बैलांचे इतरही कित्येक गुण मोठे तारीफ करण्यासारखे असतात. त्यांचें घ्राणेंद्रिय मोठें तीक्ष्ण असतें. वाघाची वगैरे प्रत्यक्ष चाहूल सोडाच, पण नुसता वास आला तरी त्याची सूचना जेव्हां ते मालकाला देतात तेव्हांची त्यांची हालचाल मोठी निरीक्षण करण्यासारखी असते; पण मालकानें हुशारी दाखविली कीं, तेच कसे मजेनें चालावयास लागतात! बैलांच्या चाणाक्षपणाच्या व हुशारीच्या; त्यांच्या सोशिकपणाच्या व त्यांच्यायोगें निवारलेल्या संकटांच्या अशा कित्येक मजेच्या गोष्टी सांगतां येतील. किंबहुना बैलगाडीच्या प्रवासाचें एक मुख्य अंग त्यांत चालणाऱ्या सुंदर गप्पागोष्टीच होत.

आमच्या कोंकणांतील ‘ वेतोशी ’ गांवचे प्रसिद्ध गप्पाचार्य मरहूम परसुकाका यांची मला या ठिकाणीं आठवण येते. त्यांच्या गोष्टी मोठ्या मिष्ठास असत. त्यांचें असें सांगतात कीं, ते आपला बैलगाडीचा सर्व प्रवास बहुतेक फुकट, अर्थात् आपल्या जिभेच्या जोरावर करीत असत. त्यांची नोकरी कोल्हापुरास होती; त्यामुळें त्यांना रत्नागिरी ते कोल्हापुर वारंवार

प्रवास करावा लागे. रत्नागिरीहून संध्याकाळच्या गाड्या सुटल्या कीं, परसुकाका एका गाडीबरोबर सहज चालावयास लागावयाचे, गाडीवाल्याशीं बोलतां बोलतां कांहीं मजेच्या गोष्टी निघावयाच्याच; तात्यांची गोष्ट इतकी मजेशीर असावयाची कीं, गाडीवानानें सहज " भाऊ, मग गाडींतच या ना ? " असें मोठ्या प्रेमानें व गोष्ट ऐकण्याच्या लालुचीनें म्हणावयाचें; थोडेसें नको नको करीत काका त्या गाडींत चढावयाचे; त्यांची गोष्ट इतकी नवलपूर्ण, गाडीवानाच्या औत्सुक्यावर एवढी पकड बसविणारी असावयाची कीं, कांहीं वेळातें परसुकाका गाडींतील मालाच्या पोत्यांवर एकाद्या गादीवर पडल्याप्रमाणें सुखासीन व्हावयाचे आणि पुढें ह्यांच्या गोष्टीसह त्यांचा प्रवासही अव्याहत चालू असावयाचा.

आणि यांत नवल करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, गाडींतल्या संथ प्रवासांत गप्पागोष्टींना जसा रंग येतो असा कोठें येत असेल कीं नाहीं याची मला तरी शंका आहे. एकाद्या झाडावरील भूत, वडावरील मुंजा, एकाद्या झऱ्याच्या उत्पत्तीबद्दल दंतकथा, साप, वाघ यांच्या संवई व गती...इत्यादि तऱ्हेतऱ्हेच्या विषयांवर गोष्टी ऐकणारे व सांगणारे त्यांत भेटतात; आणि आळीपाळीनें ऐकणारे सांगणारे होतात व सांगणारे ऐकणारे होतात. अद्भुत रसाचा त्या ठिकाणीं पाट वहात असतो आणि मधून मधून भयानक आणि रौद्र यांचीही चव त्यांत चाखावयास मिळते. आणि अनेक ठिकाणीं त्या त्या गोष्टींचें प्रत्यक्ष मूळ—तो झरा, तें झाड, किंवा तें बीळ—समोर असल्यामुळें त्या गोष्टींना कांहीं विलक्षण चटकदारपणा येतो.

'बरं, नकोत या आतां गोष्टी' असें कधीं चुकून सुद्धां या प्रवासांत वाटेल अशी भीति नको. कारण, कोणत्या ना कोणत्या कारणानें

गप्पांचा प्रवाह नवीन नवीन विषयांच्या खडकावरून उच्छृंखलपणें उड्या टाकीत असतो. गाडीवानानें आपल्या बैलाचें नांव 'सांवळ्या' कां ठेवलें याचीच हकीकत सुरू व्हावयाची; एकादी मोडून पडलेली गाडी दिसली कीं, झाली त्याबद्दल चर्चा सुरू; एकादा शेंदूर फांसलेला शिलारूप मारुती दिसला कीं, सांग त्याचें चरित्र. अशा रीतीनें बदलता देखावा गप्पांच्या प्रवाहालाही सारखा बदलीत असतो. उलट आगगाडी किंवा मोटार फार भराभर धांवत असल्यामुळें, आधीं त्या गडबडींत कांहीं सुचत नाहीं; शिवाय डोळ्यांसमोरील देखावाही फार त्वरित बदलत असतो. आणि त्यांतही मोटारचा सारथी हा निदान गाडी गतिमान् असेपर्यंत तरी स्वत:ला फारच अपूर्व समजत असतो. आणि हातांत धरलेल्या चक्रामुळें आपण प्रत्यक्ष चक्रपाणी आहों अशी त्याची कल्पना असते कीं काय कोण जाणें ! पण बैलगाडी हांकणारा हा बिचारा साधाभोळा शेतकरी असतो. यंत्राशीं त्याचा फारसा परिचय नसला तरी त्याची दृष्टि साधी, पण मर्मभेदी असते आणि त्याला नाना तऱ्हेचे अनुभव आले असल्यामुळें त्याचें बोलणें नवलपूर्ण, घरगुती आणि आपुलकीचें असें वाटतें. गाडीवानाच्या गप्पासारखें खरें मजेशीर करमणुकीचें साधन दुसऱ्या कोणत्या प्रवासांत सांपडेल हें अनुभवानेंच ठरविलेलें बरें.

गाडीचा प्रवास अलीकडच्या काळींसुद्धां लोकांना अगदींच आवडणार नाहीं असें नाहीं, अशी आशा उत्पन्न करणारी एक बातमी मी कांहीं दिवसांपूर्वीं वाचली. सिरील रोझबरो नांवाच्या एका साहेबांनीं सर्व हिंदुस्तानभर बैलगाडीनें प्रवास करण्यास दोन वर्षांपूर्वी सुरुवात केली असून त्यांनीं दक्षिण हिंदुस्तान, बंगाल व संयुक्तप्रांत यांतील प्रवास नुकताच आटपलाही. त्यांना मिळालेल्या या संधीचा मला खरोखर हेवा वाटतो. त्यांच्या प्रवासाचें आठवड्याच्या 'क्रॉनिकल' मधील जो वर्णन

वाचील त्यालाही त्यांचा हेवा वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. किती किती नवनवीन गोष्टी त्यांना पहावयास मिळाल्या; किती महत्त्वाचे अनुभव मिळाले आणि खेडेगांवांतील खऱ्या हिंदुस्थानची त्यांना किती माहिती झाली ! आणि ह्याचें कारण त्यांनीं केलेला गाडीचा लांब-लांबचा प्रवास.

मघां मी एकाद्याच रात्रीच्या प्रवासाचें वर्णन केलें; पण लांबच्या प्रवासाची '**अधिकस्य अधिकं फलम्**' या न्यायानें कांहीं औरच मजा आहे. साधा **रत्नागिरी** ते **कोल्हापूर** तीन टप्प्यांचा प्रवास घ्याना. एकदांच मी तो केला (आणि मोटारीमुळें अलीकडे ती संधि आतां मिळतच नाहींशी झाली आहे.) पण त्याची आठवण बुजणें शक्य आहे कां ? साधारण दिवस मावळतांना गाड्या सोडावयाच्या. निदान पांचसहा गाड्यांचा तरी तांडा असावयाचा. कांहीं बैलांच्या गळ्यांत घुंगूर किंवा कांहींच्या घंटा; त्या सगळ्यांचें एक गोड मिश्रण

**'मनस्तु साधुध्वनिभिः पदेपदे हरन्ति सन्तो मणिनूपुरा इव ।'**

या बाणाच्या वर्णनाप्रमाणें एकसारखें आपल्याला रंजवीत असतेंच. गाडींत गप्पा मारावयाच्या, कंटाळा आला, चांदणें असलें, इच्छा झालीच तर, मध्येंच गाडींतून उतरून चालावयास लागावयाचें. बरीचशी रात्र झाली, कीं अर्थातच गप्पांबरोबर चालणें थांबतें. हळू हळू डुलकी यावयास लागते. झोंप जरी गाढ आली नाहीं तरी मोठी मजेची येते. कारण सुरेख सुरेख स्वप्नांना त्यांत अगदीं ऊतच येतो. नुकत्याच ऐक-लेल्या गप्पांतील भुतें येऊन पुढें उभीं रहातात, किंवा एकादा वाघच डुरकाळी फोडतो अगर एकाद्या भारलेल्या अद्‌भुत अरण्यांत शिरल्याचा भास होतो. त्यांत कधीं न खाल्लेलीं फळें खावयास मिळतात व न

पाहिलेल्या फुलांचा वास घ्यावयास मिळतो. इतक्यांत मध्येंच गाडीच्या बाजूचा दांडा डोक्याला लागून आपल्या स्वप्नसृष्टीचा चकाचूर होतो; पण गाडी सुरक्षित चालली आहे या जाणीवेनें आपल्या वृषभ-मित्रांना धन्यवाद देत आपण पुन्हां एकदां डुलकी घेतों. साधारण तीस मैलांच्या टप्प्यावर उजाडतें. टप्पा बहुतेक प्रशस्त अशा वडाच्या झाडाखालीं किंवा आंबराईत असतो. जवळ कुठें तरी पाणी असावयाचेंच. डोळे चुरचुरत असले तरी भात-पिठल्याची तयारी करावयाची. तोंपर्यंत बरोबर आणलेल्या झुणका-भाकरीचा जरा काटकसरीनें समाचार घ्यावयाचा. त्या वेळीं अन्न किती गोड लागत असेल तें अनुभविलेलेंच चांगलें. जेवल्यावर सोडून ठेवलेल्या गाडींत झोंपावयाचें. तोच त्या प्रवासाचा तंबू. संध्याकाळीं थोडें हिंडून फिरून, बैलांची दाणावैरण पाहून, व यथेच्छ फराळ करून पुन्हां गाड्या सोडावयाच्या. याच क्रमानें तीन दिवसांचा प्रवास संपला तरी केव्हां, हें लक्षांत सुद्धां येत नाहीं.

पूर्वी पूर्वी तर, वाटेंत चोरलुटारूंची भीति असे, त्या वेळीं या प्रवासाला साहसाचें स्वरूप येत असे. कोल्हापूर रस्त्यावरील आंबळीच्या खिंडी-संबंधीं गोष्टी निघाल्या कीं, असल्या साहसाचीं पुष्कळ वर्णनें ऐकावयास मिळतात. आणि अजूनही मोटारीनें त्या रस्त्यावरून जातांना भीतीचा एक शहरा अंगावर उभा राहिल्याशिवाय रहात नाहीं. असल्या गोष्टीं-तील चोरांच्या कांहीं कांहीं गोष्टी तर अगदीं विलक्षणच. असें सांगतात कीं, पुष्कळदां ते चालत्या गाडीचे बैल सोडून न्यावयाचे ! त्याची रीत अशी: रात्रीं गाडीवाला व प्रवासी थंड झोंपलेले; अशा वेळीं चोरांच्या एका साथीदारानें येऊन गाडीचें जोखड बैलाबरोबर ओढावयाचें व कांहीं वेळ अगदीं आस्ते बैलाबरोबर चालावयाचें; दुसऱ्या एका साथीदारानें मग बाजूनें येऊन एका बाजूच्या बैलाचा कांसरा

सोडावयाचा व त्याला बाजूला ओढावयाचें, अशा रीतीनें कांहीं वेळ एक बैल व एक मनुष्य यांनीं ती गाडी ओढावयाची ! अशाच रीतीनें कांहीं वेळानें दुसऱ्याही बाजूचा बैल सोडून न्यावयाचा व दुसऱ्या एका साथीदारानें त्याची जागा भरून काढावयाची. अर्थातच कांहीं वेळ या दोन मनुष्यरूपधारी बैलांनीं गाडी तशीच चालवायची आणि मग हळूच जोखड खालीं टाकून यःपलायन करावयाचें ! दुसरीकडे लपून बसलेल्या चोरांच्या टोळीनें निर्वृषभ झालेल्या त्या गाडीवर हल्ला करावयाचा व कृतकृत्य व्हावयाचें. अशा एक ना दोन, हजारों रोमांचकारी गोष्टी तुम्हांला अजूनही जुन्या जुन्या गाडीवाल्यांजवळ ऐकावयाला मिळतील.

गाडीच्या लांबच्या प्रवासांतील हें साहस आतां फारसें राहिलेलें नाहीं. तरीपण गाडींतून जाणाऱ्या प्रवाशाला आमच्या खेड्याच्या लोकस्थितींतील वैचित्र्य आणि काव्य अनुभविण्यास मिळेल. बैल-गाडीची ही स्तुति म्हणजे 'मोटार' गाड्यांची निन्दा नव्हे; आमच्या शेतकऱ्यांच्या जीवनांतील एका महत्त्वाच्या गोष्टीचें तें दिग्दर्शन आहे. आमच्या एकाद्या खेडेगांवाचें चित्र काढावयाचें असेल तर पार्श्वभूमींत एकादी सोडून ठेवलेली गाडी रंगविण्याचें कोणी चित्रकार नाकारील असें मला तरी वाटत नाहीं. चित्राची कल्पना केल्याबरोबर लहानपणीं वारंवार पाहिलेली एक गाडी माझ्या मनापुढें उभी रहात आहे !.... हातऱ्यांच्या तट्ट्यांनीं उभारलेला हा वृषभ-रथ किती शांत आणि थंड असा वाटतो. त्याची सर्व सजावटही खास देशीच असते. आणि कृषिजीवनाचें प्रतीक म्हणून शोभणारे बैल हीच त्याची प्रेरक शक्ति. स्वभावानें तरी ते किती सोशीक ? वाटेचे चाणाक्ष, गरजेचे गरीब आणि खाण्याचे अल्पसंतुष्ट. मुद्रा किती गंभीर आणि प्रेमळ ! आणि त्यांचें काम तरी किती चोख ! आजच्या घाई–गर्दीच्या जीवनांत आमच्या बैलगाडीच्या वेगाला कोणीही झालें तरी कासवाचीच उपमा देईल.

देवो बापडा ! पण आमची बैलगाडी ‘Slow’ पण ‘Sure’ आहे ! सशाच्या धांवेची आशा न बाळगतां कांसवाची आस्ते चाल स्वीकारून ध्येय निश्चित गांठावयाचें, संकटाला घाबरावयाचें नाहीं; व साहसाला आनंदानें तोंड द्यावयाचें असाच तिचा बाणा आहे. या तिच्या गुणांचा अनुभव घ्यावयाचा म्हणून म्हणा किंवा ग्रामजीवनाच्या काव्याचा आस्वाद घ्यावयाचा म्हणून म्हणा, बैलगाडीचा एकादा तरी प्रवास करावा अशी मी कोणाही रसिकास शिफारस करीन.

‘ज्योत्स्ना’, फेब्रुवारी १९३७

# रविवार

ती एका शनिवारची संध्याकाळ होती. आगामी रविवारची झुळूक जिकडे तिकडे प्रत्ययास येत होती. दुकानांतून गिऱ्हाइकांची येजा सुरू होती व जिन्नस देणाऱ्या 'फ्रॉयलाईन्स' (तरुणीं) ची तर धांदल पुसूंच नका. 'बोन्' शहरीं (कलोनजवळ) जाऊन त्या वेळीं मला सुमारें पांचसहा महिने झाले होते. पण दर रविवारीं सर्व दुकानें, धंदे बंद करून एकाद्या हरताळाच्या दिवसा-प्रमाणें सर्व बाजाराला औदासीन्य आणण्यामध्यें या जर्मन लोकांना काय वाटतें याचें मला तेव्हांही गूढच होतें. पण यावर जास्त विचार करण्यास आज मला वेळ नव्हता. एक कठीण जर्मन पुस्तक वाचून मला सोमवारला तयार करावयाचें होतें. कारण त्या पुस्तकांतील विषयावर उहापोह करण्याचें आमच्या प्रोफेसरांजवळ आगाऊच ठरलें होतें. माझ्या एका जर्मन सहाध्यायाला गांठून उद्यां रविवारीं हें पुस्तक वाचण्याचें काम उरकून घ्यावें असें मी ठरविलें. इतक्यांत अगदीं फुलाबोलाला गांठ पडते त्याप्रमाणें माझा मित्र 'लिओ' एका दुकानांतून घाईघाईनें

बाहेर पडतांना मला दिसला. लिओची मदत या कामीं घ्यावी, माझा निश्चय झाला.

" गुटेन् टाग् ( नमस्ते ) लिओ ! " मी म्हणालों.

" गुटेन् टाग्, भावे ! " त्यानें परत प्रणाम केला.

" लिओ, उद्यां सकाळीं एकाद्या 'काफे'मध्यें आपण भेटूं या काय ?" मी जरा आशेनें विचारलें.

" भावे, उद्यां तर रविवार. मी एका माझ्या मैत्रिणीकडे सबंध दिवस घालविण्याचें कबूल केलं आहे. " तो म्हणाला.

त्याचें अभिनंदन करून मी म्हटलें, " पण लिओ, सबंध दिवस रे तूं त्या 'मारिआ'कडे काय करणार आहेस ?" ( त्याची मैत्रीण कोणती तें अजमाविल्याबाबत जरासा आश्चर्यानें तो मजकडे पाहूं लागला. )

"अरे सबंध दिवस काय करणार ? मी तर म्हणतों खरोखर सुटीचा आनंद लुटायला आम्हाला सबंध रविवार सुद्धां पुरतच नाहीं." आपल्या हातांतील 'मापे' (पिशवी) सावरीत सावरीत तो म्हणाला.

"पण उद्यांचा दिवस सकाळीं ८ ते १० प्रो. ग्रेब्नरचें Ethnology (लोकशास्त्र) वरील तें जड पुस्तक वाचण्यास जरा मला मदत कर ना " माझ्या विनंतीला हा बळी पडणार असें मला वाटलें. व त्याला उत्तराला अवसर न देतां मी पुन्हां म्हणालों, "आणि शिवाय हिटलरच्या तत्त्वा-प्रमाणें मजसारख्या परदेशस्थाला सहाय्य करणं तुझं काम आहे." त्याच्या हिटलर-प्रेमाचें बटन दाबण्याचा मी प्रयत्न केला.

पण तो कसला वस्ताद ! हिटलरचाच आधार घेऊन त्यानें बाजू मजवर परतविली. " मित्रा, तूं विसरलास, कीं हिटलरचं तत्त्व असं कीं मजेनं, आनंदानं माणसाची शक्ति वाढते; आणि रविवारचा दिवस खऱ्या मजेंतच घालविण्याची त्याची सर्व राष्ट्राला आज्ञा आहे." मी कांहीं आणखी बोलणार हें ताडून, आधींच थोडासा वेळ मोडल्यामुळें अधीर झालेला लिओ मला पुन्हां विनवूं लागला : " भावे, तूं रागावूं नको हं ! मी रविवारीं कधींच काम करीत नाहीं. अन्य दिवशीं केव्हांही तूं सांगशील त्या ठिकाणीं येऊन मी तुला मदत करीन." एवढ्यावरच न थांबतां जातां जातां मला त्यानें उपदेश केला, " आणि मित्रा, तूंहीं रविवारीं आपल्या प्रबंधाच्या कामानं डोकं फोडून घेण्याऐवजीं चांगल्या मजेंत वेळ काढ. कोठें फिरावयाला जा; गाण्याला जा; गप्पा मार. पण वाचूं नको ! ' आउफ वीडरझेहेन् ' ( नमस्ते, येतों )."

मीही म्हटलें " आउफ वीडरझेहेन्, लिओ ! तुझा रविवार आनंदांत जावो ! " लिओ केव्हांच अदृश्य झाला.

पण पुस्तक वाचण्याचें माझें काम राहिलेंच होतें. हिंदुस्तानांत तर रविवारींच सर्व उर्वरीत कामें उरकण्याची माझी संवय. ती जाणार थोडीच ? " आमच्या शेजारची ' एलिझा ' हुशार तरुणी आहे. जर्मन वाङ्मयाचाही अभ्यास तिनें चांगला केला आहे. तिचीच मदत आपण घ्यावी. शिवाय तिचा प्रियकर या रविवारीं बाहेरगांवीं जावयाचा होता, असें ती म्हणाली होती. ती बहुतेक ना म्हणणार नाहीं. " मी मनाशीं ठरविलें. मला आशा उत्पन्न झाली. ताबडतोब घरीं येऊन ' एल्झा ' च्या खोलीची घंटा वाजविली. नमस्कार चमत्कार झाला. " एल्झा, उद्यां सकाळीं आपण कोठें 'काफे' त जाऊं या काय ? " मी उपन्यास केला.

" हो, हो अलबत. " एल्झा उद्गारली. मला वाटलें काम झालें. पण

बरोबर ग्रेब्नरचा ग्रंथ नेण्यासंबंधीं जेव्हां मी बोलूं लागलों, तेव्हां तर ती स्तंभितच झाली. तिच्या निळ्या डोळ्यांत आश्चर्य चमकूं लागलें. " म्हणजे, तुमच्या मनांतून उद्यां रविवारीं एका बिकट विषयाचा अभ्यास करावयाचा आहे वाटतं? मग मी साफ सांगतें, मी तुमच्याबरोबर येणार नाहीं! सुटी मी पवित्र समजतें. त्या दिवशीं काम करणं हें अमानुष आहे...." स्त्रीस्वभावसुलभ अशा ओघवती वाणीनें तिनें आपलें व्याख्यान आणखीं किती वेळ चालू ठेवलें असतें कोणास ठाऊक? रविवारीं काम करण्याची सूचना करण्याच्या अपराधाबाबत शिष्टाचाराला अनुसरून दिलगिरी प्रदर्शित करून हा जड ग्रंथ कसा वाचावा या विवंचनेंत मी पुन्हां पडलों!

"कांहीं हरकत नाहीं. मी शब्दकोशाची मदत घेईन व हा ग्रंथ स्वतःच लावीन. 'आप करे सो काम.' ही आपली म्हणच आहे. लागूं दे या जर्मनांना त्यांच्या रविवारच्या मागें. म्हणे सुटी ही पवित्र आहे. आम्हीं तर हिंदुस्तानांत सुटी ही पवित्र आहे कीं नाहीं याचा कधींच नाहीं विचार करीत. आम्हांला एवढें माहीत आहे कीं, सुटी ही सोइस्कर आहे. कांहीं नाहीं, उद्यां मी '**सेमिनार**'मध्यें (अभ्यासालयांत) जाऊन एकटाच हें काम करीन." मी मनाशीं ठरविलें.

उजाडला रविवार तो फारच सुंदर होता. बरेच दिवसांनीं आज सूर्यनारायणानें आपला प्रताप दाखविला होता. ४० फारेनहाईट उष्णता असणाऱ्या त्या दिवसांत सूर्याचीं किरणें फारच सुखकारक वाटत होतीं. जिकडे तिकडे रविवारच उधळलेला दिसत होता. उत्तम, व्यवस्थित कपडे घालून वृद्ध लोक चर्चकडे जात होते. सुंदर पोशाक करून मुलें बाहेर फिरावयास पडलीं होतीं. आसपासच्या खेडेगांवांत हिंडण्याकरितां जाणाऱ्या लोकांनीं गच्च भरून मोटार बसीस् भरधांव चालल्या होत्या.

जणूं काय आज जगांत मजेशिवाय दुसरें कांहींच नाहीं, अशी प्रत्येकाची मुद्रा सांगत होती. फुलविक्या वृद्ध बाईचा व्यापार तर अगदीं जोरांत चालला होता. **सेमिनार**मध्यें जातां जातां मी त्या बाईला



म्हटलें, "काय हो! आज रविवार. आणि तुम्हीं विक्रीचं काम करतां याचा अर्थ काय ?" मला वाटलें, जर्मनांच्या सुटीच्या तत्त्वाविरुद्ध जाणारी एक तरी व्यक्ति मी शोधून काढली. पण क्षणार्धांतच तो माझा विजय मावळला. बाई थंडपणें म्हणाली, "माझ्या मुला, म्हणतोस तें अगदीं बरोबर! मी सुद्धां आज सुटी घेणारच आहें. पण रविवारीं आपल्या तरुण मैत्रिणींना ताज्या फुलांचे गुच्छ घेऊन जाणाऱ्या तुझ्यासारख्या–या ठिकाणीं मी नकारार्थी मान डोलविण्याचा प्रयत्न केला–तरुणांचा रविवार जास्त यशस्वी व्हावा म्हणूनच मी हें काम करीत आहे. पण फक्त १० वाजेपर्यंतच बरं का ? त्यानंतर मीही शेजारच्या डोंगरावरील सुंदर हॉटेलांत आज एक प्रसिद्ध 'कॉन्सर्ट' आहे तो ऐकणार आहें व त्यानंतर बिअर वगैरे पेयें आहेतच. मी रविवार हा अति सुखाचा दिवस समजतें...."

"आउफ वीडरझेहेन्," मी म्हणालों.

प्रत्येकाचें हें रविवारचें तत्त्वज्ञान ऐकून माझी स्थिती '**त्रयाणां धूर्तानाम्**' या गोष्टींतील भोळ्या ब्राह्मणाप्रमाणें झाली. 'मी आज रविवारीं काम करतों म्हणजे एक मोठा अपराधच करतों म्हणावयाचा' मला वाटलें. मी सेमिनारमध्यें प्रवेश केला. व ग्रेब्नरचें जड पुस्तक उघडलें. प्रत्येक शब्दागणिक कांहीं ठिकाणीं मी अडत होतों. बाहेर पहावें तों सुटीच्या मदिरेनें बेभान झालेलीं माणसें इतस्ततः जातयेत होतीं. मी पुन्हां थोडें वाचण्याचा प्रयत्न केला. **सेमिनार**मधली शांतता मला जणूं सांगत होती, 'बाबारे, कशाला उगाच वाचण्याची खटपट करतोस ? जा, रविवारची मजा लूट, मग नव्या उत्साहानें सहा दिवस खूप काम कर, व पुन्हा रविवारीं नवीन उत्साह, नवीन आनंद यांची पैदास कर !' मी पुस्तक जाग्यावर ठेवलें व घरीं परतलों.

माझ्या हातून आज काम होईना. घरीं बडोद्याला, मुंबईला, किंवा रत्नागिरीला घालविलेले वेगवेगळे रविवार मला आठवले. एका रविवारीं हायस्कुलांत असतांना बीजगणिताचीं सुमारें पंचवीस उदाहरणें आम्हीं 'फेअर' केलीं होतीं. एका रविवारीं आदल्या दिवशीं राहिलेले अमर-कोशाचे दहा श्लोक पाठ करण्याचें माझ्यावर काम होतें. माझें हस्ताक्षर वाईट असल्यामुळें तें बराच वेळ वळविण्याचें काम मीं रविवारीं करावें असा काकांचा मला आग्रह होता. माझे एक नातेवाईक वकील होते. त्यांना खालच्या कोर्टाचीं कामें समजावून देण्याकरितां परगांवचे वकील रविवारींच येत व त्यांचीं कामें समजून घेण्यांत वकीलांचा व आलेल्या पाहुण्यांची बडदास्त ठेवण्यांत आमचा जीव अगदीं बेजार होत असे. माझे दुसरे एक नातेवाईक आपल्या बंगल्यांतील सामानसुमानाची साफसफाई, पुनर्रचना इत्यादि कामांत आपल्या रविवारचा सद्व्य (?) करून, उलट आम्हां मुलांची त्या कामीं मरमर मदत घेऊन आम्हाला नको तो रविवार असें करून टाकीत. आमचे एक प्रोफेसर रविवारीं 'एक्स्ट्रा पीरीअड' घेत. जणूं काय सबंध आठवड्यांत वाहलेली ज्ञानगंगा आमचें अज्ञान धुण्यास पुरी नव्हती आणि त्यांच्या अनुकरणानें मी स्वतः पण असे अधिक तास पुष्कळ घेतलेले आहेत. कचेरींतलीं कामें घरीं आणून आपल्या मुलांबाळांजवळ एक शब्दही न बोलतां कागदांत डोकें खुपसून रविवारचे रविवार घालविलेले मुंबईतील कित्येक हपीसवाले लोक मला माहीत आहेत. बडोद्यांत कित्येक मंडळी मोठमोठ्या 'बड्या' साहेबांना, (भेट मिळाल्यास) भेटण्याचीं कामें रविवारीं करीत. त्याप्रमाणें मीही पुष्कळदां केल्याचें मला आठवलें. एकूण रविवार म्हणजे मागील अंका-वरून पुढें चालू ठेवलेला लेख. तींच कामें, तेच लोक व तींच ठिकाणें; फरक म्हणून कांहीं नाहीं. जुना पत्रव्यवहार, सामानाची साफसुफ, पाहुण्यांचें आदरातिथ्य, उरलेल्या कामाचा जंजाळ इत्यादि गोष्टींनींच

आमचा रविवार रंगलेला असतो. व पुन्हां सोमवारीं कामाची घाई आहे ती आहेच. कामांत उत्साह नाहीं, कीं दृष्टींत ताजेपणा नाहीं.

दीड दोन वाजण्याच्या सुमाराला मी बाहेर पडलों. लिओच्या दुर्दैवानें त्याच्या मैत्रिणीला कांहीं आकस्मिक कामामुळें 'बोन्' सोडून जावें लागलें होतें. (हें मला नंतर कळलें) व शेजारच्या उपनगरांत 'मारिआच्या' वसतिस्थानीं फुकट धक्का खाऊन लिओ परत आलेला मला दिसला. मी कुत्सितपणें त्याला म्हटलें, "काय लिओ? कांहीं भांडण झालं काय?" "तें सगळं मागाहून सांगेन; पण आधीं आपण रविवार फुकट घालवूं या नको. चल आपण लांब कुठं तरी जाऊं!" लिओ म्हणाला. मला माहीत नव्हतें कीं, सकाळीं ६ ते रात्रीं ८ पर्यंत वाटेल तेव्हां तासातासाच्या अंतरानें लांब लांब जाणाऱ्या बसीस् आपणाला मिळतात. किंबहुना लिओपासून त्या वेळीं सहज जातां जातां रविवार अगदीं मजेनें, अगदीं नवीन रीतीनें घालविण्याचीं कितीतरी साधनें त्या ठिकाणीं होतीं त्यांची मला माहिती मिळाली. मीच केवळ माझ्या अभ्यासालयांत ना काम ना खेळ अशा स्थितींत माझे रविवार केवळ फुकट घालवीत होतों.

समोरून आलेली एक बस् आम्हीं पकडली व सुमारें ४०।५० मैल लांब असलेल्या ऱ्हाइनच्या कांठीं वसलेल्या एका गांवीं गेलों.

तेथें कित्येक इतर लोक होतेच. नदींत आंघोळ व पोहोणें कित्येक करीत होते. तरुणतरुणींचे मजेनें गाणारे तांडेच्या तांडे जणूं काय आनंदाच्या समुद्रांत पोहत होते. जवळचा एक डोंगर आम्हीं चढलों. खूप फिरलों. 'फर'च्या झाडांच्या रांगाच्या रांगा, त्यांतून फिरण्याला सुंदर पायवाटा, मधून मधून दगडांचींच तात्पुरतीं बनविलेलीं बांकें

इत्यादिकांनीं तें फिरणें फार मजशीर वाटत होतें. एकीकडे वनश्रीचा आनंद, तर एकीकडे मधूनमधून मानवनिर्मित सुखसोई. वनांतील एका पानगृहांत आम्हीं बसलों. तेथें सुंदर नृत्य सुरू होतें. मला ' **इंडियन** ' म्हणून पाहिल्यावर कांहीं जिज्ञासू लोक मजकडे आले. हिंदुस्तान, जर्मनीसंबंधीं गप्पा निघाल्या. चहा विनोद झाला. पुन्हां आम्हीं 'पान' केलें. मी त्या वेळीं अभ्यास, काळज्या, लेक्चरें इत्यादि सर्व विसरलों होतों. रात्रीं १० वाजतां आम्हीं घरीं आलों. झोंप सुंदर आली. दुसरे दिवशीं नवीन उत्साहानें कामाला सुरुवात केली. मग तर दर आठवड्यासच मी शनिवारीं संध्याकाळीं ४ वाजतांच माझ्या रविवारला सुरुवात करीत असें. रविवारचा सबंध दिवस कधीं फिरून तर कधीं गप्पा मारून, खेळून किंवा सिनेमा, गाणें इत्यादिसारख्या करमणुकींत मी घालवीत असें. मुख्य कटाक्ष प्रतिदिनचें काम विसरणें व नवीन स्थळ पहाणें यावर.

त्यायोगानें मला एक नवीनच तत्त्व समजून आलें कीं, आठवडाभर चांगलें काम करण्याची किल्ली कशांत असली तर ती उत्तम रीतीनें घालविलेल्या सुटींतच. बालपणीं ज्याप्रमाणें मोठेपणची कल्पना यावी त्याप्रमाणें सबंध आठवड्याचें भविष्य रविवारवर सहज सांगतां येतें. चांगल्या गेलेल्या रविवारच्या भांडवलावर पुढील आठवड्याचा व्यापार मोठ्या सुखानें मला करतां येऊं लागला. व मला चांगलें समजलें कीं, लिओ रविवारचा अभ्यास करण्यास कां तयार नाहीं, एल्झा रविवारीं जड पुस्तक कां वाचण्यास तयार नाहीं, व फुलेंविकी म्हातारी सुद्धां. रविवारीं आपला धंदा कां बंद करते, आणि सगळेच लोक आपल्या Week-end करतां एवढे कां जपतात.

या सगळ्याचें इंगित सुटीच्या जादूंत आहे. सुटी म्हणजे सुटका. आपलें ऑफिस आज आपणाशिवाय बंद आहे, आपण ज्या १०-१५ च्या

लोकलनें फोर्टमध्यें जातों ती आपल्याशिवाय आज जाणार, ऑफिसच्या शिपायाचें आज दर्शन होणार नाहीं, पुस्तकें कपाटांत घोरत पडलीं आहेत, उशीरां उठायला आज हरकत नाहीं, इत्यादि सुटकेच्या, विश्रांतीच्या, सुखाच्या कल्पना ज्या दिवशीं मनांत वावरूं शकतात तोच सुटीचा दिवस. आणि असा दिवस आठवड्यांत एकदां न पाळणें म्हणजे एल्झा म्हणते त्याप्रमाणें खरोखर अमानुष आहे. तो आपण पाळून दुसऱ्यांना त्याची संधीही दिली पाहिजे. मी म्हणतों हा सुटीचा जिव्हाळा ज्यानें जाणला, तोच दैवाचा पुतळा, त्यालाच सुखाची खाण लाधली !

' **सहविचार,** ' जुलै, १९३९

# नर्मदेंतला गणपति

लहानपणीं मला आमच्या घरच्या देवांची पूजा करावी लागे. आणि मला तर त्या पूजेचा अतिशय कंटाळा येत असे. त्याला कारणेंही तशींच होतीं. पहिलें म्हणजे त्या त्या देवांच्या वेगवेगळ्या लहरी संभाळणें. गणपतीला तुळस वहावयाची नाहीं अन् शाळिग्रामाला तुळशीपत्राशिवाय ठेवावयाचा नाहीं; अन्नपूर्णेला तांबडया फुलांचें वावडें, तर गणपतीचें त्या रंगाच्या फुलाशिवाय चालावयाचें नाहीं. प्रथम सकाळीं उठल्याबरोबर वेगवेगळीं फुलें गोळा करण्याचा उपद्व्याप आणि त्यानंतर त्यांचें देवतांनुसार वर्गीकरण. विशेषत: विशिष्ट फुलें अगर पत्रें मिळविण्याच्या कामीं फारच त्रास पडावयाचा. एकादे वेळीं तुळशी मिळाल्या नाहींत म्हणजे "तुळशी मिळाल्या नाहीं, आतां शाळिग्रामरूपी विष्णु उपाशी राहील" या कल्पनेनें माझ्या आईला जेवण जात नसे, तर तिची समजूत कशी करावी या काळजीनें मी कासावीस होई. एके दिवशीं अशाच तुळशी नव्हत्या. आई म्हणाली, "आज जर तूं तुळशीशिवाय देवाला ठेवलास तर मी अन्नग्रहण करणार

नाहीं." आमच्या शेजारीं एक शास्त्रीबुवा रहात. त्यांच्या बागेंत पुष्कळ तुळशी असत व त्यांतून आमच्या वापरापुरत्या काढण्याची त्यांची अनुमती असे. मी ताबडतोब त्या बागेकडे धांव घेतली. मी तुळशी काढतों आहे असें पाहून शास्त्रीबुवा धांवतच आले.

"मूर्खा, आज तुळशी काय काढतोस?" शास्त्रीबुवांच्या या गर्जनेनें मी तर स्तंभितच झालों!

"कां काढावयाच्या नाहींत आज तुळशी?" मी जरा भीत भीत विचारलें.

"रविवारीं तुळशी काढूं नयेत समजलास? तसेंच एकादशी वगैरे सारख्या दिवशींसुद्धां तुळशी काढणं शास्त्रानं वर्ज्य ठरविलं आहे...... तुम्हां अलीकडच्या पोरांना कांहीं वर्जावर्ज नाहींच!"....

शास्त्रीबुवांचीं अशाच तऱ्हेनें वारंवार मिळालेलीं साविर्भाव व्याख्यानें मला आतां सर्व आठवत नाहींत. पण सर्व देवांची तब्बेत सांभाळण्याकरितां नुसत्या फुलें-तुळशीकरितां सुद्धां किती जिकीर होई त्याचें हें एक उदाहरण झालें. फुलें जमिनीवर ठेवावयाचीं नाहींत; ज्या परडींत काढावयाचीं त्यांत आधीं केळीचें किंवा कसलें तरी पान घालावयाचें; आणि या सर्वांहीपेक्षां फुलांचा वास घ्यावयाचा नाहीं. किती ते वेगवेगळे आणि कठीण नियम! सुंदर सुंदर गुलाबाच्या, बटमोगऱ्याच्या किंवा जाईच्या फुलांचा वास न घेण्याकरितां माझ्या बालमनाला केवढें मनःसंयमन करावें लागे याची आतां आठवण झाली म्हणजे माझ्या हातून तें झालें तरी कसें याचेंच मला राहून राहून आश्चर्य वाटतें!

पण या पूजेच्या कामीं सर्वांत कसला त्रास होत असेल तर तो देवांच्या संख्येचा! आमच्या देव्हाऱ्यांत चारपांच बाळकृष्ण, पांचसहा देवी, सातआठ नर्मदे गणपती, कांहीं पितळेचे गणपती, एक विठोबा. रखुमाईची मूर्ति, दत्ताच्या चांदीच्या पादुका, एक द्वारकेंतला चक्रांगद, शाळिग्राम, बाण, इत्यादि इत्यादि देव होते. या सगळ्यांना धुवून पुसून, त्यांना एकेक गंधाचा ठिपका लावून, त्यांची वर्जावर्जें संभाळून त्यांना साजतील अशीं फुलें किंवा पानें अर्पण करणें म्हणजे चांगलें अर्ध्या–पाऊण तासाचें काम असे. मला पुष्कळदां वाटे कीं, देवासंबंधीं व धर्मासंबंधीं एवढी मोठी आस्था दाखविणारे आमचे काका, दादा किंवा आत्याबाई याच कां नाहीं स्वत: देवाची पूजा करीत? निदान त्या देवांची संख्या तरी कां कमी करीत नाहींत?

पण उघडपणें असा प्रश्न विचारण्याचें मला धाडस नव्हतें.

एकाग्र मनानें वेगवेगळ्या आकाराच्या व रूपांच्या देवांची पूजा करणें हें माझ्या बालमनाला अशक्यच होतें. आमच्या वडील मंडळीचेंही नानातऱ्हेच्या मूर्तींचें पूजन करतांना एकाग्र मन होत असेल कीं काय याची मला अजूनही शंकाच आहे. मग पांच देवांची एकदम पूजा (पंचायतनपूजा) वगैरेसारख्या गोष्टी शोधून काढण्यांत आमच्या धर्मानें मिळविलें तरी काय कोण जाणें? अशासारखे कांहीं विचार माझ्या मनांत तेव्हां येत. मला वाटतें ज्यांना या तऱ्हेच्या घरगुती वातावरणांतून जाण्याचा प्रसंग आला असेल त्यांनाही अशा तऱ्हेचे विचार अजून आठवत असतील.

शेवटीं एके दिवशीं हिय्या करून मी माझें हृद्गत आईपुढें ओकलें.

"या देवांच्या संख्येला मी अगदीं कंटाळलों आहे. आपण त्यांना घराखालच्या नदींत समाधि देऊं या (पूजेपुरते फक्त सुटसुटीत कांहीं देव शिल्लक ठेवावे एवढा 'सेफ्टी क्लॉज' मी घातला होता); अगर त्यांना एका चांगल्याशा पेटींत बंद करून ठेवून रोज फक्त त्या पेटीचीच पूजा बाहेरून करूं या; आपण गुरुचरित्राच्या पोथीची नाहीं का वेष्टनावरून पूजा करीत, तशीच अगदीं ही करावयाची!" मी एक सुधारणा सुचविली.

आईला अर्थातच तें पटलें नाहीं. तिनें हळुहळू माझी समजूत घातली आणि त्या दिवशीं पूजा करीत असतांना सर्व देवांचा आमच्या घरीं येण्याचा तिनें मला इतिहास सांगितला. "तुझे एक काका फार हुशार आणि उमदे होते. दुर्दैवानें ते तरुण असतांनाच आम्हाला सोडून गेले. कीर्तन शिकण्याकरितां काशीस गेले होते. तिकडे एका साधूनें त्यांना हा गणपति दिला. याची पूजा कर. यानें विद्या प्राप्त होईल." त्या गणपतीवर त्या दिवशीं मी ताम्र पुष्पांचा वर्षावच केला.

"तुझे दुसरे एक काका नरसोबाच्या वाडीला गेले होते. तेथें त्यांना आरोग्य मिळालें. त्यांनीं या चांदीच्या दत्तपादुका आणल्या. तेव्हांपासून त्यांची आम्ही पूजा करीत आहोंत." पादुकांबद्दलही माझा आदर थोडासा वाढला. "ही तांब्याची अन्नपूर्णा आहे ही तुझ्या आजीबरोबर—म्हणजे आमच्या सासूबाईबरोबर—आमच्या घरांत आली. ही अन्नपूर्णा फार कडक आहे. हिच्या पूजेमध्यें कोणत्याही तऱ्हेची हयगय उपयोगाची नाहीं. ती घरांत असतां आपल्याला कधींच कसला तोटा पडावयाचा नाहीं." कै. आजीच्या अन्नपूर्णेची त्या दिवसापासून मोठ्या व्यवस्थितपणें पूजा करण्याची जबाबदारी मला भासूं लागली.

अशा रीतीनें वेळोवेळीं झालेल्या संभाषणांत मला पूर्वजांच्या प्रवासांची,

त्यांच्या मनोभावनांची पुष्कळ माहिती झाली. द्वारकेला गेलेल्या आत्याबाईची आठवण, त्यांनीं आणलेला चक्रांगद देत होता. पंढरपूरहून आणलेली एक पांडुरंगाची मूर्ति आमच्या दुसऱ्या एका आजीच्या भक्तिभावनेची साक्ष देत होती. वेगवेगळ्या रंगाचे, आकारांचे ते वेगवेगळे बाणशाळिग्रामादि देव माझ्या लहानग्या मनांत त्या त्या ठिकाणाविषयीं चित्रमय कल्पना उत्पन्न करीत होते. समुद्रांत बुडालेली द्वारका, जगन्नाथपुरींत मिळणारा सात तपेल्यांत एकदम शिजणारा भात, नरसोबाच्या वाडींत संध्याकाळच्या आरतीच्या वेळीं येणारे भूतवेताळ, हरिद्वारीं उच्छृंखल वहाणारी गंगा, रामेश्वरचा सेतु....जवळ जवळ सर्व भारतखंडाचा भूगोल मी निर्माण केलेल्या काल्पनिक स्वरूपांत माझ्या मनश्चक्षूंसमोरून थयथय नाचत असे. त्या वेळीं जागृत झालेली या सर्व ठिकाणीं जाऊन येण्याची इच्छा अजूनही तृप्त झाली नसली तरी त्यापैकीं एका ठिकाणीं मी कांहीं दिवसांपूर्वी जाऊन आलों.

आणि हो! आरंभीं सांगण्यासच विसरलों कीं, त्यावरूनच नर्मदेंतील गणपतीविषयीं विचार करण्याचा हा प्रसंग आला.


बडोद्यापासून नर्मदा-कांठचीं कित्येक ठिकाणें अगदीं जवळ आहेत. अशा एका ठिकाणीं मी नुकताच जाऊन आलों आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, घरीं परत येतांना नर्मदेंतील कांहीं बाण व गणपती म्हणून समजल्या जाणाऱ्या तांबड्या शिला मी बरोबर आणल्या. घरच्या सर्व देवांना जलांत समाधि द्यावी म्हणून सूचना करणारा मी नर्मदेंतील गणपती वगैरे आणून माझ्या संग्रहीं ठेवूं लागलों हें पहाण्यास आई आज असती तर तिला काय वाटलें असतें कोण जाणें? लहानपणाच्या माझ्या सूचनांची तिनें थट्टा केली असती कीं 'माझा मुलगा

आतां चांगला धर्माचरणाला लागला आहे ' या विचारानें तिच्या भोळ्या मनाला आनंद झाला असता कोण जाणे ?

पण मी सरळच सांगतों कीं, हे गणपती मी कांहीं पूजा करण्याकरितां आणलेले नाहींत. मला कोणी सनातनी धर्मवेडा म्हणेल या भीतीनें नाहीं मी हें सांगत. खरोखरच कोणत्या भावनेनें प्रेरीत होऊन हा देवसंभार मी घरीं आणला याचा माझ्या मनाशीं शोध घेत असतां माझ्या मलाच जें वाटलें तें मी सांगत आहे. तसेंच केवळ भूगर्भशास्त्राचा अभ्यास करण्यालायक धोंडे म्हणूनही मी त्यांना आणलेलें नाहीं. तसाही विचार एकदा मनांत होता. वर्ष दीड वर्षापूर्वी मीं जर्मनींत होतों, तेथें माझ्या एका जर्मन मित्रानें असला अभ्यास चालविलाही होता. तो संस्कृतज्ञ असून शिवाय भूगर्भशास्त्रज्ञही ( Geologist ) आहे. त्यानें गंडकींत सांपडणाऱ्या शालिग्रामशिलांचा पृथक्करणात्मक अभ्यास करून भूगर्भशास्त्राच्या आधारें शालिग्राम-संस्कृतीचें कालखण्ड वगैरे ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि त्याला नर्मदेंतील गणपती, चक्रांगद वगैरे सारख्या शिला पृथक्करणाकरितां पाहिजेही आहेत. तशा कांहीं शिला तिकडे जर्मनींत पाठविण्याचें मी कबूलही केलें होतें. पण हे माझे गणपती मात्र मी त्याला पाठविण्यास तयार नाहीं. प्रयोगशाळेंत त्यांना पाठविण्याची आतां माझ्या मनांत कल्पना सुद्धां नाहीं !

मग लहानपणच्या प्रमाणें त्यांची पूजा करण्याचा का मला हव्यास आहे ? तसेंही नाहीं; पण ते आणण्यांत थोडासा श्रद्धाळूपणा आहे यांत शंका नाहीं. गणपती विद्यादाता, त्याची मूर्ति आमच्या वडिलोपार्जित देव्हाऱ्यांत आहे. आईनें सांगितलेल्या त्याच्या पूजेच्या महिम्यानें मनावर जे परिणाम झाले होते तेच नकळतपणें जागृत झाले असावेसें मला वाटतें. नर्मदेंत परवां मी स्नान करीत असतां मला असें वाटलें कीं,

ज्या गणपतीची मोठ्या भक्तिभावानें आमच्या देव्हाऱ्यांत पूजा केली जाते आणि मीही कांहीं दिवस नाखुषीनें कां होईना केली, त्यांची खाणच या ठिकाणीं मला सांपडली. मला वाटलें कीं, घ्यावे यांतील कांहीं गणपती आणि जावें आईकडे धांवत धांवत आणि सांगावें



" काकांना काशीच्या साधूनें गणपति दिला, तर हा पहा मीच स्वतः प्रत्यक्ष नर्मदेंतून जाऊन आणला आहे." आणि त्या योगानें आईला होणाऱ्या सात्विक आनंदाचा वांटेकरी व्हावें. आतां या जन्मीं तें शक्य नाहीं, याचीही जाणीव ताबडतोब झाली. दुसराही एक विचार मनांत आला. 'न्यावा हा गणपति बरोबर आणि प्रत्यहीं त्याला निदान वंदन तरी करावें ! येईल त्यायोगानें माझ्या लेखनाला यश ! होईल कदाचित् श्रेष्ठ विद्याप्राप्ति !'

अशा रीतीनें माझ्या मनांत नाना तऱ्हेचे विचार चालले होते. नर्मदामाईच्या सुखकर पाण्यांत मनमुराद डुंबण्यांत मोठी मजा वाटत होती. किंचित् काळसर असें तिचें पाणी तळांतून वर दिसणाऱ्या नानारंगी दगडाधोंड्यांनीं अद्‌भुतरम्य दिसत होतें, पांढरे स्वच्छ गोल गोटे, घट्ट झालेल्या शेंदराप्रमाणें गडद लाल दिसणारे ते गणपती म्हणून गणले जाणारे शिलाशकल, कित्येक पिवळे, कित्येक निळसर तांबडे दिसणारे........अशा नाना तऱ्हेचे धोंडे पहातांना वाटे कीं, नर्मदेनें एक सुंदरसें प्रदर्शनच मांडलें आहे. दूरवर सातपुड्याच्या निळ्या रांगा दिसत होत्या, वरील निळ्या आकाशाबरोबर त्यांचें संगनमत दिसत होतें, तर तीरावरील शुभ्र वाळवंटाशीं त्यांचा विरोध दिसत होता. नर्मदेला जणूं दऱ्याखोऱ्यांतून वाट काढतां काढतां आतां निरंकुश मार्ग मिळाल्यामुळेंच कीं काय, एक प्रकारचा संथपणा आलेला प्रत्ययास येत होता. आसपासच्या सर्व सृष्टीची ती माता प्रौढत्वानें शोभत होती. लहानपणीं पाठ केलेले नर्मदाष्टकांतील कित्येक श्लोक आपोआपच माझ्या तोंडीं आले. आणि ते किती सार्थ आहेत असें वाटलें ! नर्मदेच्या पाण्याच्या मंद हालचालींचें जणूं शब्दचित्र देणाऱ्या

**महागभीर-नीरपूर-पापधूत-भूतलम्**

किंवा

**सुमत्स्य-कच्छ-नक्र-चक्र-चक्रवाक-शर्मदे ।**

**त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥**

अशांसारख्या कित्येक नादमधुर पङ्क्ति मी पुनः पुन्हा मनाशीं घोळवीत होतों.

या सर्व संस्मरणीय कल्पनांचें एक प्रतीक म्हणून मी ते तांबडे व पांढरे पाषाण बरोबर घेतले. ज्याप्रमाणें प्रवासांतील सुरम्य देखाव्यांना आपण आपल्या कॅमेऱ्यांत सांठवून ठेवीत असतों, त्याप्रमाणें या सर्व आनंदाचा सांठाच जणूं मी त्या दगडाधोंड्यांच्या रूपानें भरून घेत होतों. आणि अशा रीतीनें माझ्या नकळतच मी माझ्या घरांतील देवसंख्येंत भर घातली! मी जशी अनेक देवांच्या पूजेसंबंधीं कुरकुर करीत असे तशी मात्र पुढें कोणी करूं नये म्हणून बडोदें येथील आमच्या निवासस्थानीं जे दोनच देव आहेत त्यांच्या शेजारीं मी त्यांना नुसतें दर्शनीय वस्तु म्हणून ठेवून देणार आहे. आणखी पंचवीस किंवा पन्नास वर्षांनीं आमचा कोणी वंशज घरांतील एक अडगळ म्हणून त्यांना बाहेर फेकून देईल, कीं शास्त्रप्रेमानें त्यांना तो प्रयोगशाळेंत पाठवील, कीं त्याच्या एका वेडया पूर्वजाला हंसेल, त्यासंबंधीं आतांच मी अनुमान कसें करूं?

पण एकदा मला असेंही वाटतें कीं, त्या नर्मदेंतील गणपतीचा इतिहास त्याला जर कसाबसा कळला, तर नर्मदेच्या तीरीं जाऊन येण्याची त्यालाही इच्छा होईल, आणि तोही कदाचित् परत येतांना त्याला सुंदर वाटणारे आणखी कांहीं गणपती बरोबर घेऊन येईल!

पण मी मात्र जेव्हां जेव्हां त्या गणपतीकडे पहातों, तेव्हां तेव्हां नर्मदेचें तें अवर्णनीय सौंदर्य माझ्या डोळ्यांसमोर उभें रहातें. आयुष्यांतील कंटाळ्याचें आणि श्रमाचें आनंदाच्या व उत्साहाच्या सोन्यांत रूपांतर करणारा मी तो मला सांपडलेला एक परिसच समजतों!

'मौज', १९ जून १९४०

# कोकणचे कातळ*

"कोकणांत आहे काय तुमच्या? कातळ आणि तांबडी माती!" अशा तऱ्हेचे उद्‌गार आपण पुष्कळदां ऐकतों.

गरीब कोकणाची हेटाळणी करण्याकरितां अशा रीतीनें कित्येकजण बोलतात; पण कित्येकांना कोकणची माहितीच नसते आणि कित्येक कोकणांत एके काळीं राहूनही त्यांना कोकणभूमीच्या खऱ्या स्वरूपाचा विसर पडलेला असतो. पण खरें म्हणाल तर कोकणाच्या कातळांत कितीतरी काव्य आणि सौंदर्य भरलेलें आहे. त्याचें वर्णन करावें तेवढें थोडेंच! मी जर कवि असतों तर कोकणच्या कातळांवर मीं एक मोठें काव्य लिहिलें असतें. "गोदागौरव" लिहिणाऱ्या चंद्रशेखरांनीं जर आमचें कोकण पाहिलें असतें तर "कोकणगौरव" त्यांनीं केव्हांच लिहिला असता याविषयीं मला तरी शंका नाहीं. तसेंच राहून राहून मला

* कोकणच्या डोंगरावरील खडकाळ प्रदेशांना 'कातळ' म्हणतात.

आश्चर्य वाटतें, कीं कोणाही कवीनें कोकणच्या कातळाचा पोवाडा अजूनपर्यंत कां गाऊं नये ? कालिदास हा एवढा मोठा प्रवासी होता ना ? मग त्यानें कोकणच्या भूमीवर कधीं पाय ठेवलाच नाहीं म्हणावें काय ? कारण जर त्यानें तसें केलें असतें तर मला वाटतें त्यानें आपल्या मेघाला–त्रेंचसें दक्षिण दिशेस जाण्यास सांगून–कोकणच्या डोंगरावर किंचित् विश्रांति घेण्याची सूचना निःसंशय केली असती.

तुम्हीं विचाराल, " तुमच्या त्या कातळांना काय हिमालयाचा भव्य-पणा आहे, कीं विंध्याचलाच्या वनश्रीचें सौंदर्य आहे, कीं मलय पर्वताचा सुगंध आहे ? कोकणच्या डोंगरमाथ्यावरले ते उजाड प्रदेश–त्यांनाच ना तुम्ही कातळ म्हणतां ? आहे काय असें त्यांच्यांत मोठेंसें ? " मला मान्य आहे कीं, तुम्ही विचारतां ते मोठमोठे गुण त्यांच्यांत नाहींत. आणि म्हणूनच मी म्हणतों, त्यांच्यांत कांहीं तरी नवीन, कांहीं तरी अद्भुत आहे. राजप्रासादाचा भव्यपणा किंवा ताजमहालाचें सौंदर्य एकाद्या गरीबाच्या झोपडींत कुठलें सांपडायला ? तीच स्थिति कोकणच्या कातळाची.

कातळ कविप्रतिभेप्रमाणें आहे. प्रतिप्रसंग नवनव्या स्वरूपाचे उन्मेष तो तुम्हांला दाखवितो. आणि सृष्टिमातेनें आपल्या त्या लाडक्या बाळाचा थाटही तसाच ठेवला आहे. पूर्वेकडे सह्याद्रीच्या रांगा, तर पश्चिमेकडे समुद्राचा अथांग पसारा. एकाद्या तपस्व्याप्रमाणें भासतें त्या कातळाचें तेज ! त्याचा चेहरा हजारों वर्षांच्या ऊन्ह, पाऊस आणि वारा यांच्या माऱ्यानें अगदीं ओबडधोबड, उग्र दिसतो; पण त्याबरोबरच त्यांत एका अनिर्वचनीय गूढपणाची झांक मारते. वर सूर्य प्रचंड ताप देत असो कीं बाजूला वाऱ्याचा सोसाटा चाललेला असो, आमचा हा कातळऋषि अगदीं निश्चळ, निवांत असतो. त्याच्या त्या

शांततेकडे पाहून समुद्रालाही कसेसेंच वाटत असावें. कारण एकसारखी चाललेली असते त्याची चळवळ नी खळबळ. पण कातळाची शांतता कोठली येणार आहे त्याला? लक्ष्मीचा बाप तो. चंचल म्हणूनच तर त्याचा गुण मुलींत उतरला व सुभाषितकारांना एक चांगला विषय मिळला.

कातळावरून हिंडतांना—विशेषतः तेथील शांतता अनुभवितांना अशा तऱ्हेचे विचार साहजिकच मनांत आल्याशिवाय रहात नाहींत. कातळावर शांतता किती असते याची दुरून कोणाला कल्पनाही येणार नाहीं. कोकणांतील कोणत्याही एका गांवांतून किंवा शहरांतून —रत्नागिरींतूनच म्हणा घटकाभर—जरा अंतरावर असलेल्या एखाद्या डोंगरावर जा. सुमारें पंधरावीस मिनिटांच्या वेळांतच जनसंमर्दाच्या गजबजाटापासून दूर आल्याचा तुम्हांला प्रत्यय येईल. जिकडेतिकडे कातळच कातळ पसरलेला! दूर अंतरावरून समुद्राची रवरव ऐकावयाला येईल तुम्हांला. पण तिच्या योगानें तेथील शांतताच अधिक जाणवेल.

**“शांत वाजली गती शेवटीं, शांत धरित्री शांत निशीथीं”**

अशा तऱ्हेच्या कव्युक्तीचें स्वारस्य त्या वेळीं तुम्हाला कळेल.

` पण जिकडे तिकडे शांत व निर्जन वाटणारा हा कातळ कंटाळा कधींच आणणार नाहीं. कातळ आणि कंटाळा यांचें अहिनकुलाइतकेंच सख्य आहे म्हणा ना! त्याची विविधता सांगावी तेवढी थोडीच! सपाट असा तो कोठें दिसतच नाहीं. उंच—सखल प्रदेशांनीं तो अगदीं भरलेला असावयाचा. त्यांत मध्येंच तुम्हांला दगड फोडून, पातेरा भाजून बनविलेलें एखादें लहानसें शेत दिसेल; मध्येंच एखादी चिऱ्यांची खाण

असेल; वर काळा दिसणारा तो कातळ, पण आंतून त्याचें हृदय प्रीतीच्या लालीनें कसें भरलेलें आहे याची कल्पना त्या चिरेखणीवरून तुम्हांला येईल. एखाद्या ठिकाणीं लहानमोठे काळेकुट्ट दगड कोणींतरी रचून ठेवल्याप्रमाणें तुम्हांला दिसतील. जणूं काय कोणा अद्भुत भूतपिशाच्चांचें तें एक सभास्थानच ! कारण त्यांतला एखादा गुळ-गुळीत पण उंच दगड अध्यक्षाच्या खुर्चीसारखा प्रतिष्ठित दिसतो, तर बाकीचे धाकटे धाकटे दगड सामान्य सभासदांचीं आसनें असावीं असें वाटतें.

एखाद्या ठिकाणीं स्वतःच्या कल्पनाराज्यांत पाहिलेल्या एका लहानशा स्वर्गाचें चित्रच तुम्हांला दिसेल. एक लहानसा स्वच्छ पाण्याचा ओढा, त्याच्या बाजूला सुंदर चिमुकलींशीं झाडें, तेथें यथेष्ट गान करणारे पक्षी, बाजूला आकर्षक अशी दगडाधोंड्यांची मांडावळ, वरतीं निळेंनिळें आकाश, दूर ऐकूं येणारें समुद्राचें अस्फुट संगीत–आणि याशिवाय आजूबाजूला दुसरें कांहीं म्हटल्या कांहीं नाहीं ! केवळ शांतता ! एखाद्या यक्षकन्येनें प्रियकराला दाखविण्यासाठीं स्वहस्तानें रंगविलेलें आणि शांततेच्या रेशमांत लपेटून ठेवलेलें एक चित्रच जणूं ! हें वर्णन म्हणजे कुणाला गप्पासुद्धां वाटतील; पण माझ्याबरोबर आलांत तर रत्नागिरी-जवळच्या एका कातळावरलें असलें एक रम्य स्थान मी तुम्हांला अवश्य दाखवीन.

कातळाच्या रम्य आणि शांत स्वरूपाप्रमाणें त्याचीं भयानक आणि रौद्र स्वरूपेंही आहेत. पावसाळ्याच्या आरंभीं ढगांनीं जिकडून तिकडून गर्दी केली म्हणजे कातळावर जें कांहीं एक भयंकर वातावरण निर्माण होतें तें पुसूं नका ! त्या वेळेस असलेलें आकाशाचें काळेंकभिन्न रूप कातळावरून अगदीं पूर्णपणें दिसल्यामुळें अधिकच भयाण वाटतें.

आणि काळा कातळ संपून घननील आकाशाला कोठें सुरुवात होते तेंही कळत नाहीं त्या अंधेरांत. अशा वेळीं भयंकर कडकडाट होऊन जेंव्हां वीज चमकते त्या वेळेस मनुष्याची अक्षरशः घाबरगुंडी वळते.

रत्नागिरीहून सुमारें चार कोस असलेल्या माझ्या 'वेतोशी' गावीं एका जून महिन्यांत मी जात होतों. प्रथम थोडेंसें आभाळ होतें एव-ढेंच. एकदोन डोंगर ओलांडून एका मोठ्या कातळावरून मी जात होतों. हां हां म्हणतां जिकडून तिकडून ढग आले! सगळीकडे काळें-भोर झालें! आणि एवढ्यांत चक् होऊन जें मोठमोठ्यानें कडाडलें त्याची आठवण झाली तरी अजून मी दचकतों! पहावें तिकडे सर्व काळोखानें धुंद झालेलें दिसे. मध्येंच वीज चमकून काय दिशाज्ञान होईल तेवढेंच. मला वाट दिसेना, आणि त्यांतच मी आतां नाहींसा होणार असें मला वाटावयास लागलें. मी वाट चुकलों; पण पहातों तों सुदैवानें मी एका कुळवाड्याच्या वाडींत आलों होतों. तेथील एकाच्या सहाय्यानें दिशा साफ झाल्यावर मी घरीं आलों.

असले वाट चुकण्याचे प्रसंग कातळावर पुष्कळदां येतात. कित्येक कातळ लांबवर पसरलेले असतात. मधून मधून कुड्याचीं अगर कर-वंदीचीं झुडुपें किंवा मध्येंच दिसणारा एखादा वड याखेरीज वाटेची खूण ठेवण्यास म्हणून दुसरें कांहीं साधन नसतें. वाटा म्हणजे पायांनीं मळून काय दिसतील तेवढ्या! शिवाय अंतराची कल्पना पण चटकन् येत नाहीं. आणि दूरचा देखावा नेहमीच रम्य दिसला तरी चालतां चालतां मात्र नाकीं नव येतात! एखादें खुणेचें म्हणून पलीकडच्या डोंगरावर दिसणारें झाड आपण धरून ठेवावें, त्या दिशेनें जावें. आणि पहावें तों आपला कातळ आणि समोरचा डोंगर यांमध्यें एक दरीच्या दरीच आहे! असें झालें म्हणजे कोणी दुसरा जाणता भेटेपर्यंत स्वस्थ

रहाण्यापलीकडे मार्गच नसतो. आणि एवढ्यांतच जर दिवस मावळला तर...‘ **शय्या भूमितलं दिशोऽपि वसनम्** ’...अशा योगिराजाच्या स्थितींतच रात्र काढण्याची पाळी येते.

मुंबईला बरींच वर्षें नोकरीकरितां राहिल्यावर कोकणच्या आपल्या गांवीं येत असतां वाटेंत कातळावर वाट चुकून तेथेंच आपल्या दोन मुलांसह रात्र काढलेले एक गृहस्थ मला ठाऊक आहेत. त्या वेळीं रात्रीं कातळावर त्यांना वाटलेल्या नाना तऱ्हेच्या भीतीचें आणि शंकांचें वर्णन करावयाचें म्हटलें तर मनोरंजक होईल यांत संशयच नाहीं.

यावरूनच कातळावरील कित्येक अद्‌भुतरम्य स्थळांची आणि गोष्टींची मला या वेळीं आठवण होते. कातळावरील बहुधा प्रत्येक ठिकाणाला एक एक आख्यायिका आहे आणि तिला पुष्टिकारक अशीं तेथलीं दृश्येंही असतात.

रत्नागिरीजवळील नेवरें गावाहून गणपतिपुळयास जाण्याच्या वाटेवर एक कातळ आहे. त्याच्यावर वाघानें पंजे मारावे अशा तऱ्हेच्या खुणा आहेत. एका कासाराचें आणि वाघाचें तेथें द्वंद्व झालें आणि त्यांत कासार मारला गेला. पण तो भूत झाला असून त्याला संतुष्ट करण्याचा मार्ग म्हणजे जाणारा-येणारानें त्या जागीं एकएक धोंडा टाकावा अशी तेथें आख्यायिका आहे. अर्थातच त्या जागीं दगडांची एक मोठी रास--झाली आहे. लहानपणीं तेथून जातांयेतांना कासाराच्या भीतीनें आमचें मन चरकत असे आणि आम्ही तेथें एक एक धोंडा टाकीत असूं.

दुसरें एक स्थळ मला आठवतें. आमच्या गांवाच्या दक्षिणेस एक डोंगर आहे. त्याच्यावरील कातळावर एक सुंदर स्थळ आहे. आंब्याचीं

उंच सुरेख अशीं कांहीं झाडें तेथें आहेत. आणि त्या रायीच्या मध्य-भागीं एक पाण्याचा आड आहे. एक प्रकारें गूढ आणि अगम्य असें तें स्थळ वाटतें. आमच्या गांवांतील देवीचें तें माहेर आहे असें सांगतात. फारच रम्य माहेर शोधून काढलें आहे आमच्या देवीनें! एरव्ही उजाड असलेल्या ह्या कातळावर देवीच्या माहेरीं आम्ही पुष्कळदा जातों आणि तेथील शांततेचा अन् थंडाईचा यथेच्छ आस्वाद घेतों.

अशा रीतीनें कोठें देवीचें माहेर तर कोठें पिराचा गाडगा, कोठें नायकिणीची बाऊळ तर कोठें मुंजाचा वड अशा नाना तऱ्हांच्या अद्भुत स्थळांनीं आमच्या कातळांना एक प्रकारचें मनोरंजकत्व आलेलें आहे. एखाद्या संशोधकाला तर त्यांत एक नवीन क्षेत्रच मिळाल्यासारखें वाटेल. पण त्याहीपेक्षां कोणाही थकल्याभागल्या जिवाला कातळावर काढलेल्या थोडक्याशा वेळानें किती मजा वाटेल ती प्रत्यक्ष अनुभविलेलीच बरी.

असल्या आमच्या कातळांची कोणी हेटाळणी करतांना मीं पाहिलें म्हणजे माझें हृदय अगदीं पिळवटून येतें आणि राहून राहून आश्चर्य वाटतें कीं, कोंकणच्या कातळांची ही एवढी गुणपरंपरा झांकून जावी तरी कशी? रहाण्याचीं सुंदर सुंदर ठिकाणें या ठिकाणीं बांधून आपला विश्रांतीचा किंवा पुनरुत्साह मिळविण्याचा काळ असल्या ठिकाणीं काढून पहाण्यासारखा आहे. एरव्ही कोठेंही वारा नसला तरी कातळावर तो हटकून असावयाचाच. हवा तर अशी शुद्ध आणि उत्साहप्रद असते कीं, बोलून सोयच नाहीं! कातळावर फिरणेंही फार मजेचें. कोणाला चढावयाचें असेल तरी शक्य असतें; धावण्यालाही भरपूर जागा असते. क्वचित् जांब, करवंदें वगैरेही सांपडतात. कधीं न ऐकलेले पक्ष्यांचे विविध आवाज ऐकूं येतात;

नवीन अदृष्टपूर्व, आनंददायी, स्फूर्तिप्रद आणि अद्‌भुतरम्य अशा ठिकाणीं गेल्याचें सुख निश्चित मिळतें. “ प्रतिवर्ष एक प्रवास जर्मनी–इंग्लंडांत कर अगर एक कोकणची सफर कर ” अशी कोणा दान-शूरानें निवड करण्याची मला संधि दिली तर मी कोकणची सफरच निवडीन. कारण युरोपांतील चैनीपेक्षां कोकणच्या कातळावरील मजाच मला अधिक प्रिय आहे.

'किर्लोस्कर', नोव्हेंबर, १९४०

# पहिली उडी

पहिली उडी ?

सोपीही असते आणि कठीणही असते !

सोपी अशामुळें कीं, पहिली उडी पडली नाहीं व मारणाराच पडला तर त्याचें हंसें व्हावयाचें नाहीं; कारण बोलूनचालून पहिला प्रयत्न ! आणि पडलीच तर कौतुक मात्र पुष्कळ. याच्या उलट ती अतिशय कठीण तर खरीच !

कशी ?

याबद्दल सांगावें तेवढें थोडेंच. माझाच अनुभव घ्या. पहिली उडी मारावयाला मी सुरुवात केल्यानंतर बरोबर वीस वर्षांनीं माझी उडी

पडली! इतक्या अवधींत मी एकसारखा पडत होतों, पण माझी उडी पडत नव्हती.

वीस वर्षांनीं पुरती होणारी ही उडी होती तरी कोणत्या प्रकारची याबद्दल कुतूहल कोणाच्याही मनांत जागृत होईल. मी मलखांबाच्या उडीसंबंधानें बोलत आहें. रत्नागिरीला मी इंग्रजी शाळेंत प्रथम गेलों त्या वेळेस आम्हांला 'तालीम' हा अवश्य विषय होता. मलखांबाची पहिली उडी ( आखाडेवाले लोक आपल्या परिभाषेंत तिला 'मुट्ठी' ह्या छोट्या पण जड नांवानें ओळखतात; पण प्रथम शिकणाराला तीच शिकवावयाची असल्यामुळें तिला 'पहिली उडी' असेंही म्हणतात. ) प्रत्येकाला अवश्य आलीच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. अर्थात् मलाही ती मारावी लागलीच. पण मलखांबावर आंग उडवून डोकें खालीं आल्याबरोबर प्रथमच जगाचा जो उलटा देखावा दिसला त्यानें मी कितीतरी घाबरून गेलों. मास्तर मला वर धरण्याचा प्रयत्न करीत होते तरी हातापायांची धडपड करण्यास मी सुरुवात केली. त्या कठीण मलखांबावर माझे हातपाय आदळत होतेच. मास्तरनीं कसाबसा मला खालीं सोडला तरी खालच्या वाळूंत मी पडलोंच. नाकातोंडीं वाळू गेली. मास्तर मला पुन्हां मलखांबावर चढवीत होते तरी मी कसाबसा निसटून सरळ वर्गांत आलों. आमचे हेडमास्तर मला इंग्रजी जरा बरें ( म्हणजे भाषान्तर पाठमालेंतले शब्द मला खडाखड पाठ होते ) येत असल्यामुळें माझ्यावर खूष असत; त्यांच्या परवानगीनें मलखांबावरील उडीपासून मी माझी सुटका करून घेतली.

मला अनेकदां असें वाटतें कीं, अशी सुटका मी न करून घेतों तर बरें झालें असतें.

पण या गोष्टीनंतर जवळ जवळ वीस वर्षांनीं बडोद्यांत नोकरीला

आल्यावर एका व्यायामप्रेमी मित्राच्या आग्रहावरून ' पहिली उडी ' मारण्याचा मी पुन्हां प्रयत्न केला. एवढ्या वयांत उडी मारणारे हे नवीन मल्ल ( ? ) पाहून अर्थातच आसपासच्या मुलांना तो एक करमणुकीचा विषय झाला होता. तरी पण

**प्रारब्धम् उत्तमजना न परित्यजन्ति**

या न्यायाचा अवलंब करणें अवश्यच झालें. नाहीं तर थट्टेपरी थट्टा आणि शेवटीं ' पहिली उडी ' सुद्धां मारतां आली नाहीं हें एक कायमचें शल्य रहावयाचें. बरीच खटपट करावी लागली मला त्याकरितां. व पहिली उडी कशी कठीण तेंही पटलें; पण माझ्या मित्राच्या शिक्षणकौशल्यानें म्हणा किंवा माझ्या चिकाटीनें म्हणा, एके सुदिनीं गेली एकदांची उडी. आणि तीही कोणी धरल्याशिवाय ! मलखांबावर डोकें खालीं करून जगाकडे बघण्याचा विक्रम झाला एकदां माझ्या हातून ! मला कधीं वाटलें नव्हतें कीं, कधीं काळीं ही उडी मला साधेल. ( अर्थात् त्यानंतर पुढील उड्या शिकण्याचा प्रयत्न मी केला व मलखांबविशारद झालों असला गैरसमज कोणी करून घेणार नाहींच. )

पण वीस वर्षांनीं पडलेल्या या ' पहिल्या ' उडीनें मला केवढें थोरलें एक तत्त्वज्ञान शिकविलें. मी त्याला 'पहिल्या उडीचें तत्त्वज्ञान' असें म्हणतों.

तसें म्हणाल तर अमेरिका शोधून काढणाऱ्या कोलंबसाची चिकाटी अथवा लहानपणीं अगदीं तोतरा असूनही जगांतील उत्कृष्ट वक्ता होणाऱ्या डेमॉस्थिनीसचा प्रयत्नवाद यांतून मिळणाऱ्या बोधापेक्षां का

६१०२

माझें पहिल्या उडीचें तत्त्वज्ञान कांहीं जास्त सांगणार आहे ? अर्थातच नाहीं. पण असल्या मोठ्या उदाहरणांबद्दल माझा एक आक्षेप आहे; आणि तो असा कीं, हीं उदाहरणें जरी कितीही स्फूर्तिदायक आणि आदरणीय अशीं वाटलीं तरी तीं आकाशांत लांब लांब असणाऱ्या तारकांप्रमाणें अगम्य वाटतात. किती सुंदर चमकतात त्या तारका! पण आपणाला काय त्याचें ? तसेंच केवढा मोठा दैदीप्यमान आदर्श हा कोलंबसाचा किंवा डेमॉस्थिनीसचा ? ऐकावयाला वाटतो गोड ! पण आपण कोठें एकादें नवें खंड शोधावयास जाणार आहोंत वा आपणाला कोठें मोठमोठ्या सभा आपल्या तुफान वाणीनें हालवून सोडावयाच्या आहेत ? आपल्याला–अर्थात् सर्वसामान्य मनुष्याला–आपला साधासुधा रोजचा मानवी व्यवहारच पहावयाचा आहे. त्याकामीं काय येणार हीं मोठमोठीं चरित्रें ? अशा तऱ्हेचे विचार साहजिकच याविषयीं कोणा-च्याही मनांत येतील. त्यापेक्षां एकाद्या माणसाला जी गोष्ट–अगदीं साधी कां असेना ती–अतिशय अगम्य वाटली, पण जिच्यांत त्यानें प्रयत्नानें यश मिळविलें, त्याच गोष्टीचा अनुभव म्हणून मनुष्यानें पुढें करावा. त्यांत एरव्हीं कांहीं नसलें तरी प्रत्यक्ष अनुभवाचा ताजेपणा खास असतो. याच दृष्टीनें माझें पहिल्या उडीचें तत्त्वज्ञान मी पुष्कळदां पुढें आणीत असतों. एकाद्या अठरा वर्षांच्या मलखांबांत प्रवीण असलेल्या उमद्या तरुणाला असें वाटेल कीं, आहे काय त्यांत मोठेंसें ? हो, त्याच्या दृष्टीनें त्यांत कांहीं नाहीं, हें मला पूर्ण मान्य. फार काय, एकादा सात वर्षांचा चिमुरडा मुलगा कदाचित् ती उडी दोन दिवसांत देखील शिकेल. पण या जगाची मजाच अशी आहे कीं, एकाद्या लहान मुलाला साध्य असलेली गोष्ट एकाद्या पंचविशी तिशीं-तल्या तरुणाला येणार नाहीं ! अर्थात् मलखांबाची पहिली उडी मी वीस वर्षांनीं कां होईना, पण मारूं शकलों या गोष्टीबद्दल मी मोठा गर्व वहात आहें असें माझ्या या लिहिण्यावरून कोणी समजणार नाहींच.

माझा भर आहे तो यावरच कीं, जी गोष्ट कित्येक वर्षांपूर्वी अशक्य म्हणून आपण सोडून देतों, तिच्यांतसुद्धां प्रयत्नानें यश येऊं शकतें. हाच मला पहिल्या उडीनें दिलेला धडा. या धड्याच्या मुळाशीं आपण जरासे जाऊं या. पहिली उडी, पाण्यांतली पहिली बुचकळी, पहिलें भाषण, शिकविण्याचा पहिला तास, किंबहुना प्रथमच करण्याची कोणतीही गोष्ट एक प्रकारच्या भीतीनें व्याप्त असते. जीवाला तें नको असतें. यश नाहीं आलें तर ? त्यापेक्षां पहिलें धाडस न केलें तेंच बरें. आणि या भीतीबरोबरच एक प्रकारचा आळस किंवा कंटाळाही आपल्याला छळीत असतो. लवकर उठावयाचें असलें तर अंथरुणाबाहेर चटकन् उडी मारावयालाच मनुष्य अनमान करतो. आणि एकादा तर त्याला बळी पडून अंथरुणावरच पडून रहातो.

रामायणांत एके ठिकाणीं याच तऱ्हेच्या भीतीचें एक साधें पण सुंदर असें उदाहरण मी एकदां वाचलें. कडक थंडीच्या दिवसांचें वर्णन करतांना "बगळे पहा सरोवराच्या कांठाशीं कसे अगदीं विचार करीत बसले आहेत, पण पाण्यांत उडी मारावयाचें कांहीं धाडस होत नाहीं त्यांना !" ही गोष्ट सांगतांना कवीनें पुढील उपमा दिली आहे. "भित्रे लोक जसे युद्धांत उडी टाकावयाला घाबरतात, व केवळ दुरून तटस्थपणें पहात असतात, त्याच रीतीनें हे बगळे बसले आहेत !" किती समर्पक आहे उपमा ही ! खरोखरच कोणत्याही पहिल्या धाडसाच्या वेळीं, मग तें कडक थंडींत लवकर उठण्याइतकें अगदीं रोजच्या परिचयांतलें साधें धाडस असो, मनुष्य अकारणच किती तरी विचारांत पडतो, रणांगणांत उडी टाकावयाला तो कचरतो. पण एकदां कां त्यानें धीर केला कीं, बहुधा त्याला यश येतेंच. कोणीही स्वतःचेंच आयुष्य जरी पडताळून पाहिलें तरी त्याला अशा तऱ्हेनें मिळालेल्या लहानसहान यशांची बेतशीरशी तरी यादी करतां येईल असें मला वाटतें.

माझ्या पहिल्या उडीनें मला एक जी अत्यंत महत्वाची गोष्ट शिकविली ती म्हणजे तिच्यांत असलेलें एक अद्भुत सामर्थ्य! पहिल्या भीतीचें किंवा आळसाचें बुजगावणें एकदां नाहींसें केलें म्हणजे मग पुढलें काम कसें अगदीं सुरळीत होतें. आणि तसें पाहिलें तर ही भीति दूर करणें इतकेंसें कठीणही नाहीं. अपयशाची भीति असेल तर तिला जागाच नाहीं. कारण चढावयाचा प्रयत्न करील तो पडेल. त्यांत काय मोठेसें? यशाच्या मार्गाला लागेल तो क्वचित् अपयशाचा वांटेकरी होईल. पण पहिल्या प्रयत्नाच्या वेळीं त्यानें भीतीवर वा आळसावर एकदा जय मिळविला ही गोष्ट तर सत्य. अर्थातच त्याच्याच जोरावर दुसराही प्रयत्न करणें श्रेयस्कर. आणि केव्हां तरी त्यांत यश मिळणार यांत संशयच नाहीं. अशा तऱ्हेचा युक्तिवाद कोणत्याही क्षेत्रांतली पहिली उडी आपल्याला शिकविते. आणि जास्त लक्षांत ठेवण्यासारखें म्हणजे असें कीं, तिच्यापासून आपल्याला एकप्रकारच्या नवचेतनेचा लाभ होतो. भीतीला आगाऊच तिनें दूर केलेलें असतेंच व कोणत्या तरी अफाट शक्तीचा स्रोत तिनें आपल्या नसानसांत सोडलेला असतो.

याला अगदीं नेहमीच्या परिचयाचें उदाहरण म्हणजे एकाद्या सभेंत भाषण करण्याचें. मुख्य वक्ता म्हणून जरी बोलण्याचा प्रसंग प्रत्येकाला येत नसला तरी आभार मानण्याकरितां किंवा अध्यक्षाच्या निवडणुकीची सूचना अगर अनुमोदन या कोणत्या ना कोणत्या कार्याकरितां सभेंत अगर एकाद्या समूहांत बोलण्याचा प्रसंग पुष्कळांना येत असतो. अशा वेळीं सभा भरलेली पाहून आपण गांगरून जातों. काय बोलावें सुचत नाहीं. पाय लटलट कापूं लागतात. 'बंधु भगिनींनो'

म्हणावें कीं, ‘ सद्गृहस्थ हो ’ म्हणून हांक मारावी, कांहींच सुचत नाहीं. मनांत ठरवून घोकून ठेवलेला ‘ फॉर्म्युला ’ त्या वेळेस आठवत नाहींसा होतो. जाऊंच नये व्यासपीठाशीं आणि सांगावें दुसऱ्या कोणाला तरी, अशा प्रकारची ‘ व्यवस्थेशीर पीच्छेहाट ’ करण्याचीही मन सूचना करतें. हें लिहावयाला वेळ लागला याच्याहून कितीतरी थोडया वेळांत हे सगळे विचार मनांत येतात. पण याला आपण एकच उपाय योजितों आणि तो म्हणजे सरळ उभें राहून बोलावयास सुरुवात करणें. संकटांतून बाहेर पडण्याचा उत्तम उपाय म्हणजे त्याला तोंड देणें अशा अर्थाची जी एक इंग्रजी म्हण आहे ती या ठिकाणीं बरोबर लागू पडते. एकदाचा आपण निश्चय करतों, व भीतीवर आणि तसेंच मनाच्या काहुरावर जय मिळवून जेव्हां व्यास-पीठाकडे जावयास लागतों अशा वेळीं त्या मानवी सागरांत जणूं आपण उडी मारीत आहोंत असा आपल्याला भास होतो. कुठल्या खोल खोल पाण्यांत आपण पडूं आतां याचा त्या वेळीं पत्ताच लागत नाहीं. पण इतक्यांत ‘ बंधुभगिनीनो ! ’ अशी आपण सुरुवात तर करतोंच. कारण नाइलाज म्हणून. दोनतीन मिनिटांनीं पहावें तों आपल्या तोंडून केव्हांच शब्द गेलेले असतात ‘ श्रीयुत ××× यांनीं आजच्या प्रसंगीं अध्यक्षस्थान मंडीत करावें अशी माझी आपणा सर्वांच्या वतीनें सूचना आहे....’ हीच तर पहिल्या उडीची मजा आहे. एकदा सर्व धैर्य एकवटून आपल्याला परिस्थितीच्या प्रवाहांत ढकलून दिलें कीं, केवळ त्या प्रयत्नाच्या जोरावरच आपल्या हातून कार्य होत जावें. मात्र केवळ विचार करीतच जर बसलें तर निरंतरचाच विचार करीत बसावा लागतो.

अर्थात् हें विचारांचें काहूर आत्मविश्वासानेंच दूर जातें. पहिली उडी म्हणजे थोडेंसें धाडस आणि थोडासा आत्मविश्वास यांचें मिश्रण.

पण याहीवर जर कोणी म्हणेल कीं, मला नाहीं पहिली उडी मारून पहावयाची ! तर त्यावर दुसऱ्या एका प्रचलित वाक्प्रचाराचें अनुकरण करून मी एवढेंच सांगेन कीं, कधींही मुळींच उडी न मारण्यापेक्षां उडी मारून पडलें तरी तें अधिक श्रेयस्कर !

REFBK-0006142